

# तुका झालासे कळस

## खंड ३

# तुका झालासे कळस

खंड ३

ई साहित्य प्रतिष्ठान

“तुका झालासे कळस” या पुस्तकाचे पाचही खंड विनामूल्य वाचनासाठी आहेत. त्यावर सर्वांचा कायदेशीर अधिकार आहे. हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांना वाटण्याचे अधिकार व जबाबदारी आम्ही आपल्याकडे देत आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान हे नवीन लेखक कवींना जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचण्याचे साधन आहे. तसेच सुमारे दोन लाख वाचकांसाठी दर्जेदार साहित्य विनामूल्य नियमितपणे मिळण्याचे साधन आहे. सुमारे दोन लाख मराठी वाचक ई मेल द्वारे व वेबसाईट्द्वारे ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तकांचा आस्वाद घेत असतात.

त्याचबरोबर भावार्थ ज्ञानेश्वरी, छत्रपती शिवाजी, शंभूराजे, मावळे, विवेकानंद, सावरकर आदि विषयांवरची पुस्तकंही तरूण मराठी मुलांपर्यंत आणण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठान करतं. दर आठवड्याला नवनवीन पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानला आपल्या सहकार्याची गरज आहे.

नवीन साहित्यासाठी.

नवीन वाचकांसाठी.

मराठीला नवीन क्षितिजांशी नेण्यासाठी.

आभार

Tukaram.com

Khapre.org

Marathivishwakosh.com

Athavanitil-gani.com

Sankeertanam.com

Navashakti.co.in

tukaramasteachings.blogspot.in



साडेसात शतके

सहस्त्र मैलांचा खडतर मार्ग

कोटिकोटि भक्त

जगात कुठेही नसेल अशी एक उदात्त परंपरा जपणाऱ्या

वारकरी संप्रदायास

हे पुस्तक भावपुर्वक अर्पण

विनंती

आजचा काळ जागतिकीकरणाचा आहे. जागतिक किर्तीच्या विद्वानांचे साहित्य आता सहजासहजी उपलब्ध होते आहे. २३०० वर्षं जुन्या असलेल्या मराठी भाषेतही ज्ञानोबा तुकारामांसारखे महान संत आहेत. त्यांचे साहित्य जागतिक दर्जाचे आहे. हे संत मोठमोठ्या गोष्टी, क्लीष्ट भाषेत, बोजड करून सांगत नाहीत. अगदी सहज साध्या भाषेत सांगतात. आणि मग त्याचं भाषांतर वाचून अमेरिकेतले विद्वान जी पुस्तकं वाचतात ती जगभरात बेस्ट सेलर होतात. गुरुदेव टागोरांनी नोबेल पारितोषिक विजेती गीतांजली लिहिण्या आधी तुकारामांचे अभंग वाचले आणि बंगालीत भाषांतरित केले. गुरुदेव रविंद्रनाथांचे बंधू सत्येंद्रनाथ हे पहिले भारतीय ICS सनदी अधिकारी. ते १८७१ साली अहमदनगर, सातारा, पुणे आणि मुंबई भागात होते. त्या काळात त्यांनी तुकारामांचे अभंग वाचले आणि ते प्रभावित झाले. त्यानंतर त्यांनी व त्यांचे भाऊ रविंद्रनाथ यांनी तुकारामाच्या अनेक अभंगांचे "तुकोबा" या नावाने बंगाली व नंतर इंग्रजी भाषांतर केले. व याच प्रभावाखाली त्यांनी गीतांजली लिहिली. गीतांजलीच्या अनेक कवितांवर तुकारामांची छाप आहे. गीतांजलीचे इंग्रजी भाषांतर वाचून यिट्स हा इंग्लीश कवी प्रभावित झाला. त्यातले मानवतावादी आणि भूतदयावादी तत्त्वज्ञान ते लोक प्रथमच वाचत होते. एका वर्षातच त्याची फ्रेंच, जर्मन आदी दहा भाषांत भाषांतरे झाली. खुद्द गांधीजींनी तुकारामाच्या अभंगांचे भाषांतर केले.

पण आम्ही मराठी मंडळी मात्र तुकाराम आणि ज्ञानेश्वर शाळेतल्या पुस्तकात नाईलाजाने वाचतो. आणि नंतर तिकडे वळूनही बघत नाही. ज्या तुकाराम महाराजांनी छत्रपतींनी पाठवलेला नजराणा नाकारला आणि महाराजांना क्षात्रधर्माचा उपदेश केला ते तुकाराम महाराज आपल्यासाठी हजारो अभंगांचा नजराणा ठेवून गेले आहेत. त्यातली प्रत्येक ओळ, शब्द म्हणजे जीवनाचा मार्ग दाखवणारा प्रकाश झोतच आहे. पण हा नजराणा आपण नाकारत आहोत. निदान नवीन पिढी.

मित्रहो, मराठीतले असे अनमोल साहित्य आपल्या प्रत्येकाच्या घरी असले पाहिजे. वाचनात असले पाहिजे. आणि आचरणात आले पाहिजे. कारण आज जग आपल्या या खजिन्याने श्रीमंत होत आहे. आणि जर आपण हा खजिना रद्दीत टाकू तर आपल्यासारखे करंटे आपणच ठरू. हे पुस्तक आपल्या जास्तीत जास्त मित्रांना आणि नातेवाईकांना पाठवा. प्रत्येक मराठी माणसाला हे मिळू दे.

विनामूल्य आहे. अमूल्य आहे. येणाऱ्या पिढ्यांना नवा मार्ग दाखवण्याची क्षमता यात आहे.

चला तर. लागा कामाला. करा फ़ॉरवर्ड.

आपले नम्र

टीम ई साहित्य

## अनुक्रमणिका

खंड पहिला :

१) तुकाराम महाराजांचे अल्पचरित्र : मराठी विश्वकोष
२) तुकाराम महाराज संक्षिप्त चरित्र : श्री श्रीधर देहूकर
३) तुकाराम महाराज आणि महात्मा गांधी : सचिन परब
४) तुकोबा आणि छत्रपती शिवाजी : बाबाजी गणेश परांजपे
५) तुकोबा शिवराय भेट : भाऊ राहिरकर
६) संतवाणी : गायकांत विशेष लोकप्रिय अभंग
७) तुकाराम महाराजांचे ५०० अभंग

खंड दुसरा :

१)तुकाराम : महाराष्ट्राचा बंडखोर लोककवी :आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
२) तथागत बुद्ध आणि संत तुकाराम - :डॉ. आ. ह. साळुंखे
3) Sant Tukaram : Thiruvaiyuru Krishnan
4) Tukaram : Dilip Purushottam Chitre
५) तुकाराम महाराजांचे अभंग ५०१ ते १५००

## खंड तिसरा :

तुकारामांच्या अभंगाचे अर्थस्पष्टीकरण :रविंद्र फ़डके

Tagore's Tukoba : Smruti Koppikar

तुकाराम महाराजांचे अभंग १५०१ ते २५००

खंड चवथा :

तुकाराम महाराजांचे अभंग २५०१ ते ३५००

खंड पाचवा :

तुकाराम महाराजांचे अभंग ३५०१ ते ४५८३

(ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व VIP सदस्यांना पाचही खंड पाठवले जातील. त्यासाठी पत्र पाठवण्याची आवश्यकता नाही.

इतरांनी खंड २ ते ५ विनामूल्य मिळवण्यासाठी कृपया esahity@gmail.com ला पत्र लिहा. पत्रात आपण हा खंड ज्या लोकांना forward केला त्यांचे ई मेल पत्ते कळवावे)

# तुकारामांच्या अभंगाचे अर्थस्पष्टीकरण

## रविंद्र फ़डके

बंगलोरमध्ये रहाणारे, तुकाराम महाराजांचे चाहते, श्री रविंद्र फ़डके गेले वर्षभर साधारणत: दर आठवड्यास एक ह्या प्रमाणे तुकारामांच्या अभंगाचे अर्थस्पष्टीकरण खालील blog वर करत आहेत. स्पष्टीकरण ईंग्रजी तसेच मराठी असे दोन्ही भाषांमधे वाचकांचे सोईसाठी केलेले आहे. blog चे वाचन अनेक देशांमधील वाचक करताहेत. ह्या ब्लोग चा पत्ता खालील प्रमाणे आहे. आपण सर्वांनी हे लेख एकदा डोळ्यांखालून जरूर घालावेत व आपले मत कळवावे. tukaramasteachings.blogspot.in

आतां कोठे धावे मन । तुझे चरण देखेलिया ॥ १॥

भाग गेला शीण गेला । अवघा झाला आनंद ।। २॥

प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ॥ ३॥

तुका म्हणे आम्हां । विठ्ठल घोगें खरें माप ॥ ४॥

अभंगाचा शब्दार्थ :-

हे भगवंता, मी तुझ्या चरणाचे दर्शन घेतले आहेत; तर मग आतां माझे मने कोठल्याठिकाणी धांव घेईल? अर्थात माझ्या मनास आत ईतर कांहीच सुचत नाही आहे. ॥ १॥

ह्यामुळे माझा सर्व शीण नष्ट झाला आहे व मी आनंदाचाच अनुभव घेतो आहे. ॥ २॥

तुझ्याविषयी प्रेमातच मनाने बुडी मारली आहे, व नाम घेण्याची माझ्या जिभेला गॊडी लागली आहे ॥३॥

तुका म्हणतो की सर्व सुखाची मोजणि करायची तर विठ्ठल हेच सर्वांत मोठे माप आहे व तेच आमच्यासाठी योग्य, खरे आहे ॥ ४॥

अभंगा मागची भूमिका:-

मागच्या अभंगात जसा तुकाराम महाराजांच्या ब्रह्मरुपतेच्या नंतरचा अनुभव शब्दांकित होता तसाच ह्या अभंगात महाराजांचा स्वानुभव वेगळ्या शब्दांमधे महाराजांच्या प्रासादिक वाणीतून पुन: प्रगट झालेला आहे.

महाराज जरी ब्रह्मरूप झाले आहेत तरी ते आपल्यासारख्यांसाठी पुन: द्वैतामधे आलेले आहेत. ( ह्या अवस्थेलाच तुर्यावस्था असे नांव आहे. ह्या अवस्थेमधे बाह्य सृष्टीचे ज्ञान असते तसेच परब्रह्माशी एकरूपत्व पण असते. आपण जेंव्हा ॐ चा उच्चार करतो तेंव्हा अत्यंत थोडाकाळ ह्या अवस्थे मधे जातो. ध्यान करण्यच्या क्रियेमधे हा काळ अभ्यासाने लांबत जातो. मांडुक्य उपनिषदामधे ह्यावर सविस्तर चर्चा आहे.

अभंगाचे अर्थस्पष्टीकरण :-

तुकाराम महाराज जरी द्वैताकडे आलेले आहेत तरी त्यांचे मन मात्र त्या आनंदातच रंगलेले व म्हणून महाराज पहिल्या चरणामधे म्हणतात की हे देवा पांडुरंगा तुच्या चरणांचे दर्शन झाल्यावर आता माझे मन सतत त्याठिकाणीच रमलेले आहे. माझ्या मनाची इकडे तिकडे फिरण्याची सवय पूर्णपणे सुटली आहे. आता मला फक्त तुमचेच चरण दिसत आहेत.

ह्या आनंदाची कल्पना करायची, आनंदाचे स्वरूपप कसे असते ते समजायचे तर आपला गाढ झोपेचा अनुभव आहे त्याचा उपयोग दृष्टांत ( हा दृष्टांतपण खरेतर अपूराच आहे ) म्हणून करता येतो. आपण गाढ झोपेतून जागे झालॊ की थोडावेळ आपली अशीच स्थिती असते. कारण झोपेमधे आपण सुषुप्ति अवस्थेत जातो व त्यावेळी आपण आनंदाचाच अनुभव घेतो. त्याची आठवण जागे झालो तेंव्हा येते.पण जागे झाल्यावर मन परत व्यवहार करू लागते व विचलित होते. असो. संतांचे तसे नसते. ते ब्रह्मानंदातच असतात. तुकाराम महाराजांचे मन फक्त एका विठ्ठलाच्या चरणाचेच स्मरण करते आहे.

अभंगाच्या २ ऱ्या चरणामधे अशा स्थितिच्यामुळे काय घडले/घडते त्याचे वर्णन आहे.

जेंव्हा मन व़िचलित असते. टोकाचे विचार काळजी केली की मनाची अशी स्थिति होते. मनाच्या ह्या स्थितिमुळे अनेक आजार होतात हे आता सिद्ध झालेले आहे. माणसाच्या मनाला शीणभाग म्हणजे थकावा तेंव्हाच येतो. कांही झोप येणारी औषधे देऊन मानसोपचार तज्ञ ह्या विचलित स्थितीवर उपचार करतात.

पण भगवंताच्या चरणाठायी मन एकदा गुंतले की मग असा किंचितही थकवा येत नाही उलट असला तर तो दूर होतो. तुकाराम महाराजांनी हेच दुसऱ्या अभंगाच्या चरणामधे म्हटले आहे.

अभंगाचा तिसरा चरण आपल्या रसनेची स्थिती वर्णन करणारा आहे.

भगवंताचे निस्सिम प्रेम मनामधे उत्पन्न झाले आहे. त्यामुळे जिभेला त्याचेच नाम घेण्याचा चाळा लागला आहे. दुसरे कांहीच तिला गॊड लागत नाहीये.

येथे पण एक व्यवहारातला म्हणुनच अपूरा दृष्टांत घेता येतो. जर आपण फार गॊड वस्तू खाल्ली तर त्या गोडीचा अनुभव मना मधे अत्यंत घट्ट जागा धरून बसतो. ह्या संस्कारामुळे मनास तीच वस्तू सतत खावी असेच वाटत राहते.

(पण एक वेळ अशी येते की त्या वस्तूची आंस संपते. मग तीच वस्तु निदान तात्पुरती नकोशी वाटते.

ह्यालाच Law of Diminishging return असे नांव आहे.)

तुकाराम महाराज म्हणतात की माझा जिभेला विठ्ठलनामच्या गोडीचा अनुभव आला आहे. आता माझ्या रसनेला नामाशिवाय दुसरे कांही नको आहे. ( येथे पारमार्थिक अनुभव नेहमीपेक्षा वेगळा कसा हे पण स्पष्ट झाले! विठ्ठलनामस्मरणाला किंवा कोणत्याही नामास्मरणाला Law of diminishing Return लागू होत नाही )

अभंगाच्या शेवटच्या चरणामधे हा मुद्दाच स्पष्ट होतो. महाराज म्हणताहेत की विठ्ठल नामाचे स्मरण केल्याने जे सुख मोजायचे तर त्यासाठी दुसरे कोणतेही माप उपयोगी नाही. स्वस्वरूपाचे ज्ञान झाले व ब्रह्मानंदाचा अनुभव आला. परब्रह्माशी एकरूपता आली. हा आनंद अखिल ब्रह्मांदला व्यापणारा आहे. त्यासाठी विठ्ठल म्हणजे परब्रह्माएवढेच मोठे माप आहे. थोडक्यांत म्हणात्यचे तर हा आनंद अवर्णनीय आहे. त्याची मोजणि करणे अशक्यातली गोष्ट आहे. ही मोजणि करायची तर अशा भक्तालापण ब्रह्मरूपच व्हावे लागेल.

अभंगाची शिकवण:-   :-

शिकवण हीच की नामस्मरण करून आपणही अशा आनंदाचा अनुभव घेण्य़ास प्रयत्नशील व्हावे.

## अभंगाचा भावार्थ : रविंद्र फ़डके

अणुरेणुया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥ १ ॥

गिळूनी सांडिलें कळिवर । भवभयाचा आहार ॥ २॥

सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ॥ ३॥

तुका म्हणें आता । उरलो उपकारा पुरता ॥ ४ ॥

अभंगाचा शब्दार्थ :-

तुकाराम आता अणू रेणूंपेक्षाही सूक्ष्म व आकाशापेक्षाही विशाल झाला आहे ॥ १॥

आता तुकारामाने भवभयाचाच आहार केला आहे व सर्वकांही गिळून स्थूल शरीर टाकले आहे ॥ २॥

तसेच त्रिपुटीपण ( तुकारामाने) टाकली आहे व ज्ञानदीप ह्या शरीरामधे प्रकाशित झाला आहे. ॥ ३॥

आता हा तुकाराम फक्त उपकारांपुरताच शिल्लक आहे ॥ ४॥

अभंगाच्या मागची भूमिका :-

(स्व. भीमसेन जोशी यांनी हा अभंग गायलेला आहे.)

ह्या अभंगात तुकाराम महाराजांनी स्वत:च्याच ब्रह्मज्ञानावस्थेचे वर्णन केलेले आहे.

ब्रह्मज्ञान होणे हेच माणसाच्या मानव जन्म मिळाल्याचे सार्थक होय असे आपली शास्त्रे (धर्म ,अर्थस, काम व शेवटी मोक्ष हे चार पुरुषार्थ शास्त्रांनी सांगितले आहेत.) तसेच सर्व संत पण हेच सांगतात. ब्रह्मज्ञान, , आत्मज्ञान , मी खरा कोण आहे व माझे खरे स्वरूप काय आहे हे ज्ञान , जन्ममृत्यूचक्रामधून सुटका, ,मोक्ष ही सर्व एकच स्थितीची निरनिराळी नांवे आहेत.

ही स्थिती खरेतर शब्दातीत , वर्णनातीत असते ही अनुभवायची असते.. (जशी साखरेची गोडी शब्दांत सांगता येत नाही तसेच कांहिसे म्हणता येईल )

पण तरीही संत सोप्या शब्दांत ह्या स्थितीचे वर्णन आपल्या सारख्या बद्धांकरिता ह्यासाठी करतात

की आपणपण नरजन्माचे असे सार्थक करून घ्यावे अशी उर्मी यावी व आपण प्रयत्नांना लागावे

हीच संतांची अपेक्षा असते.

ह्या दृष्टीनेच ह्या अभंगाचा अर्थ लावणे योग्य ठरते. व तसा प्रयत्न मी येथे केलेला आहे. वाचकांनी ह्याव आपली मते , विचार जरूर कळवावेत हीच विनंती येथे आहे. असो.

भावार्थाचे स्पष्टीकरण :-

भगवंत अर्थात परब्रह्म कसा आहे तर तो सुक्ष्माहून सूक्ष्म आहे.तो सर्वव्यापी आहे. त्याची ओळख होणे भेट होणे म्हणजेच ब्रह्मज्ञान होणे; त्याच्याशी एकरूपत्व येणे.

भगवंताचे वर्णन तीन शब्दांत करायचे झाले तर भगवंत सर्वज्ञ , सर्वशक्तीमान व सर्वव्यापी असा आहे असे ते वर्णन होते. हे वर्णन " कारें नाठविसि कृपाळू देवासी " ह्या अभंगाचा अर्थ पाहताना (post no 1) आलेच आहे. तरीही पुनरावृत्ति आवश्यक म्हणून येथे करतो आहे.

जर आपण आपल्या भोवतीचे विश्व रात्री पाहीले तर आकाशामधे अनंत ग्रहतारे दिसतात. सध्या उपलब्ध असलेल्या खगोल शास्त्राची कांस आपण घेतली तर समजते की आपण पाहातो ते ब्रह्मांड अत्यंत विराट आहे. असे म्हणतात की प्रकाशाला ब्रह्मांडाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला कोट्यावधी प्रकाश वर्षे ( प्रकाशाची गती १ सेकंदामधे ३३००००Km / १८००००मैल आहे. म्हणजे एका वर्षामधे प्रकाश ३३३०००*६०*६०*२४*३६० खkm जातो) आहे. खरेतर अजूनही हा खगोलतज्ञांचा एक अंदाजच आहे!) पण ह्या साध्यागणिताने ब्रह्मांडाच्या विराटत्वाची कल्पना येऊ शकते. ईश्वराने हे सर्व ब्रह्मांड व्यापले आहे म्हणजे तो त्याहून विराट आहे. हे ब्रह्मांड अवकाशामधे (Space) आहे. अवकाशालाच "तुकाराममहाराजांनी "आकाश " संबोधले आहे.

तसेच जर आपण पदार्थांची मूळ रचना पाहिली तरे असे दिसते की प्रत्येक पदार्थ अणू व रेणूंचा बनला आहे. अणूच्या आंत गेले तर असे आढळते की एका proton भोवती electron फिरत असतात. ब्रह्म हे त्यापेक्षापण सूक्ष्म आहे.

ब्रह्म म्हणजेच भगवंत हे आपण जाणतोच . ब्रह्मज्ञान म्हणजे त्याच्याशी एकरूपता. ही एकरूपता तुकाराम महाराजांनी साधल्यामुळे अभंगाच्या पहिल्याच चरणामधे ते म्हणताहेत की " मी असा आकाशापेक्षाही विराट आहे व अणुरेणूंपेक्षाही सुक्ष्म आहे.

अभंगाच्या २ ऱ्या  चरणामधे महाराज म्हणाताहेत की " मी हा भवभ्रमाचा पसारा गिळून टाकला आहे व ह्याचा अर्थ वरच्या संदर्भात स्पष्टचा आहे. “ तुकाराम महाराज विदेही अवस्थेमधे आहेत. आत त्यांना ह्या मर्त्य शरीराची बंधने उरलेली नाहित. .

आपल्या शात्रांप्रमाणे आपण हे जे दृश्य अनुभवत आहोत ते एक प्रकारचा भ्रम आहे. तुकाराम महाराजांच व ईतर संतांचापण हाच अनुभव आहे. " यतो दृष्टं ततो नष्टम् " अर्थात जे जे दिसते ते सर्व नाशवंतच असते " हा निसर्गनियम पण आहे. जसा शिंपल्यामधे रुप्याचा भास होतो तसेच आपल्याला हे जग भासते पण अज्ञानामुळे तच खरे वाटते. पण ब्रह्मज्ञानी पुरुषासाठी हे सर्व भ्रमच असते. मला हे कळले आहे हाच " मी भवभ्रम गिळून टाकला आहे "ह्या चरणाचा अर्थ येथे स्पष्ट होतो.

अभंगाच्या तिसऱ्या चरणामधे ही ब्रह्मरूपता कशी घडते ते वर्णन आहे. महाराज म्हणतात की "मी त्रिपुटी सांडली कारण माझा मनामधे ज्ञानदीप ( ब्रह्मज्ञान) उजळला आहे. त्रिपुटी म्हणजे परस्पर संबधित अश्या तीनांचा समुदाय. अध्यात्मामधे ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय (ब्रम्हज्ञान अनुभवणारा- ब्रह्मज्ञान- ब्रह्म) ही त्रिपुटी प्रसिद्ध आहे. ही त्रिपुटी आपले द्वैतामधले कोणतेही ज्ञान होण्याची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठीच वापरतात.

येथे ज्ञाता व ज्ञेय वेगळे असतात. पण ब्रह्मज्ञानाच्या बाबतीत हे वेगळेपण संपते. ह्यावेळी ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान सर्व एकच होतात. तुकाराम महाराजांना ब्रह्मज्ञान झाल्यामुळे त्यांच्यापुरती तरी त्रिपुटी संपली आहे व महाराज हेच आपल्याला ह्या अभंगाच्या ३ऱ्या चरणामधे सांगताहेत.

पण महाराजांचे शरीर हे अनुभावचे बोल लिहिणारे अजून पंचभूतांमधे विलिन झालेले नाही. ज्ञानानंतर ज्ञानी पुरुषाचे असेच होते. बाकिच्यांना पण असे ज्ञान होऊन त्यांचीपण सर्वदु:खांतून सुटका व्हावी ह्याच कारणाकरिता ज्ञानी जगामधे रहातो. हे ज्ञान कसे मिळेल हेच सांगण्याकरता ज्ञानी पुरुष उरलेले आयुष्य व्यतीत करतो. ह्यालाच उपकार करणे म्हणतात. ह्या उपकारामधे परतफेडिची अपेक्षा नाही. तुकाराम महाराज अभंगाच्या शेवटच्या ४थ्या चरणामधे हेच स्पष्ट करत आहेत.

अभंगाची शिकवण :- ह्या अभंगावरून आपल्याला हीच शिकवण मिळते की संतांच्या वचनांवर श्रधा व विश्वास ठेवून त्यांनी सांगितलेला मर्ग चोखाळावा व जीवनाचे सार्थक करून घ्यावे.

अभंगाच्या अर्थाचे मराठीत स्पष्टीकरण ईंग्रजी स्पष्टीकरणानंतर दिले आहे

मन माझे चपळ । न राहे निश्चळ । घडि घडि पळ पळ स्थिर नाही ॥ १ ॥

आता तू उदास नव्हे नारायणा । धावे मज दीना गांजियले ॥ २ ॥

धाव घाली पुढे इंद्रियांचे ओढी । केले तडातोडी चित्त माझे ॥ ३ ॥

तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलो हे आस धरोनि तुझी ॥ ४ ॥

Verbatim Meaning:-

My mind is mercurial । It is not steady and stable at any moment || 1 ||

Now O'Narayana do not remain indifferent | Please come to save poor me|| 2||

My sense organs are running behind the objects they love| Because of this my mind is disturbed very much || 3 ||

Tuka says that all my efforts are useless | I am only hoping for the help from you ||4||

Background Information needed for understanding this abhanga

We have seen in the earlier abhaNgaas that our mind is always chasing the objects in this external world through our five sense organs. This process leads to the generation of various desires. And this has started from the moment we have taken birth. The mind is thus continuously occupied by the subject of these five senses during the time we are awake and also when we sleep. The result is the state of restlessness for the mind. We also know that the unfulfilled desires are the sole cause of successive births and deaths. i.e. getting entangled in the cycle of births and deaths.

This mercurial mind can not be controlled even by very high level personalities. This is the reason why our saints have written various Abhangas, poems during their initial stage of the sadhanaa( साधना)

For example in one such poem called KaruNaashtakaa( करुणाष्टक) Samartha Ramadasa says the " I am, unable to control my mercurial mid, O god please help me. Without your support I am getting tired of putting efforts to control my mind".

The present Abhnga of Sant Tukaramaa also falls in this category.

One of the main cause of this state of mind is it's habit of raising doubts for any action to be taken. This habit has many shades.

For example we see that many clever students become overconfident about their knowledge and do not perform well in the examination.

However this habit of raising Doubts may be useful in our day to day life. Generally before alloying any work to an unknown person we first have doubts about the persons capability. Later-on after he /she completes the assigned work we develop confidence . This process is thus not very bad as far as day to day life is concerned. A person who doubts will plan the actions more thoroughly and will succeed in the undertaking.

But in Spirituality , the doubt is very dangerous and therefore undesirable. In spirituality. Unlike material world , the results in spiritual path are not tangible. This causes Doubt abut the efforts one is putting for ones progress. Because of Doubts many a people give-up their efforts in spirituality and loose the golden opportunity of getting the Human birth.

Thus one must have Faith (श्रद्धा) first. The efforts put with faith give us the confidence that God is really present and He is taking care of our every need. This further strengthen the Faith. Such person very soon reaches the goal of Liberation.

Sri.Bhagavadgeetaa also tells us to have faith for this reason.

However whatever efforts one may put the mind remains mercurial and take us away from our efforts. This is everybody's experience.

.

What can one do then? Sant Tukarama gives answer for this question in this abhanga.

Meaning of the Abhanga:-

Tukarama Maharaja addresses his god saying “O Narayanaa ! I am tired now after putting all my efforts to control my mind. It is continuously going to all other objects .( I am, not able to remember you ) But you are all knowing one. You alone are my savior. Therefore I pray you to help me to come out of this state of mind. I am hoping only for the help from you”.

Teaching of the Abhanga:-

We also can pray to our God like Tukarama Maharaja has done here.

There is a difference between prayer and request. A request may get rejected. But a prayer is never rejected .Thus the disciple is very sure that God will listen to the prayer and do the best for the Disciple.

There are such Abhangas of Sant Tukarama . Also here I remember a very effective prayer written by Samarth Ramadas with the last line “ O Rama, this is what I would like to have from you” ( रघुनायका मागणे हेचि आता).

In our Indian society , it is standard practice to say a prayer first in the morning. One should select some suitable prayer and should pray to God , everyday. This is the teaching of this Abhanga.

Now the same is given in Marathi for marathi Readers.

अभंगाच्या अर्थाचे मराठीत स्पष्टीकरण :

मन माझे चपळ । न राहे निश्चळ । घडि घडि पळ पळ स्थिर नाही ॥ १ ॥

आता तू उदास नव्हे नारायणा । धावे मज दीना गांजियले ॥ २ ॥

धाव घाली पुढे इंद्रियांचे ओढी । केले तडातोडी चित्त माझे ॥ ३ ॥

तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलो हे आस धरोनि तुझी ॥ ४ ॥

अभंगाचा शब्दार्थ:-

माझे मन अत्यंतचपळ आहे व कोठेही क्षणभसुद्धा स्थिर रहात नाही. सारखे एकडेतिकडे पळत असते ॥ १॥

हे नारायणा तू माझ्याबाबतीत उदास होऊ नकोस . मला ह्यापरिस्थितीतून वाचवायला धाव. मी अगदी दीनवाणा झालो आहे व ह्या परिस्थितीमुळे गांजून गेलो आहे ॥ २ ॥

माझे चित्त इंद्रियांच्या विषयां मागे धावते व समाधान न मिळाल्यामूळे जणू चित्तचे तुकडे झाले आहेत. ॥ ३॥

तुका म्हणतो की माझे सर्व प्रयत्न अपूरे पडत आहेत. आता मला कळून चुकले आहे

व म्हणून मला हीच आशा आहे की ( हे नारायणा) तूच ह्यातून सोडवशील ॥ ४॥

अभंगाचा अर्थ समजण्यासाठी आवश्यक माहिती :-

आपण आधीच्या अनेक अभंगाच्या विवरणामधे पाहिलेच आहे की माणसाचे मन हे सतत पंचेंद्रियांच्या कोठल्यातरी एका विषयांमागे धावत असते. त्यामुळेच मनामधे वासना निर्माण होतात. ही क्रिया आपल्या जन्मापासून जागेपणी तसेच आपण झोपी गेलो तरी चालूच असते. ह्यामुळे मन अस्थिर असते. असो.

मनाचे चपळपण हे भल्याभल्यांना आवरता येत नाही. अगदी उच्च कोटिच्या साधकंना सुद्धा ते आवरणे कठीणच जाते. आपल्या संतांच्या साधकावस्थेमधे म्हणुनच ह्यावर ओव्या व अभंग आहेत.

उदाहरणार्थ : एका करूणाष्टकामधे समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे की

"चपळपण मनाचे नावरे नावरीता. तुजविण शिण होतो , धाव रे धाव आता."

संत तुकारामांचा हा अभंग अशाच काव्यामधला एक आहे.

मनाची एक वाईट सवय म्हणजे संशय वाटणे. ही सवय साधकालाच नव्हे तर इतरांना पण व्यवहारामधे सुद्धा साधारणत: घातक ठरते. आपण पहातोच की

अगदी हुषार मुले मला सर्व येते असे समजून अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. हा सुध्दा संशयाचाच एक प्रकार आहे.

पण दृश्य सृष्टीचे व्यवहार करतांना " प्रथम संशय घेणे, त्यानंतर तर्काने व अनुभवाने संशयाचे निराकरण होणे ,व मग विश्वास बसणे हे घडते. ह्यानंतर पुढे खात्री झाल्यावर एखाद्या व्यक्तीला काम देणे " ह्या पद्धतीने चालतात/केले जातात.

अर्थात व्यवहारामधे हा विवेक विचार उपयोगी पडतो हे स्पष्टच आहे. असा विचार करणारी व्यक्त्ति व्यवहारात संशयावर मात करून यशस्वी होते.

पण परमार्थामधे याच्या उलट जावे लागते.. प्रथम श्रद्धा असावी लागते. अशी श्रद्धाच परमार्थामधे यश देंणारी असते. बरीच मंडळी संशयाने आपली साधना सोडतात व जीवन व्यर्थ घालवतात. ठाम श्रद्धा असल्यानंतर माणसाला योग्य प्रयत्नांमुळे भगवंत आहेच व तो माझ्या भल्यासाठीच सर्व कांही करतो आहे हा अनुभव येतो. तो आहेच हि खात्री झाली की आपले त्याच्याशी नाते जोडले जाते. मग आपण जसे एखादे मूल आपल्या आईकडे आपली त्राती म्हणुन पाहते व तिच्यावर सारा भार टाकून निश्चिंत होते तसे आपण होऊ शकतो. भगवंत अशा भक्ताचा नेहमीच कैवारी असतो. भगवंताने तसे गीतेमधे सांगितलेच आहे.

म्हणुन हे समजून घ्यावे व आपली दृष्टी परमार्थात संशयरहित ठेवावी असे पण म्हणता येते. असो.

पण कितीही प्रयत्न केले तरी मन अस्थिर राहते हाच आपला अनुभव आहे /असतो.

ह्या परिस्थितीतूमधून कसे बाहेर पडायचे ह्याचे मार्गदर्शन ह्या अभंगात आहे.

अभंगाच्या अर्थाचे स्पष्टीकरण :-

तुकाराम महाराज येथे म्हणतात की हे नारायणा मी सर्व प्रयत्न करून आता थकलो आहे. मन सतत अस्थिरच आहे. सारखे तुझा स्मरणापासून दुर जाते आहे. पण तूच सर्व जाणतोच. तूच माझा त्राता आहेस. म्हणुन तुलाच माझी प्रार्थना आहे की आता मला ह्यास्थितीतून बाहेर काढ. हीच आशा लावून मी बसलो आहे.

अभंगाची शिकवण:-

महाराज म्हणतात तशीच आपण प्रार्थना करू शकतो. प्रार्थना व विनंती मधे फरक असतो. ज्याला विनंती केली आहे तो तिच्याकडे दुर्लक्ष करू शकतो. पण प्रार्थना नक्कीच ऐकली जाईल अशी खात्री प्रार्थना भक्ताला असते.

तुकाराम महाराजांचे असे अभंग आहेत. तसेच समर्थ रामदास्स्वामींचे " रघूनायका मागणे हेची आता" असा शेवटचा चरण असलेले करूणाष्टक साधाकांसाठी प्रार्थनेला घेता येते.

आपल्याकडे प्रात:स्मरणामधे प्रार्थना म्हणण्याची पद्धत आहे. अशी कोणतीतरी प्रार्थना रोज म्हणावी हीच ह्या अभंगाची शिकवण आहे

# Tagore's Tukoba

Smruti Koppikar

Pune University's enviable collection on Sant Tukaram, among the foremost poet-saints of Maharashtra, just got richer. The new addition is Rabindranath Tagore's transcription and translation of 12 Tukaram abhangs—typical four-stanza devotional songs—into Bengali. That Tagore, and his elder brother Satyendranath, had read, translated and written about the 17th century bhakti poet was known but locating the precise 12 abhangs among Tagore's works has brought new life to the university's 10-year-old effort to document everything on Sant Tukaram.

Tukaram stands tall in the pantheon of poet-saints of Maharashtra that begins with the 12th-century Sant Jnaneshwar.

Satendranath is credited with introducing Tukaram to Bengali literature, Art.

Along with his contemporary Sant Ramdas, Tukaram influenced generations of Maharashtrians with his verse and, historians say, paved the way for Chhatrapati Shivaji's ascent. Belonging to the bahujan samaj, Tukaram, unlike other poet-saints, did not eschew material life but lived it fully, rebelled against the feudal social order of the day through his verse, became the people's prophet as it were before attaining sainthood. Tukaram's abhangs and their place in Marathi culture are unparalleled. Numerous films have been made on his life, musicians have set his abhangs to tune. He has also inspired modern-day rebel poets like Arun Kolatkar and Dilip Chitre, his abhangs have been translated into English, French, German, Spanish, Greek, Esperanto, and of course, Bengali.

Tagore's rescripting and translations are priceless, says Dilip Dhonde, research assistant at the university's Sant Tukaram Maharaj Marathi Cultural Chair. "We are delighted. Now we begin the hunt for the original manuscripts," he says. Teacher-writer Gayatri Chatterjee, studying Tukaram, gave him the translations of 12 abhangs which were found in Tagore's Malati Pothi and Navratna volumes. Cultural historians say the find is important to the extent that it shows the exact abhangs that Tagore selected and, hence his perspective on the bhakti poet.

Tagore chose an abhang from Guru Updesh and two from Kavitvache Sfuran in which Namdeo and Pandurang appear in Tukaram's dreams asking him to write for the people, as many as seven from Tukaram-Jeejai Samvad which contain exchanges with his wife—and through them home truths and the universal truths of life itself—and two from his last days as a prophet of the people. "Taken together, Tagore's selection is a bio-sketch of Tukoba, spanning his life and works," remarks Dhonde. These translations first appeared in the Rabindra Rachnavali but Dhonde says this was known to only Bengali literature aficionados.

Tagore's fascination grew from his brother Satyendranath, India's first ics officer posted in Ahmednagar, Satara, Pune, Bombay, Karwar—all in the then Bombay Presidency. Satyendranath not only learned Marathi and read Tukaram extensively but also gave discourses in Marathi on the poet-saint at Prarthana Samaj meetings in Pune in 1871. He also translated Tukaram's abhangs into English. In 1889 he wrote Bombai Chitra and devoted a section of the book to Tukaram. Later in 1901 he wrote an essay—Tukaram, the Shudra poet of Maharashtra.

Satyendranath is credited with having introduced Tukaram to Bengali literature and art. Inspired by him, Yogendranath Basu learned Marathi and serialised Tukaram's biography in the monthly Daasi. The serialisation was later published as a book, Sant Tukaram. Later, in 1929, playwright Harindranath Chattopadhyay wrote his play Tukaram which earned him critical acclaim. Renowned Santiniketan artist Nandalal Bose, on Mahatma Gandhi's request, drew sketches of Tukaram. In the 1970s, writer-filmmaker Satyajit Ray also made sketches of Tukaram which was used by the Sahitya Akademi for its volumes on the poet.

Why was Bengal fascinated with Tukaram? "Tukaram rebelled against the oppressive social order of his time which has parallels in Bengal.His verse finds resonance later in Prarthana Samaj which has a likeness to Bengal's Brahmo Samaj which, in turn, influenced the Tagores. And, of course, Tukaram's language and concepts are modern. These may explain why Bengali intellectuals and writers, particularly those exposed to Marathi, have done so much work on him," says historian-author Dr Aroon Tikekar. Adds Dhonde, "Research shows that the Bengali song form pad kalpataru has likeness to our abhangs." Tagore carried Tukaram's verse into Bengal. His work has come home now, as it were, to Pune University.

# तुकोबांचे अभंग

## १५०१ ते २५०१

१५०१

तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हां कां हे डोळे कान दिले ॥१॥

नाइकवे तुझी अपकीर्ति देवा । अव्हेरली सेवा न देखवे ॥धृ.॥

आपुले पोटीं तों राखियेला वाव । आम्हांसी कां भाव अल्प दिला ॥२॥

तुका म्हणे दुःखी असें हें कळों द्या । पुढिलिया धंद्या मन नेघे ॥३॥

१५०२

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥१॥

सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥धृ.॥

शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥२॥

तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥३॥

१५०३

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥१॥

विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥धृ.॥

माझी कोणी न धरो शंका । हो कां लोकां निद्वपद्व ॥२॥

तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥३॥

१५०४

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥

येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचेंतें ॥ध्रु.॥

अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रम्हांडाचा ॥२॥

तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळघडी आल्याविण ॥३॥

१५०५

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥

थोरींव सांडिली आपुली परिसें । नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥ध्रु.॥

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥२॥

भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥३॥

तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें जरवतसे ॥४॥

१५०६

जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥१॥

तुम्ही सांभाळिलों संतीं । भय निवारली खंती ॥ध्रु.॥

कृत्याकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ॥२॥

तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥३॥

१५०७

काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ॥१॥

तुम्ही जालेति कृपाळ । माझा केला जी सांभाळ ॥ध्रु.॥

काय वोळलें संचित । ऐसें नेणें अगणित ॥२॥

तुका म्हणे नेणें । काय केलें नारायणें ॥३॥

१५०८

असें येथींचिया दिनें । भाग्यहीन सकळां ॥१॥

भांडवल एवढें गांठी । नाम कंठीं धरियेलें ॥धृ.॥

आणिक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ॥२॥

तुका म्हणे केली कोणें । एवढा नेणें लौकिक ॥३॥

१५०९

गायें नाचें वायें टाळी । साधन कळी उत्तम हें ॥१॥

काय जाणों तरले किती । नाव ऐती या बैसा ॥धृ.॥

सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ॥२॥

तुका म्हणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ॥३॥

१५१०

सर्वकाळ माझे चित्ती । हे चि खंती राहिली ॥१॥

बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ॥धृ.॥

वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥२॥

तुका म्हणे वेध जाला । अंगा आला श्रीरंग ॥३॥

१५११

जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥१॥

दुःख पावायाचें मूळ । रहनी ठाव नाहीं ताळ ॥ध्रु.॥

माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥२॥

तुका म्हणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥३॥

१५१२

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चरण ॥१॥

येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥ध्रु.॥

संग हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥२॥

तुका म्हणे हरिच्या दासां । शुभकाळ अवघ्या दिशा ॥३॥

१५१३

ब्रम्हरूपाचीं कर्मे ब्रम्हरूप । विरहित संकल्प होती जाती ॥१॥

ठेविलिया दिसे रंगाऐसी शिळा । उपाधि निराळा स्फटिक मणि ॥ध्रु.॥

नानाभाषामतें आळविती बाळा । प्रबोध तो मूळा जननीठायीं ॥२॥

तुका म्हणे माझें नमन जाणतियां । लागतसें पायां वेळोवेळां ॥३॥

१५१४

नाहीं सुगंधाची लागती लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ॥१॥

वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण ॥ध्रु.॥

प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं तंव जन सकळ साक्षी ॥२॥

तुका म्हणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हा ॥३॥

१५१५

तीर्थाटणें एकें तपें हुंबरती । नाथिले धरिती अभिमान ॥१॥

तैसे विष्णुदास नव्हती साबडे । एकाचिया पडे पायां एक ॥ध्रु.॥

अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ॥२॥

तुका म्हणे विधिनिषधाचे डोहीं । पडिले त्यां नाहीं देव कधीं ॥३॥

१५१६

पटे ढाळूं आम्ही विष्णुदास जगीं । लागों नेदूं अंगीं पापपुण्य ॥१॥

निर्भर अंतरीं सदा सर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ॥ध्रु.॥

बळिवंत जेणें रचिलें सकळ । आम्हां त्याचें बळ अंकितांसी ॥२॥

तुका म्हणे आम्ही देखत चि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ॥३॥

१५१७

कथेचा उलंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ॥१॥

कासया जीऊन जाला भूमी भार । अनउपकार माते कुंसी ॥ध्रु.॥

निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ॥२॥

तुका म्हणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ॥३॥

१५१८

सांडोनी दों अक्षरां । काय करूं हा पसारा ।

विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडेसी ॥१॥

म्हणोनि बोबडा उत्तरीं । वाचें जपें निरंतरीं ।

नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें ॥धृ.॥

सर्वमय ऐसें वेदांचें वचन । श्रुति गर्जती पुराणें ।

नाहीं आणीक ध्यान । रे साधन मज चाड ॥२॥

शेवटीं ब्रम्हार्पण । या चि मंत्राचें कारण ।

काना मात्र वांयांविण । तुका म्हणे बिंदुलीं ॥३॥

१५१९

हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधुपार उतरलों ॥१॥

फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥धृ.॥

हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाढा छेदिला ॥२॥

हरिनामाचीं धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ॥३॥

येणें चि बळें सरते आम्ही । हरिचे नामें लोकीं तिहीं ॥४॥

तुका म्हणे जालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ॥५॥

१५२०

नव्हें हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ॥१॥

आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ॥धृ.॥

देहपिंड दान दिला एकसरें । मुळिचें तें खरें टांकसाळ ॥२॥

तुका म्हणे झरा लागला नवनीत । सेविलिया हित पोट धाय ॥३॥

१५२१

घटीं अलिप्त असे रवि । अग्नि काष्ठामाजी जेवी । तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षीवर्तनें ॥१॥

भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं । विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ॥धृ.॥

देह संकल्पासारिखें । एक एकांसी पारिखें । सुख आणि दुःखें । अंगी कर्में त्रिविध ॥२॥

तुका म्हणे कोडें । न कळे तयासी सांकडें । त्याचिया निवाडें । उगवे केलें विंदान ॥३॥

१५२२

सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय ॥१॥

चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥धृ.॥

नेत्रीं जळ वाहो सदां । आनंदाचे रोमांच ॥२॥

तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥३॥

१५२३

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥१॥

डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥धृ.॥

सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ॥२॥

तुका म्हणे सवें । आतां असिजेत देवें ॥३॥

१५२४

तान्हे तान्ह प्याली । भूक भुकेने खादली ॥१॥

जेथें तें च नाहीं जालें । झाडा घेतला विठ्ठलें ॥ध्रु.॥

वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥२॥

शेष उरला तुका । जीवा जीवीं जाला चुका ॥३॥

१५२५

पाणिपात्र दिगांबरा । हस्त करा सारिखे ॥१॥

आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥ध्रु.॥

भिक्षा कामधेनुऐशी । अवकाशीं शयन ॥२॥

पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥३॥

१५२६

विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रम्हरस ठसावला ॥१॥

माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥ध्रु.॥

लाभाचिया सोसें पुढें चाली मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ॥२॥

तुका म्हणे गंगासागरसंगमीं । अवघ्या जाल्या ऊर्मि एकमय ॥३॥

१५२७

कृष्णरामनाम मांडीं पां वोळी । तेणें होइल होळी पापा धुनी ॥१॥

ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास । जया नाहीं नास ब्रम्हरसा ॥ध्रु.॥

जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आस नुरे मागुताली ॥२॥

तुका म्हणे ऐसें धरा कांहीं मनीं । यातायाती खाणीं चुकतील ॥३॥

१५२८

परमार्थी तो न म्हणावा आपुला । सलगी धाकुला हेळूं नये ॥१॥

थोडा चि स्फुलिंग बहुत दावाग्नी । वाढतां इंधनीं वाढविला ॥ध्रु.॥

पितियानें तैसा वंदावा कुमर । जयाचें अंतर देवें वसे ॥२॥

तुका म्हणे शिरीं वाहावें खापर । माजी असे सार नवनीत ॥३॥

१५२९

ज्याचा ऐसा अनुभव । विश्व देव सत्यत्वें ॥१॥

देव तया जवळी असे । पाप नासे दरुषणें ॥ध्रु.॥

कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥२॥

तुका म्हणे भेदाभेद । गेले वाद खंडोनि ॥३॥

१५३०

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ॥१॥

न लगे हालावें चालावें बाहेरी । अवघें चि घरीं बैसलिया ॥ध्रु.॥

देवाचीं च नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ॥२॥

तुका म्हणे आहे भावें चि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ॥३॥

१५३१

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥१॥

म्हणोनियां ऐसे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥ध्रु.॥

वेदपारायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं ॥२॥

पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥३॥

आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ॥४॥

तुका म्हणे मज कोणांचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥५॥

१५३२

पंढरीची वाट पाहें निरंतर । निडळावरी कर ठेवूनियां ॥१॥

जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ॥ध्रु.॥

पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ॥२॥

तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसी केधवां पांडुरंगा ॥३॥

१५३३

ऐसी जोडी करा राम कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ॥१॥

नासिवंत आटी प्रियापुत्रधन । बीज ज्याचा सीण तें चि फळ ॥ध्रु.॥

नाव धड करा सहजरा नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ॥२॥

तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा हरिरामबाणीं ॥३॥

१५३४

पाहें मजकडे भरोनियां दृष्टी । बहुत हिंपुष्टी जालों माते ॥१॥

करावेंसे वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन श्रृंघारिक ॥ध्रु.॥

सत्यासाटीं माझी शब्दविवंचना । जोडिल्या वचनाचें तें नव्हे ॥२॥

तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें ॥३॥

१५३५

तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥१॥

आझुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहातोसि ॥ध्रु.॥

आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तानभूक ॥२॥

प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाईं वोरसोनि ॥३॥

तुका म्हणे माझें कोण हरी दुःख । तुजविण एक पांडुरंगा ॥४॥

१५३६

भक्ति तों कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥१॥

जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥ध्रु.॥

कामावलें तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥२॥

तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥३॥

१५३७

पापी म्हणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ॥१॥

ऐशा विचाराचे घालूनि कोंडणी । काय चक्रपाणी निजलेती ॥ध्रु.॥

एकवेळ जेणें पुत्राच्या उद्देशें । घेतल्याचें कैसें नेलें दुःख ॥२॥

तुका म्हणे अहो वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमचिया ॥३॥

१५३८

उगविल्या गुंती । ऐशा मागें नेणों किती ॥१॥

ख्यात केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ॥ध्रु.॥

मोकलिला प्रायश्चित्ती । कोणी न धरिती हातीं ॥२॥

तुका म्हणे मुक्त वाट । वैकुंठीची घडघडाट ॥३॥

१५३९

सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा । हरि बा गोविंदा रामकृष्णा ॥१॥

पुण्य पर्वकाळ तीर्थे ही सकळ । कथा सिंधुजळ न्हाऊं येती ॥ध्रु.॥

अवघे चि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एके ठायीं ॥२॥

सेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे एक ॥३॥

तुका म्हणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभ चि ॥४॥

१५४०

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥१॥

तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकाच्या ॥ध्रु.॥

देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥२॥

काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥३॥

तुका म्हणे देवभक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥४॥

१५४१

पाप ताप दैन्य जाय उठाउठीं । जालिया भेटी हरिदासांची ॥१॥

ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तिर्थे जगीं दानें व्रतें ॥ध्रु.॥

चरणींचे रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ॥२॥

भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेंदी पाव हात कांहीं ॥३॥

तुका म्हणे मन जालें समाधान । देखिले चरण वैष्णवांचे ॥४॥

१५४२

येणें बोधें आम्ही असों सर्वकाळ । करूनि निर्मळ हरिकथा ॥१॥

आम्ही भूमीवरी एक देवांचे । निधान हें वाचे सांपडलें ॥ध्रु.॥

तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आइकतां सुखरूप ॥२॥

न चळे हा मंत्र न म्हणों यातीकुळ । न लगे काळ वेळ विचारावी ॥३॥

तुका म्हणे माझा विठ्ठल विसांवा । सांटवीन हांवा हृदयांत ॥४॥

१५४३

बहुतां जन्मींचें संचित । सबळ होय जरि बहुत । तरि चि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं ॥१॥

म्हणवी म्हणियारा तयांचा । दास आपुल्या दासांचा । अनुसरले वाचा । काया मनें विठ्ठलीं ॥ध्रु.॥

असे भूतदया मानसीं । अवघा देखे हृषीकेशी । जीवें न विसंबे तयासी । मागें मागें हिंडतसे ॥२॥

तुका म्हणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर । जे जे अनुसरले नर । तयां जन्म चुकलें ॥३॥

१५४४

तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ॥१॥

लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ॥ध्रु.॥

जाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥२॥

तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ॥३॥

१५४५

आळवीन स्वरें । कैशा मधुरा उत्तरें ॥१॥

यें वो यें वो पांडुरंगे । प्रेमपान्हा मज दें गे ॥ध्रु.॥

पसरूनि चोंची । वचन हें करुणेची ॥२॥

तुका म्हणे बळी । आम्ही लडिवाळें आळीं ॥३॥

१५४६

सकळिकांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ॥१॥

रूप दाखवीं रे आतां । सहजरभुजांच्या मंडिता ॥ध्रु.॥

शंखचक्रपद्मगदा । गरुडासहित ये गोविंदा ॥२॥

तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयनां ॥३॥

१५४७

पतितपावना । दिनानाथा नारायणा ॥१॥

तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ध्रु.॥

ब्रम्हांडनायका । भक्तजनाच्या पाळका ॥२॥

जीवांचिया जीवा । तुका म्हणे देवदेवा ॥३॥

१५४८

करीं हें चि काम । मना जपें राम राम ॥१॥

लागो हा चि छंद । मना गोविंद गोविंद ॥२॥

तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ॥३॥

१५४९

आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ॥१॥

नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत ॥धृ.॥

आघात निवारी । छाया पीतांबरें करी ॥२॥

उभा कर कटीं । तुका म्हणे याजसाटीं ॥३॥

१५५०

साधावया भक्तिकाज । नाहीं लाज हा धरीत ॥१॥

ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ॥धृ.॥

भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ॥२॥

तुका म्हणे साक्ष हातीं । तो म्यां चित्ती धरियेला ॥३॥

१५५१

धेनु चरे वनांतरीं । चत्ति बाळकापें घरीं ॥१॥

तैसें करीं वो माझे आईं । ठाव देऊनि राखें पायीं ॥धृ.॥

न काढितां तळमळी । जिवनाबाहेर मासोळी ॥२॥

तुका म्हणे कुडी । जीवाप्राणांची आवडी ॥३॥

१५५२

हरिजनाची कोणां न घडावी निंदा । साहात गोविंदा नाहीं त्याचें ॥१॥

रूपा येऊनियां धरी अवतार । भक्तां अभयंकर खळां कष्ट ॥धृ.॥

दुर्वास हा छळों आला आंबऋषी । सुदर्शन त्यासी जाळित फिरे ॥२॥

द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति । होऊनि श्रीपति साहे केलें ॥३॥

न साहे चि बभ्रु पांडवां पारिखा । धुडाविला सखा बळिभद्र ॥४॥

तुका म्हणे अंगीं राखिली दुर्गंधि । अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां ॥५॥

१५५३

ज्यासी आवडी हरिनामांची । तो चि एक बहु शुचि ॥१॥

जपतो हरिनामें बीज । तो चि वर्णांमाजी द्विज ॥२॥

तुका म्हणे वर्णा धर्म । अवघें आहे सम ब्रम्ह ॥३॥

१५५४

विठ्ठल हा चित्ती । गोड लागे गातां गीतीं ॥१॥

आम्हां विठ्ठल जीवन । टाळ चिपळिया धन ॥धृ.॥

विठ्ठल हे वाणी । अमृत हे संजिवनी ॥२॥

रंगला या रंगें । तुका विठ्ठल सर्वांगें ॥३॥

१५५५

विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ॥१॥

भाग्यवंता छंद मनीं । कोडें कानीं ऐकती ॥धृ.॥

विठ्ठल हें दैवत भोळें । चाड काळें न धरावी ॥२॥

तुका म्हणे भलते याती । विठ्ठल चित्ती ते शुद्ध ॥३॥

१५५६

म्हणे विठ्ठल ब्रम्ह नव्हे । त्याचे बोल नाइकावे ॥१॥

मग तो हो का कोणी एक । आदि करोनि ब्रम्हादिक ॥ध्रु.॥

नाहीं विठ्ठल जया ठावा । तो ही डोळां न पाहावा ॥२॥

तुका म्हणे नाहीं । त्याची भीड मज कांहीं ॥३॥

१५५७

एक पाहातसां एकांचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नव्हा ॥१॥

मारा हाक देवा भय अटाहासें । जंव काळाऐसें जालें नाहीं ॥ध्रु.॥

मरणांची तंव गांठोडी पदरीं । जिणें तो चि वरि माप भरी ॥२॥

तुका म्हणे धींग वाहाती मारग । अंगा आलें मग हालों नेदी ॥३॥

१५५८

संतांसी तों नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरितो ॥१॥

म्हणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ॥ध्रु.॥

भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ॥२॥

तुका म्हणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥३॥

१५५९

संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥१॥

हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ॥ध्रु.॥

ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ॥२॥

तुका म्हणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं विचार त्या ॥३॥

१५६०

जातीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ॥१॥

ते काय गुण लागती येरां । कागा पिंजरा शोभेना ॥ध्रु.॥

शिकविलें तें सुजात सोसी । मग तयासी मोल चढे ॥२॥

तुका म्हणे वेषधारी । हिजड्या नारी नव्हती ॥३॥

१५६१

वसनें थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥१॥

नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ॥ध्रु.॥

फुगातें काउळें । म्हणे मी राजहंसा आगळें ॥२॥

गजाहूनि खर । म्हणे चांगला मी फार ॥३॥

मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ॥४॥

१५६२

मुक्त होता परी बळें जाला बद्ध । घेउनियां छंद माझें माझें ॥१॥

पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ॥२॥

तुका म्हणे वांयां गेलें वांयां विण । जैसा मृगशीण मृगजळीं ॥३॥

१५६३

पंढरीये माझें माहेर साजणी । ओविये कांडणीं गाऊं गीत ॥१॥

राही रखुमाईं सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥ध्रु.॥

उद्धव अक्रूर व्यास आंबऋषि । भाईं नारदासी गौरवीन ॥२॥

गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ॥३॥

मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥४॥

निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥५॥

नागोजन मित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईंरिया ॥६॥

परसो भागवता सुरदास सांवता । गाईंन नेणतां सकळांसी ॥७॥

चोखामेळा संत जिवाचे सोइरे । न पडे विसर यांचा घडी ॥८॥

जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाटका कान्हया मिराबाईं ॥९॥

आणीक हे संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ॥१०॥

आनंदें ओविया गाईंन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥११॥

तुका म्हणे माझा बळिया बापमाय । हरुषें नांदों सये घराचारी ॥१२॥

१५६४

पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोदेशीं ॥१॥

पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ध्रु.॥

जप तप अनुष्ठान । पोटासाटीं जाले दीन ॥२॥

पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ॥३॥

पोट काशियानें भरे । तुका म्हणे झुरझुरूं मरे ॥४॥

आरत्या ॥ १३ ॥

१५६५

जगदेश जगदेश तुज म्हणती । परि या जनामाजी असशील युक्ति ।

पुण्यपापविरहित सकळां अधिपति । दृष्टा परि नळणी अलिप्त गति ॥१॥

जय देव जय देव जय पंढरिनाथा । श्रीपंढरिनाथा । नुरे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ॥ध्रु.॥

आगम निगम तुज नेणती कोणी । परि तूं भाव भक्ति जवळी च दोन्ही ।

नेणतां विधियुक्त राते पूजेनी । न माये ब्रम्हांडीं संपुष्टशयनीं ॥२॥

असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरी मुखएक चावितो धुडें ।

भक्ता शरणागता चाले तो पुढें । दावी वाट जाऊ नेदी वांकडें ॥३॥

एकाएकीं बहु विस्तरला सुखें । खेळे त्याची लीळा तो चि कवतुकें।

तेथें नरनारी कवण बाळकें । काय पापपुण्य कवण सुखदुःखें ॥४॥

सकळा वर्मा तूं चि जाणशी एक । बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख।

जाणों म्हणतां तुज टकलीं बहुतेकें । तुका म्हणे शरण आलों मज राखें ॥५॥

१५६६

दैत्यभारें पीडिली पृथुवी बाळा । म्हणोनि तूज येणें जालें गोपाळा ।

भक्तिप्रतिपाळक उत्सव सोहळा । मंगळें तुज गाती आबळ बाळा ॥१॥

जय देव जय देव जय गरुडध्वजा । श्रीगरुडध्वजा । आरती ओवाळूं तुज भक्तीकाजा ॥ध्रु.॥

गुण रूप नाम नाहीं जयासी । चिंतितां तैसा चि होसी तयांसी ।

मत्स्य कूर्म वराह नरसिंह जालासी । असुरां काळ मुणि ठाके ध्यानासी ॥२॥

सहजर रूपें नाम सांवळा ना गोरा । श्रुति नेती म्हणती तुज विश्वंभरा ।

जीवनां जीवन तूं चि होसी दातारा । न कळे पार ब्रम्हादिकां सुरवरां ॥३॥

संतां महंतां घरीं म्हणवी म्हणियारा । शंखचक्रगदाआयुधांचा भारा ।

सुदर्शन घरटी फिरे अवश्वरा । सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ॥४॥

भावेंविण तुझें न घडे पूजन । सकळ ही गंगा जाल्या तुजपासून ।

उत्पत्ति प्रळय तू चि करिसी पाळण । धरूनि राहिला तुका निश्चयीं चरण ॥५॥

१५६७

काय तुझा महिमा वर्णू मी किती । नामें मात्रे भवपाश तुटती ।

पाहातां पाउले हे विष्णुमूर्ती । कोटिकुळां सहित जे उद्धरती ॥१॥

जय देव जय देव जय पंढरिराया । श्रीपंढरिराया। करुनियां कुरवंडी । सांडीन काया ॥धृ.॥

मंगळआरतीचा थोर महिमा । आणीक द्यावया नाहीं उपमा ।

श्रीमुखासहित देखे जो कर्मा । पासुन सुटे जैसा रवि नासी तमा ॥२॥

धन्य व्रतकाळ हे एकादशी । जागरण उपवास घडे जयांसी ।

विष्णूचें पूजन एकाभावेंसी । नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ॥३॥

न वजे वांयां काळ जे तुज ध्याती । असे तुझा वास तयांच्या चित्ती ।

धालें सुखें सदा प्रेमें डुल्लती । तीर्थे मळिन वास तयांचा वाहाती ॥४॥

देव भक्त तूं चि जालासी दोन्ही । वाढावया सुख भक्ति हे जनीं ।

जड जीवां उद्धार होय लागोनि । शरण तुका वंदी पाउलें दोन्ही ॥५॥

१५६८

कंसरायें गर्भ वधियेले सात । म्हणोनि गोकुळासी आले अनंत ।

घ्यावया अवतार जालें हें चि निमित्य । असुर संहारूनि तारावे भक्त ॥१॥

जय देव जय देव जय विश्वरूपा । श्रीविश्वरूपा । ओवाळीन तुज देहदीपें बापा ॥ध्रु.॥

स्थूळरूप होऊनि धरितसे सानें । जैसा भाव तैसा तयांकारणें ।

दैत्यांसी भासला सिहीं गजान । काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ॥२॥

अनंत वर्णी कोणा न कळे चि पार । सगुण कीं निर्गुण हा ही निर्धार ।

पांगलीं साईं अठरा करितां वेव्हार । तो वळितसे गौळियांचें खिल्लार ॥३॥

तेहतिस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ । पाउलें पाताळीं नेणती स्वर्ग मुगुट ।

गिळिलीं चौदा भूवनें तरि न भरे चि पोट । तो खाउन धाला गोपाळाचें उच्छिष्ट ॥४॥

महिमा वर्णू तरि पांगलिया श्रुति । सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुती ।

भावेंविण कांहीं न चले चि युक्ति । राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ॥५॥

१५६९

परमानंदा परमपुरुषोत्तमरामा । अच्युता अनंता हरि मेघश्यामा ।

अविनाशा अलक्षा परता परब्रम्हा । अकळकळा कमळापती न कळे महिमा ॥१॥

जय देव जय देव जया जी श्रीपती । मंगळशुभदायका करीन आरती ॥ध्रु.॥

गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा । गिरिधरकर भवसागरतारक दधिमथना ।

मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा । दीनवत्सळ सकळां मूळ जय जयनिधाना ॥२॥

विश्वंभरा सर्वेश्वर जगदाधारा । चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा ।

सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा । कल्याणकैवल्यमूर्ति मनोहरा ॥३॥

गरुडासना शेषशयना नरहरी । नारायणा ध्याना सुरहरवरगौरी ।

नंदा नंदनवंदन त्रिभुवनांभीतरी । अनंतनामीं ठसा अवतारांवरी ॥४॥

सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंत संतां । भगवाना भगवंता कालकृदांता ।

उत्पत्तिपाळणपासुन संहारणसत्ता । शरण तुकयाबंधु तारीं रिति बहुतां ॥५॥

१५७०

पंढरि पुण्यभूमी भीमा दिक्षणावाहिनी । तीर्थ हें चंद्रभागा महा पातकां धुनी ।

उतरलें वैकुंठमहासुख मेदिनी ॥१॥

जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा । आरती ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ॥ध्रु.॥

नित्य नवा सोहळा हो महावाद्यां गजर । सन्मुख गरुड पारीं उभा जोडुनि कर ।

मंडितचतुर्भुजा कटीं मिरवती कर ॥२॥

हरिनाम कीर्तन हो आनंद महाद्वारीं । नाचती प्रेमसुखें नर तेथिंच्या नारी ।

जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ॥३॥

आषाढी कार्तिकी हो गरुडटकयां भार । गर्जती नाम घोष महावैष्णववीर ।

पापासी रीग नाहीं असुर कांपती सुर ॥४॥

हें सुख पुंडलिकें कसें आणिलें बापें । निर्गुण साकारले आम्हांलागिं हें सोपें ।

म्हणोनि चरण धरोनि तुका राहिला सुखें ॥५॥

१५७१

अवतार गोकुळीं हो जन तारावयासी । लावण्यरूपडें हे तेजपुंजाळरासी ।

उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी । उत्साव सुरवरां मही थोर मानसीं ॥१॥

जय देवा कृष्णनाथा जय रखुमाईकांता । आरती ओंवाळीन तुम्हां देवकीसुता ।

जय देवा कृष्णनाथा ॥ध्रु.॥

वसुदेवदेवकीची बंद फोडुनी शाळ । होउनि विश्वजनिता तया पोटिंचा बाळ ।

दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ । राजया उग्रसेना केला मथुरापाळ ॥२॥

राखतां गोधनें हो इंद्र कोपला वरि । मेघ जो कडाडिला शिळा वर्षतां धारीं ।

राखिलें गोकुळ हें नखीं धरिला गिरी । निर्भय लोकपाळ अवतरले हरी ॥३॥

कौतुक पाहावया माव ब्रम्ह्यानें केली । वत्सें चोरोनियां सत्यलोकासि नेलीं ।

गोपाळ गाईंवत्सें दोहीं ठायीं राखीलीं । सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माउली ॥४॥

तारिलें भक्तजना दैत्य निर्दाळूनि । पांडवां साहकारी आडल्यां निर्वाणी ।

गुण मी काय वर्णूं मति केवढी वाणी । विनवितो दास तुका ठाव देई चरणीं ॥५॥

१५७२

सुंदर अंगकांती मुखें भाळ सुरेख । बाणली उटी अंगीं टिळा साजिरी रेख ।

मस्तकीं मुगुट कानीं कुंडलां तेज फांके । आरक्त दंत हिरे कैसे शोभले निके ॥१॥

जय देवा चुतर्भुजा जया लावण्यतेजा । आरती ओवाळीन भवतारिया हा वोजा ।
जय. ॥ध्रु.॥

उदार जुंझार हा जया वाणिती श्रुति । परतल्या नेति म्हणती तयां न कळे गति ।

भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती । पांगलीं साही अठरा रूप न गति ॥२॥

ऐकोनि रूप ऐसें तुजलागीं धुंडिती । बोडके नग्न एक निराहार ईति ।

साधनें योग नाना तपें दारुण किती । सांडिलें सुख दिली संसारा शांती ॥३॥

भरूनि माजी लोकां तिहीं नांदसि एक । कामिनी मनमोहना रूप नाम अनेक ।

नासति नाममात्रें भवपातकें शोक । पाउलें वंदिताती सिद्ध आणि साधक ॥४॥

उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज । तत्वासि तत्वसार मूळ जालासी बीज ।

खेळसि बाळलीळा अवतार सहज । विनवितो दास तुका कर जोडोनि तुज ॥५॥

१५७३

सकुमार मुखकमळ निजसारनिर्मळ । सावळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ ।

झळकति दिव्य तेजें दंत माज पातळ । मिरवलिं मयोरपत्रें मुगुट कुंडलें माळ ॥१॥

जय देवा जगदीश्वरा । धन्य रखुमाईवरा । आरती करीन काया । ओंवाळिन सुंदरा । जय. ॥ध्रु.॥

गोजिरें ठाणमाण भुजा मंडित चारी । शोभति शंखचक्रगदापद्म मोहरी ।

हृदयीं ब्रम्हपद बाणलें शृंगारीं । गर्जति चरणीं वांकी कंठ कोकळिास्वरीं ॥२॥

घवघवित उटी अंगीं बावन चंदनांची । लल्हाट कस्तुरिचा कास पितांबरीची ।

कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची । संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ॥३॥

सौभाग्यसुख सागर गुणलावण्यखाणी । लाघवी दीनवत्सळ विश्व लाविलें ध्यानीं ।

आश्चर्य देव करिती ऋषि राहिले मुनि । धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ॥४॥

वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति । रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती ।

उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति । तुकयाबंधु म्हणे स्तवूं मी काय किती ॥५॥

१५७४

महा जी महादेवा महाकाळमर्दना । मांडियेलें उग्रतप महादीप्त दारुणा ।

परिधान व्याघ्रांबर चिदाभस्मलेपना । स्मशान क्रीडास्थळ तुम्हा जी त्रिनयना ॥१॥

जय देवा हरेश्वरा जय पार्वतीवरा । आरती ओंवाळिन कैवल्यदातारा । जय. ॥ध्रु.॥

रुद्र हें नाम तुम्हां उग्र संहारासी । शंकर शिव भोळा उदार सर्वस्वीं ।

उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देसी । आपुलें पद दासां ठाव देई कैलासीं ॥२॥

त्रैलोक्यव्यापका हो जन आणि विजन । विराटस्वरूप हें तुझें साजिरें ध्यान ।

करितो वेद स्तुती कीर्ती मुखें आपण । जाणतां नेणवे हो तुमचें महिमान ॥३॥

बोलतां नाम महिमा असे आश्चर्य जगीं । उपदेश केल्यानंतरें पापें पळती वेगीं ।

हरहर वाणी गर्जे प्रेम संचरे अंगीं । राहिलि दृष्टी चरणीं रंग मीनला रंगीं ॥४॥

पुजूनि लिंग उभा तुका जोडोनी हात । करिती विज्ञापना परिसावी हे मात ।

अखंड राहूं द्यावें माझें चरणीं चत्ति । घातले साष्टांग मागे मस्तकीं हात ॥५॥

१५७५

अवतारनामभेद गणा आदि अगाद । जयासि पार नाहीं पुढें खुंटला वाद ।

एक चि दंत शोभे मुख विक्राळ दोंद । ब्रम्हांडामाजि दावी अनंत हे छंद ॥१॥

जय जया गणपती ओंवाळित आरती । साजिऱ्या सरळ भुजा फरशकमळ शोभती ॥धृ.॥

हे मही ठेंगणी हो तुज नृत्यनायका । भोंवरि फेर देतां असुर मदिले एकां ।

घातले तोडरीं हो भक्तजनपाळका । सहस्र नाम तुज भक्तिमुक्तिदायका ॥२॥

सुंदर शोभला हो रूपें लोपलीं तेजें । उपमा काय देऊं असे आणिक दुजें ।

रविशशितारागणें जयामाजी सहजें । उदरी सामावलीं जया ब्रम्हांडबीजें ॥३॥

वर्णिता शेष लीळा तया भागलीं मुखें । पांगुळले वेद चारी कैसे राहिले सुखें ।

अवतार जन्मला हो लिंगनाभी या मुखें । अमूर्त मूर्तिमंत होय भक्तीच्या सुखें ॥४॥

विश्व हें रूप तुझें हस्त पाद मुखडें । ऐसा चि भाव देई तया नाचतां पुढें ।

धूप दीप पंचारति ओंवाळिन निवाडें । राखें या शरणागता तुका खेळतां लाडें ॥५॥

१५७६

कनकाच्या परियेळीं उजळूनि आरती । रत्नदीपशोभा कैशा पाजळल्या ज्योती ॥१॥

ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा । राहिरखुमाईसत्यभामेच्या वरा ॥धृ.॥

मंडितचतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें । श्रीमुखाची शोभा पाहातां तेज फांकलें ॥२॥

वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत । शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥३॥

सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा । चरणीचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ॥४॥

ओंवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं । समदृष्टि समाधि तुकया लागली पायीं ॥५॥

१५७७

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती ॥१॥

ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडोनि चरणीं ठेवीन माथा ॥ध्रु.॥

काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती । कोटि ब्रम्हहत्या मुख पाहतां जाती ॥२॥

राही रखुमाईं दोही दों बाही । मयूर पिच्छचामरें ढाळिति ठायीं ठायीं ॥३॥

तुका म्हणे दीप घेऊनि उन्मनति शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥४॥

॥१३॥

१५७८

धन्य दिवस आजि दरुषण संतांचें । नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ॥१॥

धन्य पुण्य रूप कैसा जालें संसार । देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ॥ध्रु.॥

धन्य पूर्व पुण्य वोडवलें निरुतें । संतांचें दर्शन जालें भाग्यें बहुतें ॥२॥

तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी । संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ॥३॥

१५७९

गाऊं वाणूं तुज विठो तुझा करूं अनुवाद । जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥१॥

आनंद रे विठोबा जाला माझे मनीं । देखिले लोचनीं विटेसहित पाउले ॥ध्रु.॥

न करीं तपसाधनें रे मुक्तीचे सायास । हा चि जन्मोजन्मी गोड भक्तीचा रस ॥२॥

तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें काईं । पंढरीचा राणा सांटविला हृदयीं ॥३॥

१५८०

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहें पांडुरंगा ॥१॥

या संतांसी निरवीं हें मज देई । आणिक दुजें काहीं न मगें तुज ॥२॥

तुका म्हणे आतां उदार होई । मज ठेवीं पायीं संतांचिया ॥३॥

स्वामींनीं काया ब्रम्ह केली ते अभंग ॥ २४ ॥

१५८१

शोधितां चि नये । म्हणोनि वोळगतों पाये ॥१॥

आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥ध्रु.॥

परतोनि मन । गेलें ठायीं चि मुरोन ॥२॥

विसरला तुका । बोलों चालों जाला मुका ॥३॥

१५८२

रज्जुसर्पाकार । भासयेलें जगडंबर ॥१॥

म्हणोनि आठवती पाय । घेतों आलाय बलाय ॥ध्रु.॥

द्रुश द्रुमाकार लाणी । केलों सर्व सासी धणी ॥२॥

तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनि उरला लोकां ॥३॥

१५८३

म्हणवितों दास । परि मी असें उदास ॥१॥

हा चि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनि दुजा ॥ध्रु.॥

सरतें कर्तुत्व माझ्यानें । परि मी त्याही हून भिन्न ॥२॥

तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ॥१॥

१५८४

घोंटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥१॥

ब्रम्हभूत होते काया च कीर्तनीं । भाग्य तरी ॠणी देवा ऐसा ॥ध्रु.॥

तीर्थ भ्रमकासी आणीन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ॥२॥

सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञा आणि दान लाजवीन ॥३॥

भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रम्हींचा जो अर्थ निजठेवा ॥४॥

धन्य म्हणवीन येहे लोकीं लोकां । भाग्य आम्हीं तुका देखियेला ॥५॥

१५८५

संसाराचे अंगीं अवघीं च वेसनें । आम्ही या कीर्तनें शुद्ध जालों ॥१॥

आतां हें सोंवळें जालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ॥ध्रु.॥

ब्रम्हपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥२॥

तुका म्हणे आम्हां एकांताचा वास । ब्रम्हीं ब्रम्हरस सेवूं सदा ॥३॥

१५८६

तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ॥१॥

एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ॥ध्रु.॥

भाकूनि करुणा । विनवा वैकुंठींचा राणा ॥२॥

तुका म्हणे मज आठवा । मुळ लवकरी पाठवा ॥३॥

१५८७

आपुल्या माहेरा जाईंन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ॥१॥

सुख दुःख माझें ऐकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥ध्रु.॥

करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसें एकें न्यावयासी ॥२॥

त्या चि पंथें माझें लागलेंसे चत्ति । वाट पाहें नित्य माहेराची ॥३॥

तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥४॥

१५८८

चिन्हें उमटताती अंगीं । शकुना जोगीं उत्तम ॥१॥

आठवला बापमाय । येइल काय मूळ नेणों ॥ध्रु.॥

उत्कंठित जालें मन । ते चि खुण तेथींचि ॥२॥

तुका म्हणे काम वारीं । आळस घरीं करमेना ॥३॥

१५८९

आरोनियां पाहे वाट । कटकट सोसेना ॥१॥

आलियांस पुसें मात । तेथें चत्ति लागलें ॥ध्रु.॥

दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसें ते ठायीं ॥२॥

तुका म्हणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥३॥

१५९०

येथीलिया अनुभवें । कळों जीवें हें येतसे ॥१॥

दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥ध्रु.॥

भूक भुके चि खाउनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥२॥

तुका म्हणे सुख जालें । अंतर धालें त्यागुणें ॥३॥

१५९१

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥१॥

गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरे ॥ध्रु.॥

मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥२॥

मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥३॥

चुतर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥४॥

पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥५॥

तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥६॥

१५९२

शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥१॥

ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥ध्रु.॥

दुरूनि येतां दिसे दृष्टी । धाकें दोष पळती सृष्टी ॥२॥

तुका देखोनि एकला । वैकुंठींहूनि हरि आला ॥३॥

१५९३

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥१॥

आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ।

सुख वाटे मना । डोळे बाहया स्फुरती ॥ध्रु.॥

उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥२॥

तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥३॥

१५९४

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥१॥

तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ।

फेडावया धणी । प्रेमसुखाची आजि ॥ध्रु.॥

पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥२॥

आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥३॥

१५९५

पाहुणे घरासी । आजि आले हृषीकेशी ॥१॥

काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।

कण्या दरदर । पाण्यामाजी रांधिल्या ॥ध्रु.॥

घरीं मोडकिया बाजा । वरि वाकळांच्या शेजा ॥२॥

मुखशुद्धि तुळसी दळ । तुका म्हणे मी दुर्बळ ॥३॥

१५९६

संतीं केला अंगीकार । त्यासी अभिमान थोर ॥१॥

कांहीं ठेविलें चरणीं । घेतीं तें चि पुरवूनि ।

तुका पायवणी । घेऊनियां निराळा ॥ध्रु.॥

नसतां कांहीं संचित । भेटी जाली अवचित ॥२॥

देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ॥३॥

१५९७

अवघियांच्या आलों मुळें । एका वेळे न्यावया ॥१॥

सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ध्रु.॥

जोंवरि ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥२॥

मंगळाचे वेळे उभे । असों शोभे सावध ॥३॥

अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥४॥

तुका म्हणे पाहें वाट । बहु आट करूनि ॥५॥

१५९८

सकळ ही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुम्हीं ॥१॥

कर्मधर्में तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ध्रु.॥

वाढवूनि दिलों एकाचिये हातीं । सकळ निश्चिंती जाली तेथें ॥२॥

आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । माझिया भावें अनुसरलों ॥३॥

वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥४॥

धर्म अर्थ काम जाला एके ठायीं । मेळविला जिंहीं हाता हात ॥५॥

तुका म्हणे आतां जाली हे चि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥६॥

१५९९

बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गांठी ॥१॥

जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आम्ही करूं कोठें ॥ध्रु.॥

न घडे यावरि न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ॥२॥

तुका म्हणे तुम्ही दिसे मोकलिलें । काय आतां आलें जीवित्वाचें ॥३॥

१६००

करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥१॥

अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥ध्रु.॥

दुजयाची सत्ता । न चलेसी जाली आतां ॥२॥

आतां नाहीं तुका । पुन्हा हारपला लोकां ॥३॥

१६०१

आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ॥१॥

वाडवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥२॥

अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥३॥

१६०२

तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ॥१॥

नित्य करितों कीर्तन । हें चि माझें अनुष्ठान ॥ध्रु.॥

तुका बैसला विमानीं । संत पाहाती लोचनीं ॥२॥

देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ॥३॥

१६०३

न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥१॥

कृपेचिये सिंव्हासनीं । अधिष्ठानीं बैसविलें ॥ध्रु.॥

वाजता तो नलगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥२॥

तुका म्हणें अवघें ठायीं । मज पायीं राखिलें ॥३॥

१६०४

वाराणसीपयपत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥१॥

येथूनियां आम्हां जाणें निजधामा । सवें असे आम्हां गरुड हा ॥२॥

कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातोंसों माहेरी तुका म्हणे ॥३॥

॥२४॥

शखे १५७१ एकाहत्तरीं विरोधनामसंवत्सरीं फालगुनवद्य

द्वितीया सोमवासरीं प्रथमप्रहरीं तुकोबा गुप्त जाले ॥१॥

१६०५

जाती पंढरीस । म्हणे जाईंन तयांस ॥१॥

तया आहे संवसार । ऐसें बोले तो माहार ॥ध्रु.॥

असो नसो भाव । जो हा देखे पंढरिराव ॥२॥

चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलते याती ॥३॥

१६०६

धरियेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ॥१॥

तें हें ब्रम्ह विटेवरी । उभें चंद्रभागे तिरीं ॥ध्रु.॥

अंतर व्यापी बाहे । धांडोळितां कोठें नोहे ॥२॥

योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ॥३॥

दिले नेदी जति । भोग सकळ ज्या होती ॥४॥

अवघी लीळा पाहे । तुका म्हणे दासां साहे ॥५॥

१६०७

ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥१॥

तो हा पंढरीचा राणा । पुसा सा चौं अठरा जणां ॥ध्रु.॥

चिंतितां जयासी । भुक्तिमुक्ति कामारी दासी ॥२॥

वैकुंठासी जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ॥३॥

१६०८

ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन्य पडे ॥१॥

तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुती ॥ध्रु.॥

सिणलें सहजर तोंडें । शेषाफणी ऐसें धेंडें ॥२॥

तुका म्हणे मही । पत्र सिंधु न पुरे शाही ॥३॥

१६०९

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥१॥

न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तें ही अमृत पाहीं ॥ध्रु.॥

न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं कधीं यमबाधा ॥२॥

तुका म्हणे नारायण । येता गोऱ्या वारी वाण ॥३॥

१६१०

कोठे गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ॥१॥

दिनानाथ ब्रीद सांभाळीं आपुले । नको पाहों केलें पापपुण्य ॥ध्रु.॥

पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरिले ॥२॥

तुकयाबंधु म्हणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ॥३॥

१६११

कोठें गुंतलासी कोणांच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज ॥१॥

कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटेती मुखें गोपिकांचीं ॥ध्रु.॥

काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ॥२॥

काय माझे तुज गुण दोष दिसती । म्हणोनि श्रीपती कोपलासी ॥३॥

काय जालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका म्हणे ॥४॥

१६१२

परस्त्रीतें म्हणतां माता । चत्ति लाजवितें चित्ती ॥१॥

काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ध्रु.॥

धर्मधारष्टिगोष्टी सांगे । उष्ट्या हाते नुडवी काग ॥२॥

जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥३॥

बोले तैसा चाले । तुका म्हणे तो अमोल ॥४॥

१६१३

असत्य वचन होतां सर्व जोडी । जरी लग्नघडी परउपकार ॥१॥

जाईल पतना यासि संदेह नाहीं । साक्ष आहे कांहीं सांगतों ते ॥ध्रु.॥

वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ठ त्या कर्मासाटीं गेला ॥२॥

तुका म्हणे आतां सांभळा रे पुढें । अंतरिंचे कुडें देइल दुःख ॥३॥

१६१४

जळों त्याचें तोंड । ऐसी कां ते व्याली रांड ॥१॥

सदा भोवयासी गांठी । क्रोध धडधडीत पोटीं ॥ध्रु.॥

फोडिली गोंवरी । ऐसी दिसे तोंडावरी ॥२॥

तुका म्हणे नाहीं । चित्ती समाधान कांहीं ॥३॥

१६१५

तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ॥१॥

एक ऐसे ते शाहाणे । आपुले अधीन तें नेणें ॥ध्रु.॥

कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥२॥

खेळे जुतकर्म । मग बोंबली जुलूम ॥३॥

निजतां आला मोहो । वीतां म्हणे मेला गोहो ॥४॥

तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥५॥

१६१६

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥१॥

तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविण दुजें ॥ध्रु.॥

सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळावसंतेंसी ॥२॥

तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ॥३॥

१६१७

पंडित म्हणतां थोर सुख । परि तो पाहातां अवघा मूर्ख ॥१॥

काय करावें घोकिलें । वेदपठण वांयां गेलें ॥ध्रु.॥

वेदीं सांगितलें तें न करी । सम ब्रम्ह नेणे दुराचारी ॥२॥

तुका देखे जीवीं शिव । हा तेथींचा अनुभव ॥३॥

१६१८

पंडित तो चि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥१॥

अवघें सम ब्रम्ह पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ध्रु.॥

रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥२॥

तुका म्हणे तो चि दास । त्यां देखिल्या जाती दोष ॥३॥

१६१९

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥१॥

नका करूं नरस्तुति । माझी परिसा हे विनंती ॥ध्रु.॥

अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा अधीन ॥२॥

तुका म्हणे वाणी । सुखें वेचा नारायणीं ॥३॥

१६२०

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥१॥

विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥ध्रु.॥

विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ॥२॥

विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ॥३॥

१६२१

काय तुझें वेचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥१॥

काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ॥ध्रु.॥

काय तुझें आम्हां करावें वैकुंठ । भेवों नको भेट आतां मज ॥२॥

तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ॥३॥

१६२२

संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥१॥

त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥ध्रु.॥

संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिता चि नर्कवासी ॥२॥

तुका म्हणे तो नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ॥३॥

१६२३

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥१॥

हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥ध्रु.॥

पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥२॥

तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥३॥

१६२४

निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥१॥

उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे नाना छंदें गोविंद हा ॥ध्रु.॥

मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥२॥

तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमे घाली उडी नामासाटीं ॥३॥

१६२५

काम क्रोध आम्ही वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥१॥

आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले हारपोनि देहभाव ॥ध्रु.॥

रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥२॥

तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रम्हांडाचा ॥३॥

१६२६

उठाउठीं अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ॥१॥

तें या पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ॥ध्रु.॥

अश्रूचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ॥२॥

तुका म्हणे काला । कोठें अभेद देखिला ॥३॥

१६२७

पंढरी पंढरी । म्हणतां पापाची बोहोरी ॥१॥

धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्साव ॥ध्रु.॥

रिद्धिसिद्धी लोटांगणीं । प्रेमसुखाचिया खाणी ॥२॥

अधिक अक्षरानें एका । भूवैकुंठ म्हणे तुका ॥३॥

१६२८

भार घालीं देवा । न लगे देश डोईं घ्यावा ॥१॥

देह प्रारब्धा अधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥ध्रु.॥

व्यवसाय निमत्ति । फळ देतसे संचित ॥२॥

तुका म्हणे फिरे । भोंवडीनें दम जिरे ॥३॥

१६२९

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥१॥

शांती धरणें जिवासाटीं । दशा उत्तम गोमटी ॥ध्रु.॥

देह लेखावें असार । सत्य परउपकार ॥२॥

तुका म्हणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रम्हरसी ॥३॥

१६३०

येथें बोलोनियां काय । व्हावा गुरू तरि जाय ॥१॥

मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथेपुढें ॥ध्रु.॥

ऐकोनि मरसी कथा। जंव आहेसि तुं जीता ॥२॥

हुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ॥३॥

पुसेल कोणी त्यास । जा रे करीं उपदेश ॥४॥

आम्ही विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ॥५॥

घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्त मुखें नाम ॥६॥

तुका म्हणे मुक्ती । नाहीं आस चि ये चित्ती ॥७॥

१६३१

आनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥१॥

मदें माते तया नाहीं देहभाव । आपुले आवेव आवरितां ॥ध्रु.॥

आणिकांची वाणी वेद तेणें मुखें । उपचारदुःखें नाठवती ॥२॥

तें सुख बोलतां आश्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ॥३॥

तुका म्हणे बाह्य रंग तो विठ्ठल । अंतर निवालें ब्रम्हरसें ॥४॥

१६३२

ब्रम्हरसगोडी तयांसी फावली । वासना निमाली सकळ ज्यांची ॥१॥

नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळीं । उपाधीवेगळीं जाणिवेच्या ॥ध्रु.॥

मन हें निश्चळ जालें एके ठायीं । तयां उणें काईं निजसुखा ॥२॥

तीं चि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारीनरलोकां ॥३॥

तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥ ४॥

१६३३

जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥१॥

दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ॥ध्रु.॥

मागों नेणे परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ॥२॥

तुका म्हणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥३॥

१६३४

आम्हां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रैलोकीं ॥१॥

देव उभा मागें-पुढें । उगवी कोडें संकट ॥ध्रु.॥

जैसा केला तैसा होय । धांवे सोय धरोनि ॥२॥

तुका म्हणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥३॥

१६३५

परद्रव्यपरनारीचा अभिळास । तेथूनि हारास सर्वभाग्या ॥१॥

घटिका दिवस मास वरुषें लागेतीन । बांधलें पतन गांठोडीस ॥ध्रु.॥

पुढें घात त्याचा रोकडा शकुन । पुढें करी गुण निश्चयेंसी ॥२॥

तुका म्हणे एकां तडतांथवड । काळ लागे नाड परी खरा ॥३॥

१६३६

समर्थाचें केलें । कोणां जाईल मोडिलें ॥१॥

वांयां करावी ते उरे । खटपटें सोस पुरे ॥ध्रु.॥

ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥२॥

ज्याचें त्याचें हातीं । भुके तयाची फजिती ॥३॥

तुका म्हणे कोटी । बाळे जाले शूळ पोटी ॥४॥

१६३७

हे माझी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ॥१॥

याचा धरीन अभिमान । करीन आपुलें जतन ॥ध्रु.॥

देऊनियां जीव । बळी साधिला हा ठाव ॥२॥

तुका म्हणे देवा । जुन्हाट हे माझी सेवा ॥३॥

१६३८

नेणे गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिंती तुझ्या पायीं ॥१॥

कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ॥ध्रु.॥

नेणें निरसं पाप पुण्य नेणें काय । म्हणऊनि पाय धरिले तुझे ॥२॥

वेडा मी अविचार न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा ॥३॥

तुका म्हणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ॥४॥

१६३९

तुझा म्हणऊनि जालों उतराईं । त्याचें वर्म काईं तें मी नेणें ॥१॥

हातीं धरोनियां दावीं मज वाट । पुढें कोण नीट तें चि देवा ॥ध्रु.॥

देवभक्तपण करावें जतन । दोहीं पक्षीं जाण तूं चि बळी ॥२॥

अभिमानें तुज लागली हे लाज । शरणागतां काज करावया ॥३॥

तुका म्हणे बहु नेणता मी फार । म्हणऊनि विचार जाणविला ॥४॥

१६४०

मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥१॥

सर्व सुख लागे घेउनिया पाठी । आवडींचा कंठीं रस ओती ॥ध्रु.॥

पीतांबरें छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ॥२॥

तुका म्हणे हें चि करावें जीवन । वाचे नारायण तान भूक ॥३॥

१६४१

जालों आतां दास । माझे तोडोनियां पाश ॥१॥

ठाव द्यावा पायांपाशीं । मी तो पातकांची राशी ॥ध्रु.॥

सकळ ही गोवा । माझा उगवूनि देवा ॥२॥

तुका म्हणे भय । करा जवळी तें नये ॥३॥

१६४२

अंतरींचें जाणां । तरि कां येऊं दिलें मना ॥१॥

तुमची करावी म्यां सेवा । आतां अव्हेरितां देवा ॥ध्रु.॥

नव्हती मोडामोडी । केली मागें ते चि घडी ॥२॥

तुका म्हणे दिला वाव । पायीं लागों दिला भाव ॥३॥

१६४३

पवित्र होईंन चरित्रउच्चारें । रूपाच्या आधारें गोजिरिया ॥१॥

आपुरती बुद्धी पुण्य नाहीं गांठी । पायीं घालीं मिठी पाहें डोळां ॥ध्रु.॥

गाईंन ओविया शिष्टांच्या आधारें । सारीन विचारें आयुष्या या ॥२॥

तुका म्हणे तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ॥३॥

१६४४

काय ऐसा जन्म जावा वांयांविण । कांहीं तरी ऋण असो माथां ॥१॥

कोणे तरी काळें होईंल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ॥ध्रु.॥

शता एकातरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं होइल दया ॥२॥

तुका म्हणे नाहीं फांकों तरी देत । सर्वांचें उचित सांपडलें ॥३॥

१६४५

नाहीं कोणी दिस जात वांयांविण । साध्य नाहीं सीण लटिका चि ॥१॥

एकाचिये माथां असावें निमत्ति । नसो नाहीं हित कपाळीं तें ॥ध्रु.॥

कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ॥२॥

तुका म्हणे वर्मे कळों येती कांहीं । ओळखी जे नाहीं होईल ते ॥३॥

१६४६

काय करील तें नव्हे विश्वंभर । सेवका दारद्रि लाज नाहीं ॥१॥

मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणे ॥ध्रु.॥

नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकांची ॥२॥

तुका म्हणे नेणों किती वांयां गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ॥३॥

१६४७

संध्या करितोसी केशवाच्या नांवें । आरंभीं तें ठावें नाहीं कैसें ॥१॥

किती या सांगावें करूनि फजित । खळ नेणे हित जवळीं तें ॥ध्रु.॥

माजल्या न कळे उचित तें काय । नेघावें तें खाय घ्यावें सांडी ॥२॥

तुका म्हणे घेती भिंती सवें डोकें । वावसी तें एकें अंधारलीं ॥३॥

१६४८

दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥१॥

तैसे खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ध्रु.॥

काय करावीं तें बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वांयां गेलीं ॥२॥

तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी सवें श्वगॉ ॥३॥

१६४९

सांगावें तें बरें असतें हें पोटीं । दुःख देते खोटी बुद्धी मग ॥१॥

आपला आपण करावा वेव्हार । जिंकोनि अंतर मन ग्वाही ॥ध्रु.॥

नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण बरा मग ॥२॥

तुका म्हणे बहु भ्यालों खटपटे । आतां देवा खोटे शब्द पुरे ॥३॥

वाराणसीस यात्रा चालली तेव्हां स्वामींनीं भागीरथीस पत्र धाडिलें - ते अभंग ॥ ४ ॥

१६५०

परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥

भागीरथी महादोष निवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ॥ध्रु.॥

जीतां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तिरीं । अहिक्यपरत्री सुखरूप ॥२॥

तुका विष्णुदास संतांचें पोसनें । वागपुष्प तेणें पाठविलें ॥३॥

१६५१

तुम्ही विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ ॥१॥

कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥ध्रु.॥

काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पें चि संतोषी ॥२॥

तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥३॥

१६५२

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥१॥

माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ॠण ॥ध्रु.॥

केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥२॥

तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥३॥

॥३॥

१६५३

मथुरेच्या राया । माझें दंडवत पायां ॥१॥

तुमचे कृपेचें पोसनें । माझा समाचार घेणें ॥ध्रु.॥

नाम धरिलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥२॥

जीवींचें ते जाणा । तुका म्हणे नारायणा ॥३॥

१६५४

जाय तिकडे लागे पाठीं । नाहीं तुटी आठवाची ॥१॥

हरूनियां नेलें चत्ति । माझें थीत भांडवल ॥ध्रु.॥

दावूनियां रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥२॥

आणीक तोंडा पडिली मिठी । कान गोठी नाइकती ॥३॥

बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोईं ॥४॥

तुका म्हणे प्रेमधगी । भरली अंगीं अखंड ॥५॥

१६५५

नको ऐसें जालें अन्न । भूक तान ते गेली ॥१॥

गोविंदाची आवडी जीवा । करीन सेवा धणीवरी ॥ध्रु.॥

राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहीचे ॥२॥

देह घरिला त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ॥३॥

जाऊं नेदीं करितां सोस । क्षेमा दोष करवीन ॥४॥

तुका म्हणे या च पाठी । आता साटी जीवाची ॥५॥

१६५६

वाट पाहें हरि कां नये आझूनि । निष्ठ कां मनीं धरियेलें ॥१॥

काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥ध्रु.॥

नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥२॥

नाही आलें कळों अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतो ॥३॥

बहुता दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कृवाळिलें ॥४॥

तुका म्हणे देई एकवेळा भेटी । शीतळ हें पोटीं होइल मग ॥५॥

१६५७

नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ॥१॥

म्हणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे संघष्टणें ॥ध्रु.॥

वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिक चि प्रेम चढे घेतां ॥२॥

तुका म्हणे पांडुरंगे जननिये । घेऊनि कडिये बुझाविलें ॥३॥

१६५८

आतां न करीं सोस । सेवीन हा ब्रम्हरस ॥१॥

सुखें सेवीन अमृत । ब्रम्हपदींचें निश्चित ॥ध्रु.॥

तुमचा निज ठेवा । आम्ही पाडियेला ठावा ॥२॥

तुका म्हणे देवरांया । आतां लपालेती वांयां ॥३॥

१६५९

जेथें जेथें जासी । तेथें मज चि तूं पासी ॥१॥

ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव ॥ध्रु.॥

चत्ति जडलें पायीं । पाळती हें ठायीं ठायीं ॥२॥

तुका म्हणे पोटीं । देव घालुनि सांगें गोष्टी ॥३॥

१६६०

सांपडला हातीं । तरी जाली हे निश्चिंती ॥१॥

नाहीं धांवा घेत मन । इंद्रियांचें समाधान ॥ध्रु.॥

सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ॥२॥

तुका म्हणे काम । निरसुनियां घेतों नाम ॥३॥

१६६१

मुक्तिपांग नाहीं विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती ॥१॥

बैसला गोविंद जडोनियां चित्ती । आदि ते चि अंतीं अवसान ॥ध्रु.॥

भोग नारायणा देऊनि निराळीं । ओविया मंगळीं तो चि गाती ॥२॥

बळ बुद्धी त्यांची उपकारासाटीं । अमृत तें पोटी सांटवलें ॥३॥

दयावेंत तरी देवा च सारिखीं । आपुलीं पारखीं नोळखती ॥४॥

तुका म्हणे त्यांचा जीव तो चि देव । वैकुंठ तो ठाव वसती तो ॥५॥

१६६२

सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं । वैष्णवां चरणीं होइन जोडा ॥१॥

ऐसें जन्म आतां मज देई देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ॥धृ.॥

त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीत ते शिरीं जाइन मागें ॥२॥

तुका म्हणे येथें राहिलासे भाव । सकळ ही वाव जाणोनियां ॥३॥

१६६३

क्षेम देयाला हो । स्फुरताती दंड बाहो ॥१॥

आतां झडझडां चालें । देई उचलूं पाउलें ॥धृ.॥

सांडीं हंसगती । बहु उत्कंठा हे चित्ती ॥२॥

तुका म्हणे आईं । श्रीरंगे विठाबाईं ॥३॥

१६६४

जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ॥१॥

कंठ कंठा मिळे देई । माझा वोरस तूं घेई ॥धृ.॥

नको पीतांबर । सांवरूं हे अळंकार ॥२॥

टाकीं वो भातुकें । लौकिकाचें कवतुकें ॥३॥

हातां पायां नको । कांहीं वेगळालें राखों ॥४॥

तुका म्हणे यावरी । मग सुखें अळंकारीं ॥५॥

१६६५

कृपेचा ओलावा । दिसे वेगळा चि देवा ॥१॥

मी हें इच्छीतसें साचें । न लगे फुकटशाईं काचें ॥धृ.॥

जेणें जाय कळसा । पाया उत्तम तो तैसा ॥२॥

तुका म्हणे घरीं । तुझ्या अवघिया परी ॥३॥

१६६६

दावूनियां कोणां कांहीं । ते चि वाहीं चाळविलीं ॥१॥

तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ॥ध्रु.॥

रिद्धिसिद्धी ऐसे आड । येती नाड नागवूं ॥२॥

उदकाऐसे दावुनि ओढी । उर फोडी झळईं ॥३॥

दर्पणींचें दिलें धन । दिसे पण चरफडी ॥४॥

तुका म्हणे पायांसाटीं । करीं आटी कळों द्या ॥५॥

१६६७

काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतीचा ॥१॥

आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी ॥ध्रु.॥

लावूं धांवे मुख स्तना । नये मना निराळें ॥२॥

भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ॥३॥

माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ॥४॥

तुका म्हणे नारायणा । तुम्ही जाणां बुझावूं ॥५॥

१६६८

तरीं आम्ही तुझी धरियेली कास । नाहीं कोणी दास वांयां गेला ॥१॥

आगा पंढरीच्या उभ्या विटेवरी । येई लवकरी धांवें नेटे ॥ध्रु.॥

पालवितों तुज उभी करोनि बाहे । कृपावंता पाहे मजकडे ॥२॥

तुका म्हणे तुज बहु कान डोळे । कां हे माझे वेळे ऐसी परी ॥३॥

१६६९

करावा कांटाळा नव्हे हें उचित । आधीं च कां प्रीत लावियेली ॥१॥

जाणतसां तुम्हीं रूपाचें लाघव । आपुलें तें जीव घेतें ऐसा ॥ध्रु.॥

काय म्हणऊनि आलेती आकारा । आम्हां उजगरा करावया ॥२॥

तुका म्हणे भीड होती आजिवरी । आतां देवा उरी कोण ठेवी ॥३॥

१६७०

धरूनि पालव असुडीन करें । मग काय बरें दिसे लोकीं ॥१॥

काय तें विचारा ठायींचें आपणां । जो हा नारायणा अवकाश ॥ध्रु.॥

अंतर पायांसी तो वरी या गोष्टी । पडिलिया मिठी हालों नेदीं ॥२॥

रुसलेती तरी होईल बुझावणी । तांतडी करूनि साधावें हें ॥३॥

सांपडलिया आधीं कारणासी ठाव । येथें करूं भाव दृढ आतां ॥४॥

तुका म्हणे तुझे ठाउके बोभाट । मग खटपट चुकली ते ॥५॥

१६७१

निष्ठा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचा चि ॥१॥

तूं माझा जनिता तूं माझा जनिता । रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥ध्रु.॥

मुळींच्या ठेवण्यां आहे अधिकार । दुरावोनि दूर गेलों होतों ॥२॥

पोटींच्या आठवा पडिला विसर । काहीं आला भार माथां तेणें ॥३॥

राखिला हा होता बहु चौघां चार । साक्षीने वेव्हार निवडिला ॥४॥

तुका म्हणे कांहीं बोलणें न लगे । आतां पांडुरंगे तूं मी ऐसें ॥५॥

१६७२

सांगतां गोष्टी लागती गोडा । हा तो रोकडा अनुभव ॥१॥

सुख जालें सुख जालें । नये बोले बोलतां ॥ध्रु.॥

अंतर तें नये दिसों । आतां सोस कासया ॥२॥

तुका म्हणे जतन करूं । हें चि धरूं जीवेंसी ॥३॥

१६७३

मजशीं पुरे न पडे वादें । सुख दोहींच्या संवादें ॥१॥

तूं चि आगळा काशानें । शिर काय पायांविणे ॥ध्रु.॥

वाहों तुझा भार । दुःख साहोनि अपार ॥२॥

तुका म्हणे नाहीं भेद । देवा करूं नये वाद ॥३॥

१६७४

तुज नाहीं शक्ति । काम घेसी आम्हां हातीं ॥१॥

ऐसें अनुभवें पाहीं । उरलें बोलिजेसें नाहीं ॥ध्रु.॥

लपोनियां आड । आम्हां तुझा कैवाड ॥२॥

तुका म्हणे तुजसाठी । आम्हां संवसारें तुटी ॥३॥

१६७५

तुझाठायीं ओस । दोन्ही पुण्य आणि दोष ॥१॥

झडलें उरलें किती । आम्ही धरियेलें चित्ती ॥ध्रु.॥

कळलासी नष्टा । यातिक्रियाकर्मभ्रष्टा ॥२॥

तुका म्हणे बोला । नाहीं ताळा गा विठ्ठला ॥३॥

१६७६

भांडावें तों हित । ठायी पडा तें उचित ॥१॥

नये खंडों देऊं वाद । आम्हां भांडवलभेद ॥ध्रु.॥

शब्दासारसें भेटी । नये पडों देऊं तुटी ॥२॥

तुका म्हणे आळस । तो चि कारणांचा नास ॥३॥

१६७७

नव्हों गांढे आळसी । जो तूं आम्हांपुढें जासी ॥१॥

अरे दिलें आम्हां हातीं । वर्म वेवादाचें संतीं ॥ध्रु.॥

धरोनियां वाट । जालों शिरोमणि थोंट ॥२॥

तुका म्हणे देवा । वाद करीन खरी सेवा ॥३॥

१६७८

तुझा विसर नको माझिया जीवा । क्षण एक केशवा मायबापा ॥१॥

जाओ राहो देह आतां ये चि घडी । कायसी आवडी याची मज ॥ध्रु.॥

कुश्चीळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ॥२॥

पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ॥३॥

पिंड हा उसना आणिला पांचांचा । सेकीं लागे ज्याचा त्यासी देणें ॥४॥

तुका म्हणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ॥५॥

१६७९

ऐसें सत्य माझें येईल अंतरा । तरि मज करा कृपा देवा ॥१॥

वचनांसारिखें तळमळी चित्ति । बाहेरि तो आंत होइल भाव ॥ध्रु.॥

तरि मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणसी दास खरा ॥२॥

तुका म्हणे सत्य निकट सेवकें । तरि च भातुकें प्रेम द्यावें ॥३॥

१६८०

आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढें नीस संचिताचा ॥१॥

आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणां तो विचार करा देवा ॥ध्रु.॥

आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ॥२॥

तुका म्हणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥३॥

१६८१

सुखें न मनी अवगुण । दुःख भोगी त्याचें कोण ॥१॥

हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ॥ध्रु.॥

चालोनि आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥२॥

तुका म्हणे कोणा । बोल ठेवितो शाहाणा ॥३॥

१६८२

आम्ही न देखों अवगुणां । पापी पवित्र शाहाणा ॥१॥

अवघीं रूपें तुझीं देवा । वंदूं भावें करूं सेवा ॥ध्रु.॥

मज मुक्ती सवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ॥२॥

तुका म्हणे घोटीं । विष अमृत तुजसाटीं ॥३॥

१६८३

मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड । घेतां वाटे गोड नाम तुझें ॥१॥

नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें । बोलतों वचनें आवडीनें ॥ध्रु.॥

भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाईं भार तुज ॥२॥

तुका म्हणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ॥३॥

१६८४

काय माझी संत पाहाती जाणीव । सर्व माझा भावत्यांचे पायीं ॥१॥

कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ॥ध्रु.॥

बोबडा उत्तरीं म्हणें हरिहरि । आणीक भीकारी नेणें दुजें ॥२॥

तुका म्हणे तुम्ही विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची॥३॥

१६८५

जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रम्हांड भूषणु नारायण ॥१॥

सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजांचा निवांत नारायण ॥ध्रु.॥

गोडाचें ही गोड हर्षाचें ही कोड । प्रीतीचा ही लाड नारायण ॥२॥

भावाचा निज भाव नांवांचा हा नांव । अवघा पंढरिराव अवतरलासे ॥३॥

तुका म्हणे जें हें साराचें हें सार । माझा अंगीकार तेणें केला ॥४॥

१६८६

आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ । यातिहीनकुळ दैन्यवाणा ॥१॥

माय रखुमाईं पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥ध्रु.॥

बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ॥२॥

दृष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ॥३॥

संवसार आम्हां सरला सकळ । लपोनियां काळ ठेला धाकें ॥४॥

तुका म्हणे जालों निर्भर मानसीं । जोडलिया रासी सुखाचिया ॥५॥

१६८७

केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबगें उद्वेग नाहीं चित्ती ॥१॥

देव चि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ॥ध्रु.॥

त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ॥२॥

तुका म्हणे आपआपण्यां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुम्हां ॥३॥

१६८८

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्त शुद्ध सेवा देवाची हे ॥१॥

आवडी विठ्ठल गाईंजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥ध्रु.॥

आणीकां अंतरीं निदावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥२॥

तुका म्हणे बाण हा चि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥३॥

१६८९

हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरि ॥१॥

ते मज विठोबासमान । नमूं आवडी ते जन ॥ध्रु.॥

ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ ॥२॥

तुका म्हणे भावें । जिव्हें प्रेम वोसंडावें ॥३॥

१६९०

हरिची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लागे ।

मनुष्यदेहीं तया नाट लागलें । अघोर साधिलें कुंभपाक ॥१॥

कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं ।

उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परिलाज लंड न धरी कांहीं ॥ध्रु.॥

ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी ।

देवधर्माविण तो हा चांडाळ नर । न साहे भूमि भार क्षणभरी ॥२॥

राम म्हणतां तुझें काय वेचेल । कां हित आपुलें न विचारिसी ।

जन्मोजन्मींचा होईल नरकीं । तुका म्हणे चुकी जरी यासी ॥३॥

१६९१

उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आईकिली ॥१॥

आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनियां ॥ध्रु.॥

माझ्या दोषासाटीं होइल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ॥२॥

तुका म्हणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ॥३॥

१६९२

आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंत हें मग जालें नाम ॥१॥

कळे ऐशा वाटा रचिल्या सुलभा । दुर्गम या नभाचा ही साक्षी ॥ध्रु.॥

हातें जेवी एक मुखीं मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ॥२॥

तुका म्हणे माझें ध्यान विटेंवरी । तैसी च गोजिरी दिसे मूर्ति ॥३॥

१६९३

धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥१॥

धन्य जालों आतां यासि संदेह नाहीं । न पडों या वाहीं काळा हातीं ॥धृ.॥

ब्रम्हरस करूं भोजन पंगती । संतांचे संगती सर्वकाळ ॥२॥

तुका म्हणे पोट धालें चि न धाये । खादलें चि खायें आवडीनें ॥३॥

१६९४

आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरेसवें गांठी ॥१॥

न पुरे हा जन्म हें सुख सांटितां । पुढती ही आतां हें चि मागों ॥धृ.॥

मारगाची चिंता पालखी बैसतां । नाहीं उसंतितां कोसपेणी ॥२॥

तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक तान ॥३॥

१६९५

नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । म्हणऊनि मन स्थिरावलें ॥१॥

धरियेलीं जीवीं पाउलें कोमळीं । केली एकावळी नाममाळा ॥धृ.॥

शीतळ होऊनियां पावलों विश्रांती । न साहे पुढती घाली चित्ती ॥२॥

तुका म्हणे जाले सकळ सोहळे । पुरविले डोहळे पांडुरंगें ॥३॥

१६९६

मायबापापुढें लाटिकें लेंकरूं । तैसे बोल करूं कवतुकें ॥१॥

कृपावंता घालीं प्रेमपान्हारस । वोळली वोरसे पांडुरंग ॥ध्रु.॥

नाहीं धीर खुंटी जवळी हुंबरे । ठायीं च पाखर कवळिते ॥२॥

तुका म्हणे मज होऊं नेदी सीण । कळों नेदी भिन्न आहे ऐसें ॥३॥

१६९७

आठवों नेंदी आवडी आणीक । भरूनियां लोक तिन्ही राहे ॥१॥

मन धांवे तेथें तिचें चि दुभतें । संपूर्ण आइतें सर्वकाळ ॥ध्रु.॥

न लगे वोळावीं इंद्रियें धांवतां । ठाव नाहीं रिता उरों दिला ॥२॥

तुका म्हणे समपाउलाचा खुंट । केला बळकट हालों नेदी ॥३॥

१६९८

उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दुःखी होऊनि तें ॥१॥

न बैसे न वजे जवळूनि दुरी । मागें पुढें वारी घातपात ॥ध्रु.॥

नाहीं शंका असो भलतिये ठायीं । मावळलें पाहीं द्वैताद्वैत ॥२॥

तुका म्हणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाहए रूप ॥३॥

१६९९

आम्हां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहों कंठीं ॥१॥

लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वाचे नामघोष ॥ध्रु.॥

आम्हां आणिकांची चाड चि नाहीं । सर्व सुखें पायीं विठोबाच्या ॥२॥

तुका म्हणे आम्ही नेघों या मुक्ती । एकविण चित्ती दुजें नाहीं ॥३॥

१७००

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥१॥

डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥ध्रु.॥

संतां महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥२॥

तें तीर्थांचे माहेर । सर्वसुखाचें भांडार ॥३॥

जन्म नाहीं रे आणीक । तुका म्हणे माझी भाक ॥४॥

१७०१

पैल घरीं जाली चोरी । देहा करीं बोंब ॥१॥

हाबा हाबा करिसी काये । फिराऊनि नेट्यां वायें ॥ध्रु.॥

सांडुनियां शुद्धी । निजलासी गेली बुद्धी ॥२॥

चोरीं तुझा काढला बुर । वेगळें भावा घातलें दूर ॥३॥

भलतियासी देसी वाव । लाहेसि तूं एवढा ठाव ॥४॥

तुका म्हणे अझुनि तरी । उरलें तें जतन करीं ॥५॥

१७०२

किती वेळा खादला दगा । अझून कां जागसी ना ॥१॥

लाज नाहीं हिंडतां गांवें । दुःख नवें नित्य नित्य ॥ध्रु.॥

सवें चोरा हातीं फांसे । देखतां कैसे न देखसी ॥२॥

तुका म्हणे सांडिती वाट । तळपट करावया ॥३॥

१७०३

मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ॥१॥

आणिकांची कां लाज नाहीं । आळसा जिहीं तजिलें ॥ध्रु.॥

एके सांते सरिखीं वित्ते । हानि हित वेगळालीं ॥२॥

तुका म्हणे हित धरा । नव्हे पुरा गांवढाळ ॥३॥

१७०४

निरोप सांगतां । न धरीं भय न करीं चिंता ॥१॥

असो ज्याचें त्याचे त्याचे माथां । आपण करावी ते कथा ॥ध्रु.॥

उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ॥२॥

तुका म्हणे धाक । तया इह ना परलोक ॥३॥

१७०५

शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥१॥

केला न संडी कैवाड । जीवेंसाटीं तों हे होड ॥ध्रु.॥

धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥२॥

तुका म्हणे हरि । दासां रक्षितो निर्धारीं ॥३॥

१७०६

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तें ही नये ॥१॥

राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥ध्रु.॥

हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥२॥

खावे ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावें ॥३॥

१७०७

दासां सर्व काळ । तेथें सुखाचे कल्लोळ ॥१॥

जेथें वसती हरिदास । पुण्य पिके पापा नास ॥ध्रु.॥

फिरे सुदर्शन । घेऊनियां नारायण ॥२॥

तुका म्हणे घरीं । होय म्हणियारा कामारी ॥३॥

१७०८

आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥१॥

मायबापाचीं लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ॥ध्रु.॥

नाहीं निपराद । कोणां आम्हांमध्यें भेद ॥२॥

तुका म्हणे मान । अवघें आमचें हें धन ॥३॥

१७०९

काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥१॥

नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ध्रु.॥

काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नास करुनी टाकी ॥२॥

तुका म्हणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥३॥

१७१०

आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत । घेऊं अगणित प्रेमसुख ॥१॥

गोप्य धन वारा लागों यास । पाहों नेदूं वास दुर्जनासी ॥ध्रु.॥

झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आपणासी ॥२॥

तुका म्हणे हें बहु सकुमार । न साहावे भार वचनाचा ॥३॥

१७११

मोक्षपदें तुच्छ केलीं याकारणें । आम्हां जन्म घेणें युगायुगीं ॥१॥

विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुडतीपुडती आस सेवावें हें ॥ध्रु.॥

देवा हातीं रूप धरविला आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ॥२॥

तुका म्हणे चत्ति निवांत राहिलें । ध्याई तीं पाउलें विटेवरि ॥३॥

१७१२

नको बोलों भांडा । खीळ घालुन बैस तोंडा ॥१॥

ऐक विठोबाचे गुण । करीं सादर श्रवण ॥ध्रु.॥

प्रेमसुखा आड । काय वाजातें चाभाड ॥२॥

तुका म्हणे हिता । कां रे नागवसी थीता ॥३॥

१७१३

अति जालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न म्हणावी ॥१॥

उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोल वाव थोरपण ॥ध्रु.॥

शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आयुर्भाव आणिलिया ॥२॥

तुका म्हणे सोंग पोटाचे उपाय । कारण कमाईंविण नाहीं ॥३॥

१७१४

शूरां साजती हतियारें । गांढव्या हासतील पोरें ॥१॥

काय केली विटंबण । मोतीं नासिकावांचून ॥ध्रु.॥

पतिव्रते रूप साजे । सिंदळ काजळ लेतां लाजे ॥२॥

दासी पत्नी सुता । नव्हे सरी एक पिता ॥३॥

मान बुद्धीवंतां । थोर न मनिती पिता ॥४॥

तुका म्हणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ॥५॥

१७१५

काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ॥१॥

हा तों ठायींचा विचार । आहे यातिवैराकार ॥धृ.॥

श्वापदातें वधी । निरपराधें पारधी ॥२॥

तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥३॥

१७१६

वाइटानें भलें । हीनें दाविलें चांगलें ॥१॥

एकाविण एका । कैचें मोल होतें फुका ॥धृ.॥

विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥२॥

काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ॥३॥

उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ॥४॥

तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥५॥

१७१७

असो खळ ऐसे फार । आम्हां त्यांचे उपकार ॥१॥

करिती पातकांची धुनी । मोल न घेतां साबनीं ॥धृ.॥

फुकाचे मजुर । ओझें वागविती भार ॥२॥

पार उतरुन म्हणे तुका । आम्हां आपण जाती नरका ॥३॥

१७१८

संत पंढरीस जाती । निरोप धाडीं तया हातीं ॥१॥

माझा न पडावा विसर । तुका विनवितो किंकर ॥ध्रु.॥

केरसुणी महाद्वारीं । ते मी असें निरंतरीं ॥२॥

तुमचे पायीं पाइतन । मोचे माझे तन मन ॥३॥

तांबुलाची पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ॥४॥

तुमची इष्टा पंढरीराया । ते सारसुबी माझी काया ॥५॥

लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ॥६॥

तुका म्हणे पंढरिनाथा । दुजें न धरावें सर्वथा ॥७॥

१७१९

इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकलिलें ॥१॥

यांचा विश्वास तो काईं । ऐसें विचारूनि पाहीं ॥ध्रु.॥

सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले जाणतां ॥२॥

पिंड पाळितां ओसरे । अवघी घेऊनि मागें सरे ॥३॥

करितां उपचार । कोणां नाहीं उपकार ॥४॥

अल्प जीवन करीं । तुका म्हणे साधीं हरी ॥५॥

१७२०

यज्ञनिमित्त तें शरिरासी बंधन । कां रे तृष्णा वांयांविण वाढविली ॥१॥

नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनीं बंधन केलें तुज ॥ध्रु.॥

आशा धरूनि फळाची । तीर्थी व्रतीं मुक्ति कैंचि ॥२॥

तुका म्हणे सिणसी वांया । शरण न वजतां पंढरिराया ॥३॥

१७२१

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें घडे नाम उच्चारितां ।

न वेचे मोल कांहीं लागती न सायास । तरी कां आळस करिसी झणी ॥१॥

ऐसें हे सार कां नेघेसी फुकाचें । काय तुझें वेचे मोल तया ॥ध्रु.॥

पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळी उभा ।

अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलूनि परलोका ॥२॥

अंतकाळीं गणिका पक्षियाच्या छंदें । राम राम उच्चारिलें ।

तंव त्या दिनानाथा कृपा आली । त्यानें तयेसी वैकुंठा नेलें ॥३॥

अवचिता नाम आलिया हे गती । चिंतितां चित्ती जवळी असे ।

तुका म्हणे भावें स्मरा राम राम । कोण जाणे तये दशे ॥४॥

१७२२

दुष्टाचें चत्ति न भिन्ने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ।

पालथे घागरी घातलें जीवन । न धरी च जाण तें ही त्याला ॥१॥

जन्मा येउनि तेणें पतन चि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा ।

जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हे आलें संवसारा ॥ध्रु.॥

पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो ।

कुचर मुग नये चि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ॥२॥

तुका म्हणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रेत्न कांहीं ।

म्हणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥३॥

१७२३

कासियानें पूजा करूं केशीराजा । हा चि संदेह माझा फेडीं आतां ॥१॥

उदकें न्हाणूं तरी स्वरूप तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ॥ध्रु.॥

गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥२॥

फळदाता तूंच तांबोल अक्षता । तरी काय आतां वाहों तुज ॥३॥

वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण । ब्रम्ह तें चि अन्न दुजें काईं ॥४॥

गातां तूं औंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥५॥

तुका म्हणें मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि ॥६॥

१७२४

गातां आइकतां कांटाळा जो करी । वास त्या अघोरीं कुंभपाकीं ॥१॥

रागें यमधर्म जाचविती तया । तु दिलें कासया मुख कान ॥ध्रु.॥

विषयांच्या सुखें अखंड जगासी । न वजे एकादशी जागरणा ॥२॥

वेचूनियां द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥३॥

तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्ट लोभें ॥४॥

तुका म्हणे मग केला साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥५॥

१७२५

तुझें म्हणवितां काय नास जाला । ऐकें बा विठ्ठला कीर्ती तुझी ॥१॥

परी तुज नाहीं आमचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥ध्रु.॥

समूळीं संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ॥२॥

लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसी नाहीं थार ऐसें केलें ॥३॥

मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपले ते कोण पर नेणों ॥४॥

तुका म्हणे जालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ॥५॥

१७२६

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरीं वरीं ॥१॥

अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण तों केलें आपणया ॥ध्रु.॥

इंद्रावण फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडे चि ना ॥२॥

तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदा तुम्ही ॥३॥

१७२७

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥१॥

येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ध्रु.॥

राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥२॥

तुका म्हणे ऐसें देईंन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥३॥

१७२८

धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरिये ॥१॥

न पवीजे केल्या तपांचिया रासी । तें जनलोकांसी दाखविलें ॥ध्रु.॥

सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनी हा भाव निवडिला ॥२॥

विष्णुपद गया रामधाम काशी । अवघीं पायांपाशीं विठोबाच्या ॥३॥

तुका म्हणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ या नास अहंकाराचा ॥४॥

१७२९

धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ॥१॥

धन्य तो हि लोक अवघा दैवांचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥ध्रु.॥

धन्य ते ही भूमी धन्य तरुवर । धन्य ते सुरवर तीर्थरूप ॥२॥

धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें भवन गर्जतसे ॥३॥

धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण अवतरला ॥४॥

तुका म्हणे धन्य संसारातें आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥५॥

१७३०

मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥१॥

नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ध्रु.॥

कर्णद्वारें पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥२॥

वैष्णवां संगती । हातीं पडलीं नेणों किती ॥३॥

आम्हां कैंचा मग । करिसी उघडियांचा संग ॥४॥

तुका म्हणे जाणें नरका । त्यांचा उपदेश आइका ॥५॥

१७३१

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥१॥

आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥धृ.॥

धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातडी चत्ति माझें ॥२॥

तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥३॥

१७३२

मागतियाचे दोनि च कर । अमित भांडार दातियाचें ॥१॥

काय करूं आतां कासयांत भरूं । हा मज विचारु पडियेला ॥धृ.॥

एकें सांटवणें प्रेमें वोसंडलीं । जिव्हा हे भागली करितां माप ॥२॥

तुका म्हणे आतां आहे तेथें असो । अंखुनियां बैसों पायांपाशीं ॥३॥

१७३३

जिचें पीडे बाळ । प्राण तयेचा विकळ ॥१॥

ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥धृ.॥

सुखाची विश्रांती । उमटे मातेचिये चित्ती ॥२॥

तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ॥३॥

१७३४ या

वें माहेरास । हे च सर्वकाळ आस ॥१॥

घ्यावी उच्छिष्टाची धणी । तीर्थ इच्छी पायवणी ॥धृ.॥

भोग उभा आड । आहे तोंवरी च नाड ॥२॥

तुका म्हणे देवें । माझें सिद्धी पाववावें ॥३॥

१७३५

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥१॥

ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभेंविण प्रीती ॥ध्रु.॥

पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्व ही साहे ॥२॥

तुका म्हणे माझें । तैसे तुम्हां संतां ओझें ॥३॥

१७३६

आम्हां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥१॥

जालों पोरटीं निढळें । नाहीं ठाव बुड आळें ॥ध्रु.॥

आम्हीं जना भ्यावें। तरि कां न लाजिजे देवें ॥२॥

तुका म्हणे देश । जाला देवाविण ओस ॥३॥

१७३७

तुम्ही पाय संतीं । माझे ठेवियेले चित्ती ॥१॥

आतां बाधूं न सके काळ । जालीं विषम शीतळ ॥ध्रु.॥

भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ॥२॥

तुका म्हणे भये । आतां स्वप्नीं ही नये ॥३॥

१७३८

काळाचे ही काळ । आम्ही विठोबाचे लडिवाळ ॥१॥

करूं सत्ता सर्वां ठायी । वसों निकटवासें पायीं ॥ध्रु.॥

ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे समोरी ॥२॥

तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ॥३॥

१७३९

जन्मा येऊन उदार जाला । उद्धार केला वंशाचा । मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ती भोगीतसे ॥१॥

नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया । धर्म करितां ऐके कानीं । बांधे निजोनि डोकियासी ॥ध्रु.॥

घरा व्याही पाहुणा आला । म्हणे त्याला बरें नाहीं । तुमचे गावीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ॥२॥

उजवूं किती होतिल पोरें । मरतां बरें म्हणे यांसी । म्हणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ॥३॥

पर्वकाळीं भट घरासी आला । बोंब घाला म्हणे पोरां । तुमचा उणा होईल वांटा । काळ पिठासी आला ॥४॥

दाढी करितां अडका गेला । घरांत आला बाइलेपें । म्हणे आतां उगवीं मोडी । डोईं बोडीं आपुली ॥५॥

तीर्थ स्वप्नीं नेणें गंगा । पूजन लिंगा गांविंचिया । आडकुनि दार बैसे दारीं । आल्या घर म्हणे ओस ॥६॥

तुका म्हणे ऐसे आहेत गा हरी । या ही तारीं जीवांसी । माझ्या भय वाटे चित्ती । नरका जाती म्हणोनि ॥७॥

१७४०

जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्याने ॥१॥

तो ही कारणांचा दास । देव म्हणवितां पावे नास ॥ध्रु.॥

वेची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥२॥

तुका म्हणे त्याचें । मुदल गेलें हाटवेचें ॥३॥

१७४१

घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥१॥

आम्ही भांडारी देवाचे । द्यावें घ्यावें माप वाचे ॥ध्रु.॥

उगवूं जाणों मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ॥२॥

तुका म्हणे पुडी । मोल तैसी खरी कुडी ॥३॥

१७४२

सादाविलें एका । सरें अवघियां लोकां ॥१॥

आतां आवडीचे हातीं । भेद नाहीं ये पंगती ॥ध्रु.॥

मोकळी च पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ॥२॥

तुका म्हणे बरा । आहे ढसाळ वेव्हारा ॥३॥

१७४३

तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ॥१॥

जेणें खंडे एके खेपे । जाय तेथें लाभें वोपे ॥ध्रु.॥

दाविल्या सारिखें । मागें नसावें पारिखें ॥२॥

मागें पुढें ॠण । तुका म्हणे फिटे हीण ॥३॥

१७४४

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥१॥

जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ध्रु.॥

राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥२॥

होवा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणां ॥३॥

अनघडसिद्धाच्या शब्देंकरून रामेश्वरभटाच्या शरीरीं दाह जाला तो ज्यानें शमला तो अभंग ॥ १ ॥

१७४५

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥१॥

विष तें अमृत अघातें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ध्रु.॥

दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥२॥

आवडेल जीवां जीवाचे परी । सकळां अंतरीं एक भाव ॥३॥

तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणियेते येणें अनुभवें ॥४॥

१७४६

लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगी ॥१॥

मजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण ॥ध्रु.॥

कोमळ कंटक तीक्षण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥२॥

चित्रींचे लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥३॥

तुका म्हणे दिसें वांयां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥४॥

१७४७

बोलविसी माझें मुख । परी या जना वाटे दुःख ॥१॥

जया जयाची आवडी । तया लागीं तें चरफडी ॥ध्रु.॥

कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥२॥

खाऊं नये तें चि मागे । निवारितां रडों लागे ॥३॥

वैद्या भीड काय । अतित्याईं जीवें जाय ॥४॥

नये भिडा सांगों आन । पथ्य औषधाकारण ॥५॥

धन माया पुत्र दारा । हे तों आवडी नरका थारा ॥६॥

तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ॥७॥

१७४८

पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचारवचनीं ॥१॥

जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ॥ध्रु.॥

सुख पुराणीं आचारशीळा । दुःख वाटे अनर्गळा ॥२॥

शूरा उल्हास अंगीं । गांढव्या मरण ते प्रसंगीं ॥३॥

शुद्ध सोनें उजळे अगी । हीन काळें धांवे रंगीं ॥४॥

तुका म्हणे तो चि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥५॥

१७४९

चालिती आड वाटा । आणिकां द्राविती जे नीटा ॥१॥

न मनीं तयांचे उपकार । नाहीं जोडा तो गंव्हार ॥ध्रु.॥

विष सेवूनि वारी मागें । प्राण जातां जेणें संगें ॥२॥

बुडतां हाक मारी । ठाव नाहीं आणिकां वारी ॥३॥

तुका म्हणे न करीं हिंका । गुण घेऊन अवगुण टाका ॥४॥

१७५०

कुळींचे दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईंन दासीसुत त्याचे घरीं ॥१॥

शुद्ध यातिकुळवर्णा चाड नाहीं । करीं भलते ठायीं दास तुझा ॥धृ.॥

पंढरीस कोणी जाती वारेकरी । होईंन त्यांचे घरीं पशुयाति ॥२॥

विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईंन पायतन त्याचे पायीं ॥३॥

तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होइन केरसुणी त्याचे घरीं ॥४॥

तुका म्हणे हा चि भाव माझ्या चित्ती । नाहीं आणिकां गती चाड मज ॥५॥

१७५१

अवघिया चाडा कुंटित करूनि । लावीं आपुली च गोडी । आशा मनसा तृष्णा कल्पना । करूनियां देशधडी ।

मीतूंपणापासाव गुंतलों । मिथ्या संकल्प तो माझा तोडीं । तुझिये चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करुनि दाखवीं पिंडी रे रे ॥१॥

माझें साच काय केलें मृगजळ । वर्णा याती कुळ अभिमान । कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्यांचें साचपण ॥धृ.॥

वेगळाल्या भावें चित्ती तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें । गोत वत्ति माय बाप बहिणी सुत ।

बंधुवर्ग माझीं बाळें । एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलिया जवळी काळें ।

जाणोनियां त्याग सर्वस्वें केला । सांभाळीं आपुलें जाळें ॥२॥

एकां जवळी धरी आणिकां अंतरीं । तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं । एकांचे पाळण एकांसी भांडण ।

चाड कवणिये काजीं । अधिक असे उणें कवण कवण्या गुणें । हे माव न कळे चि तुझी । म्हणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती । तुका म्हणे भाक माझी ॥३॥

१७५२

आणिकां छळावया जालासी शाहाणा । स्वहिता घातले खानें । आडिके पैके करूनि सायास । कृपणें सांचलें धन ।

न जिरे क्षीर श्वानासी भिक्षतां । याती तयाचा गुण । तारुण्यदशे अधम मातला । दवडी हात पाय कान ॥१॥

काय जालें यांस वांयां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ।

घेउनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥ध्रु.॥

सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखे फळ । सिंपिला मोतीं जन्मलें स्वाती ।

वरुषलें सर्वत्र जळ । कापुस पट नये चि कारणा । तयास पातला काळ ।

तें चि भुजंगें धरिलें कंठीं । मा विष जालें त्याची गरळ ॥२॥

भक्षूनि मिष्टान्न घृतसाकर । सहित सोलुनि केळें । घालुनियां घसां अंगोळिया ।

हाते वांत करू बळें । कुंथावयाची आवडी बोंबा । उन्हवणी रडवी बाळें ।

तुका म्हणे जे जैसें करिती । ते पवती तैसीं च फळें ॥३॥

१७५३

चंदनाचे गांवीं सर्पांच्या वसति । भोगिते ते होती द्वीपांतरीं ॥१॥

एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला ॥ध्रु.॥

क्षीराची वसति अशुद्ध सेवावें । जवळी तें जावें भोगें दुरी ॥२॥

तुका म्हणे ऐसी बुद्धी ज्याची जड । त्याहुनि दगड बरे देवा ॥३॥

१७५४

तुज दिलें आतां करीं यत्न याचा । जीवाभाव-वाचाकायामन ॥१॥

भागलों दातारा सीण जाला भारी । आतां मज तारीं शरणागता ॥ध्रु.॥

नेणतां सोसिली तयाची आटणी । नव्हतां ही कोणी कांहीं माझीं ॥२॥

वर्म नेणें दिशा हिंडती मोकट । इंद्रियें सुनाट दाही दिशा ॥३॥

वेरझारीफेरा सिणलों सायासीं । आतां हृषीकेशी अंगिकारीं ॥४॥

तुका म्हणे मन इंद्रियांचे सोईं । धांवे यासी काईं करूं आतां ॥५॥

१७५५

स्वयें पाक करी । संशय तो चि धरी । संदेहसागरीं । आणीक परी बुडती ॥१॥

जाणे विरळा एक । जालें तेथींचे हें सुख । देखिले बहुतेक । पुसतां वाट चुकले ॥ध्रु.॥

तो चि जाणे सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें । नाचती पाल्हाळें । जे विटाळें कोंडिले ॥२॥

तो चि साधी संधी । सावध त्रिकाळ जो बुद्धी । संदेहाचा संधी । वेठी आणि करियेले ॥३॥

अखंड ते ध्यान । समबुद्धी समाधान । सोंग वांयांविण । ते झांकून बैसती ॥४॥

करणें जयासाटीं । जो नातुडे कवणे आटी । तुका म्हणे साटी । चित्तवित्तेवांचूनि ॥५॥

१७५६

माझिया संचिता । दृढ देखोनि बळिवंता । पळसी पंढरिनाथा । भेणे आतां तयाच्या ॥१॥

तरि मज कळलासी । नव्हतां भेटी जाणीवेसी । एक संपादिसी । मान करिसी लोकांत ॥ध्रु.॥

तरि हें प्रारब्ध जी गाढें । कांहीं न चले तयापुढें । काय तुज म्यां कोंडें । रें सांकडें घालावें ॥२॥

भोगधीपति क्रियमाण । तें तुज नांगवे अजून । तरि का वांयांविण । तुज म्यां सीण करावा ॥३॥

तुज नव्हतां माझें कांहीं । परि मी न संडीं भक्तिसोईं । हो कां भलत्या ठायीं । कुळीं जन्म भलतैसा ॥४॥

तूं भितोसि माझिया दोषा । कांहीं मागणें ते आशा । तुका म्हणे ऐसा । कांहीं न धरीं संकोच ॥५॥

१७५७

लोकमान देहसुख । संपत्तिउपभोग अनेक । विटंबना दुःख । तुझिये भेटीवांचूनि ॥१॥

तरी मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट । थोर पुण्यें वीट । तुज दैवेंचि लाधली ॥ध्रु.॥

काय ब्रम्हज्ञान करूं कोरडें । रितें मावेचें मापाडें । भेटीविण कुडें । तुझिये अवघें मज वाटे ॥२॥

आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उद्धार। न देखतां धीर । चतुर्भुज मज नाहीं ॥३॥

रिद्धीसिद्धी काय करूं । अथवा अगम्य विचारू । भेटीविण भारु । तुझिये वाटे मज यांचा ॥४॥

तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें । तुका म्हणे द्यावें । दरुषण पायांचें ॥५॥

१७५८

तुझा म्हणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें ॥१॥

तरि मज कवणाचा आधार । करोनियां राहों धीर ॥धृ.॥

काय शब्दीं चि ऐकिला । भेटी नव्हतां गा विठ्ठला ॥२॥

तुका म्हणे आतां । अभय देई पंढरिनाथा ॥३॥

१७५९

उद्धवअक्रूरासी । आणीक व्यासआंबऋृषी । रुक्मांगदाप्रल्हादासी । दाविलें तें दाखवीं ॥१॥

तरि मी पाहेन पाहेन । तुझे श्रीमुखचरण । उतावळि मन । तयाकारणें तेथें ॥धृ.॥

जनकश्रुतदेवा करीं । कैसा शोभलासी हरी । विदुराच्या घरीं । कण्या धरी कवतुकें ॥२॥

पांडवा अकांतीं । तेथें पावसी स्मरती । घातलें द्रौपदी । यागीं बिरडें चोळीचें ॥३॥

करी गोपीचें कवतुक । गाईंगोपाळांसी सुख । दावीं तें चि मुख । दृष्टी माझ्या आपुलें ॥४॥

तरि तूं अनाथाचा दाता । मागतियां शरणागतां । तुका म्हणें आतां । कोड पुरवीं हें माझें ॥५॥

१७६०

मागता भिकारी जालों तुझे द्वारीं । देई मज हरी कृपादान ॥१॥

प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचरावें हृदयामाजी ॥धृ.॥

सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजी एक ॥२॥

तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥३॥

संबंधीं जनवाद पीडलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥४॥

तुका म्हणे आतां तुझा शरणागता । करावें सनाथ मायबापा ॥५॥

१७६१

भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥१॥

न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥धृ.॥

नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करघाईं ॥२॥

तुका म्हणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शअंग ॥३॥

१७६२

दिनदिन शंका वाटे । आयुष्य नेणवतां गाढें ॥१॥

कैसीं भुललीं बापुडीं । दंबविषयांचे सांकडीं ॥धृ.॥

विसरला मरण । त्याची नाहीं आठवण ॥२॥

देखत देखत पाहीं । तुका म्हणे आठव नाहीं ॥३॥

१७६३

माझें मज आतां न देखें निरसतां । म्हणऊन आधार केला । संसाराची आस सांडुनि लौकिक । जीव भाव तुज दिला ।

नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा । अर्थ मोहो सांडवला ।

तारीं मारीं करीं भलतें दातारा । होऊन तुझा आतां ठेलों रे ॥१॥

असो माझें कोडें तुज हे सांकडें । मी असेन निवाडें सुखरूप ।

बाळकासी चिंता काय पोटवेथा । जया शिरीं मायबाप ॥ध्रु.॥

पापपुण्यें श्रुति आटिल्या । शास्त्रांस न लगे चि ठाव । विधिनिषिधें गोविलीं पुराणें वेदांसी तो अहंभाव ।

ओंकाराचें मूळ व्यापिलें माया । तेथें न धरे च भाव । म्हणऊन काबाड सांडिलें उपसतां । धरिलें तुझें चि नांव ॥२॥

तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों । सर्व आशा तुझे पायीं । तप तीर्थ दान करवूं कवणा । हातीं अधीन तें मज काईं ।

आहिक्यें परत्रें चाड नाहीं सर्वथा । जन्म सदा मज देहीं । मायामोहपाश करीं विष तैसें । तुका म्हणे माझ्याठायीं ॥३॥

१७६४

तुझें नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळ ही ॥१॥

रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥ध्रु.॥

आणिकां रसें मरण गांठी । येणें तुटी संसारें ॥२॥

तुका म्हणे आहार जाला । हा विठ्ठला आम्हांसी ॥३॥

१७६५

धालों सुखें ढेकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी ॥१॥

क्रीडा करूं निरांजनीं । न पुरे धणी हरिसवें ॥ध्रु.॥

अवघे खेळों अवघ्यामधीं । डाईं न पडों ऐसी बुद्धी ॥२॥

तुका म्हणे वांचवीत । आम्हां सत्ता समर्थ ॥३॥

१७६६

एकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग म्हणऊनि ॥१॥

उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना ॥ध्रु.॥

दुसरा परी एक ऐसा । वजे रिसा निकुरें ही ॥२॥

तुका म्हणे कळत्यां कळे । येर खेळे खेळ म्हुण ॥३॥

१७६७

बोलविले जेणें । तो चि याचें गुह्य जाणे ॥१॥

मी तों काबाडाचा धनी । जेवूं मागावें थिंकोनि ॥ध्रु.॥

मजुराच्या हातें । माप जालें गेलें रितें ॥२॥

जाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥३॥

मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥४॥

जैसा करिती धंदा । तैसा पडोनियां छंदा ॥५॥

त्याच्या साच गाईं म्हैसी । येणें खेळावें मातीशीं ॥६॥

तुका म्हणे बोल । माझा बोलतो विठ्ठल ॥७॥

१७६८

कां हो तुम्ही माझी वदविली वाणी । नेदा हे निवडूनि पांडुरंगा ॥१॥

आणीक म्यां कोणां पुसावा विचार । मुळीं संवसार दुराविला ॥ध्रु.॥

स्वामिसेवा म्हुण घेतली पदरीं । सांगितलें करीं कारण तें ॥२॥

तुका म्हणें नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ॥३॥

१७६९

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा ॥१॥

आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं टळों नये ॥ध्रु.॥

समय सांभाळूनि आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तपायरी ॥२॥

तुका म्हणे तरी म्हणवावें सेवक । खादलें तें हाक अन्न होय ॥३॥

१७७०

नये पुसों आज्ञा केली एकसरें । आम्हांसी दुसरें आतां नाहीं ॥१॥

ज्याचें तो बळिवंत सर्व निवारिता । आम्हां काय चिंता करणें लागें ॥ध्रु.॥

बुद्धीचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ॥२॥

तुका म्हणे मज होईंल वारिता । तरी काय सत्ता नाहीं हातीं ॥३॥

१७७१

बळिवंत आम्ही समर्थाचे दास । घातली या कास कळिकाळासी ॥१॥

तेथें मानसाचा कोण आला पाड । उलंघोनि जड गेलों आधीं ॥ध्रु.॥

संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षडवर्ग ॥२॥

तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ॥३॥

१७७२

एका गावें आम्हीं विठोबाचे नाम । आणिकांपें काम नाहीं आतां ॥१॥

मोडूनियां वाटा सूक्ष्म सगर । केला राज्यभार चाले ऐसा ॥ध्रु.॥

लावूनि मृदांग टाळश्रुतिघोष । सेवूं ब्रम्हरस आवडीनें ॥२॥

तुका म्हणे महापातकी पतित । ऐसियांचे हित हेळामात्रें ॥३॥

१७७३

वाचाचापल्ये बहु जालों कुशळ । नाहीं बीजमूळ हाता आलें ॥१॥

म्हणोनि पंढरिराया दुखी होतें मन । अंतरींचे कोण जाणे माझें ॥ध्रु.॥

पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ॥२॥

तुका म्हणे खूण न कळे चि निरुती । सांपडलों हातीं अहंकाराचे ॥३॥

१७७४

आतां काढाकाढी करीं बा पंढरिराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ॥१॥

जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा धर्म घ्यावे प्राण हा चि ॥ध्रु.॥

मनाचा स्वभाव इंद्रियांचे ओढी । पतनाचे जोडी वरी हांव ॥२॥

तुका म्हणे जाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावीं ॥३॥

१७७५

सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणिकांसी ॥१॥

एक गुण तो केला दोंठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तैसा ॥ध्रु.॥

भाविक शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ॥२॥

परउपकार घडे तो भला । नाठ्याळ तया दया नाहीं ॥३॥

जाणीवंत तो पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा ॥४॥

हित तें अनहित केलें कैसें । तुका म्हणे पिसें लागलें यास ॥५॥

१७७६

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा ते चि घडी झडो माझी ॥१॥

हें मज देई हें मज देई । आणिक दुजें कांहीं न मगें तुज ॥ध्रु.॥

बहिर कान तुझी कीर्ती नाइकतां । पाय न देखतां जात डोळे ॥३॥

मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ॥३॥

हातपाय तेणें पंथ न चलतां । जावे ते अनंता गळोनियां ॥४॥

तुजविण जिणें नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ॥५॥

१७७७

म्हणसी होऊनी निश्चिंता । हरूनियां अवघी चिंता । मग जाऊं एकांता

भजन करूं । संसारसंभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवा साटी होईल तुझ्या ॥१॥

सेकीं नाडसील नाडसील । विषयसंगें अवघा नाडसील । मागुता पडसील भवडोहीं ॥ध्रु.॥

शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कधीं अराणूक । करिती तडातोडी ।

आंत बाह्यात्कारीं । ऐसे जाती चारी दिवस वेगीं ॥२॥

मोलाची घडी जाते वांयांविण । न मिळे मोल धन देतां कोडी ।

जागा होई करीं हिताचा उपाय । तुका म्हणे हाय करिसी मग ॥३॥

१७७८

कनवाळू कृपाळू भक्तांलागीं मोही । गजेंद्राचा धांवा तुवां केला विठाई ॥१॥

पांडुरंगे ये वो पांडुरंगे । जीवाचे जिवलगे ये वो पांडुरंगे ॥धृ.॥

भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले । आंबऋषीकारणें जन्म दाहा घेतले ॥२॥

प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला । विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ॥३॥

उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाहीं । पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥४॥

कौरवीं पांचाळी सभेमाजी आणिली । वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी जाली माउली ॥५॥

दुर्वास पातला धर्मा छळावया वनीं । धांवसी लवलाहीं शाखादेठ घेऊनि ॥६॥

कृपाळू माउली भुक्तिमुक्तिभांडार । करीं माझा अंगीकार तुका म्हणे विठ्ठले ॥७॥

१७७९

कवणा पाषाणासी धरूनि भाव । कवणावरी पाव ठेवूं आतां ।

म्हणऊनि निश्चित राहिलों मनीं । तूं चि सर्वां खाणी देखोनियां ॥१॥

कवणाचें कारण न लगे कांहीं । सर्वांठायीं तूं एक।

कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं । आता उरलें काईं न दिसे देवा ॥धृ.॥

जळें जळ काय धोविलें एक । कवण तें पातक हरलें तेथें ।

पापपुण्य हे वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ॥२॥

पितरस्वरूपी तूं चि जनार्दन । सव्य तें कवण अपसव्य ।

तुका म्हणे जीत पिंड तुम्हां हातीं । देऊनि निश्चिंती मानियेली ॥३॥

१७८०

सिणलों दातारा करितां वेरझारा । आतां सोडवीं संसारापासोनियां ॥१॥

न सुटे चि बाकी नव्हे झाडापाडा । घातलोंसें खोडा हाडांचिया ॥ध्रु.॥

मायबापें माझीं जीवाचीं सांगाती । तीं देतील हातीं काळाचिया ॥२॥

पडताळूनि सुरी बैसली सेजारीं । यमफासा करीं घेऊनिया ॥३॥

पाठी पोटीं एकें लागलीं सरसीं । नेती नरकापाशीं ओढूनियां ॥४॥

जन साहेभूत असे या सकळां । मी एक निराळा परदेशी ॥५॥

कोणा काकुलती नाहीं कोणे परी । तुजविण हरी कृपाळुवा ॥६॥

तुका म्हणे मज तुझाची भरवसा । म्हणऊनि आशा मोकलिली ॥७॥

१७८१

देवाचा भक्त तो देवासी गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ।

कवणाचा सोइरा नव्हे च सांगाती । अवघियां हातीं अंतरला ॥१॥

निष्काम वेडें म्हणतील बापुडे । अवघियां सांकडें जाला कैसा ।

माझें ऐसें तया न म्हणत कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ॥ध्रु.॥

प्रातःस्नान करी विभूतिचर्चन । दखोनिया जन निंदा करी ।

कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । म्हणती या चांडाळा काय जालें ॥२॥

गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आई बाप भाऊ ।

घरी बाइल म्हणे कोठें व्याली रांड । बरें होतें शंड मरता तरी ॥३॥

जन्मोनि जाला अवघियां वेगळा । म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ।

तुका म्हणे जो संसारा रुसला । तेणें चि टाकिला सिद्धपंथ ॥४॥

१७८२

कस्तुरी भिनली जये मृत्तिके । तयेसी आणिके कैसी सरी ॥१॥

लोखंडाचे अंगीं लागला परिस । तया आणिकास कैसी सरी ॥२॥

तुका म्हणे मी न वजें यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवांसी ॥ ।३॥

१७८३

अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं । राम नाहीं तोंडीं कैसा तरे ॥१॥

सकळां जीवांमाजी देव आहे खरा । देखिल्या दुसरा विण न तरे ॥ध्रु.॥

ज्ञान सकळांमाजी आहे हें साच । भक्तीविण तें च ब्रम्ह नव्हे ॥२॥

काय मुद्रा कळल्या कराव्या सांगतां । दीप न लगतां उन्मनीचा ॥३॥

तुका म्हणे नका पिंडाचें पाळण । स्थापू नारायण आतुडेना ॥४॥

१७८४

नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत झणी ॥१॥

नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापूनिया ॥ध्रु.॥

मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ॥२॥

राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारि । बोबडा उत्तरीं हें चि ध्यान ॥३॥

तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥४॥

१७८५

देवासी लागे सकळांसी पोसावें । आम्हां न लगे खावें काय चिंता ॥१॥

देवा विचारावें लागे पापपुण्य । आम्हासी हे जन अवघें भलें ॥ध्रु.॥

देवासी उत्पत्ति लागला संहार । आम्हां नाहीं फार थोडें काहीं ॥२॥

देवासी काम लागला धंदा । आम्हासी ते सदा रिकामीक ॥३॥

तुका म्हणे आम्ही भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ॥४॥

१७८६

घेईंन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥१॥

हरिनामकीर्तन संतांचे पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ध्रु.॥

आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःख नाहीं चाड आम्हां ॥२॥

आणीक सायास न करीं न धरीं आस । होईंन उदास सर्व भावें ॥३॥

मोक्ष आम्हां घरीं कामारी ते दासी । होय सांगों तैसी तुका म्हणे ॥४॥

१७८७

देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ॥१॥

तरी साच मी पतित । तूं च खोटा दिनानाथ ।

ग्वाही साधुसंत जन । करूनि अंगीं लावीन ॥ध्रु.॥

आम्ही धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ॥२॥

न चले तुझे कांहीं त्यास । आम्ही बळकाविले दोष ॥३॥

दिशा भरल्या माझ्या मनें । लपालासी त्याच्या भेणें ॥४॥

तुका म्हणे चत्ति । करी तुझी माझी नीत ॥५॥

१७८८

लापनिकशब्दें नातुडे हा देव । मनिंचे गुह्य भाव शुद्ध बोला ॥१॥

अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥२॥

तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चत्ति शुद्धभावें ॥३॥

१७८९

नव्हे ब्रम्हज्ञान बोलतां सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्ती ॥१॥

काय करिसी वांयां लटिका चि पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा ॥ध्रु.॥

मी च देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनियां ॥२॥

अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनिया ॥३॥

तुका म्हणे जरि राहील तळमळ । ब्रम्ह तें केवळ सदोदित ॥४॥

१७९०

गंगाजळा पाहीं पाठी पोट नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी ॥१॥

रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिका तिमिरा नासे तेणे ॥ध्रु.॥

कर्पूरकांडणी काय कोंडा कणी । सिंधू मिळावणीं काय चाले ॥२॥

परिस चिंतामणि आणिकांचा गुणी । पालटे लागोनि नव्हे तैसा ॥३॥

तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥४॥

१७९१

परिस काय धातु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ॥१॥

काय तयाहूनि जालासी बापुडें । फेडितां सांकडें माझे एक ॥ध्रु.॥

कल्तपरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥२॥

चंदनांच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाती ॥३॥

काय त्याचें उणें जालें त्यासी देतां । विचारीं अनंता तुका म्हणे ॥४॥

१७९२

तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाति । बाभळा राखती करूनि सार ॥१॥

कोण हित तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काईं ॥ध्रु.॥

धान्यें बीजें जेणें जाळिलीं सकळें । पेरितो काळें जिरें बीज ॥२॥

मोडोनिया वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ॥३॥

विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रम्हहत्या ॥४॥

तुका म्हणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ॥५॥

१७९३

संसाराच्या भेणें । पळों न लाहेसें केलें ॥१॥

जेथें तेथें आपण आहे । आम्हीं करावें तें काये ॥ध्रु.॥

एकांतींसी ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ॥२॥

गांवा जातों ऐसें । न लगे म्हणावें तें कैसें ॥३॥

स्वप्नाचे परी । जागा पाहे तंव घरीं ॥४॥

तुका म्हणे काये । तुझे घेतले म्यां आहे ॥५॥

१७९४

आण काय सादर । विशीं आम्हां कां निष्ठ ॥१॥

केलें भक्त तैसें देई । तुझें प्रेम माझ्याठायीं ॥ध्रु.॥

काय पंगतीस कोंडा । एकांतासी साकरमांडा ॥२॥

काय एकपण । पोतां घालूनि गांठी खूण ॥३॥

काय घ्यावें ऐसें । त्या आपण अनारिसें ॥४॥

तुका म्हणे मधीं । आतां तोडूं भेद बुद्धी ॥५॥

१७९५

चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि जालों उतराईं ॥१॥

परि तूं खोटा केशीराजा । अंतपार न कळे तुझा ॥ध्रु.॥

आम्ही सर्वस्वें उदार । तुज देऊनियां धीर ॥२॥

इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ॥३॥

न पडे विसर । तुझा आम्हां निरंतर ॥४॥

प्रेम एकासाटी । तुका म्हणे न वेचे गांठी ॥५॥

१७९६

आम्ही पतित म्हणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं ।

नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुज चित्ती ॥१॥

आम्हां न तारावें तुम्ही काय करावें । सांगीजोजी भावें नारायणा ॥ध्रु.॥

अन्याय एकाचा अंगीकार करणें । तया हातीं देणें लाज ते चि ।

काय ते शूरत्व मिरवूनि बोलणें । जनामाजी दावणें बळरया ॥२॥

पोह्या अन्नछत्र घालूनियां घरीं । दंडितो बाहेरी आलियासी ।

नव्हे कीर्त कांहीं न माने लोकां । काय विटंबणा तैसी ॥३॥

प्रत्यक्षासी काय द्यावें हें प्रमाण । पाहातां दर्पण साक्ष काईं ।

तुका म्हणे तरी आम्हां का न कळे । तरलों किंवा आम्ही नाहीं ॥४॥

१७९७

काग बग रिठा मारिले बाळपणीं । अवघी दैत्यखाणी बुडविली ॥१॥

तो मज दावा तो मज दावा । नंदनंदन जीवा आवडे तो ॥धृ.॥

गोवर्धन गिरी उचलिला करीं । गोकुळ भीतरी राखियेलें ॥२॥

बघुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ॥३॥

पांडव जोहरीं राखिले कुसरी । विवराभीतरीं चालविले ॥४॥

तुका म्हणे हा भक्तांचा कृपाळ । दुष्टजना काळ नारायण ॥५॥

१७९८

तुजविण देवा । कोणा म्हणे माझी जिव्हा ॥१॥

तरि हे हो कां शतखंड । पडो झडोनियां रांड ॥धृ.॥

कांहीं इच्छेसाटीं । करिल वळवळ करंटी ॥२॥

तुका म्हणे कर । कटीं तयाचा विसर॥३॥

१७९९

आम्हां सर्वभावें हें चि काम । न विसंभावें तुझें नाम ॥१॥

न लगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां ॥धृ.॥

आसनीं भोजनीं शयनीं । दुजें नाहीं ध्यानीं मनीं ॥२॥

तुका म्हणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ॥३॥

१८००

नव्हें कांहीं कवणाचा । भाव जाणवला साचा ॥१॥

म्हणोनि तुझ्या पायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ध्रु.॥

शरीर जायाचें कोंपट । याची काय खटपट ॥२॥

तुका म्हणे वांयांविण । देवा कळों आला सीण ॥३॥

१८०१

रज्जु धरूनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं । कळों येतां चित्ती । दोरी दोघां सारिखी ॥१॥

तुम्हांआम्हांमध्यें हरी । जाली होती तैसी परी । मृगजळाच्या पुरीं । ठाव पाहों तरावय ॥ध्रु.॥

सरी चिताक भोंवरी । अळंकाराचिया परी । नामें जालीं दुरी । एक सोनें आटितां ॥२॥

पिसांचीं पारवीं । करोनि बाजागिरी दावी । तुका म्हणे तेवीं । मज नको चाळवूं ॥३॥

१८०२

नेघें तुझें नाम । न करीं सांगितलें काम ॥१॥

वाढे वचनें वचन । दोष उच्चारितां गुण ॥ध्रु.॥

आतां तुझ्या घरा । कोण करी येरझारा ॥२॥

तुका म्हणे ठायीं । मजपाशीं काय नाहीं ॥३॥

१८०३

व्यवहार तो खोटा । आतां न वजों तुझ्या वाटा ॥१॥

एका नामा नाहीं ताळ । केली सहजरांची माळ ॥ध्रु.॥

पाहों जातां घाईं । खेळसी लपंडाईं ॥२॥

तुका म्हणे चार । बहु करितोसी फार ॥३॥

१८०४

लटिका चि केला । सोंग पसारा दाविला ॥१॥

अवघा बुडालासी ऋणें । बहुतांचे देणें घेणें ॥ध्रु.॥

लावियेलीं चाळा । बहू दावूनि पुतळा ॥२॥

तुका म्हणे हात । आम्ही अवरिली मात ॥३॥

१८०५

दाखवूनि आस । केला बहुतांचा नास ॥१॥

थोंटा झोडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ॥ध्रु.॥

सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ॥२॥

तुका म्हणे काय । तुझे घ्यावें उरे हाय ॥३॥

१८०६

लाज ना विचार । बाजारी तूं भांडखोर ॥१॥

ऐसें ज्याणें व्हावें । त्याची गांठी तुजसवें ॥ध्रु.॥

फेडिसी लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ॥२॥

तुका म्हणे चोरा । तुला आप ना दुसरा ॥३॥

१८०७

ठाव नाहीं बुड । घरें वसविसी कुड ॥१॥

भलते ठायीं तुझा वास । सदा एरवी उदास ॥ध्रु.॥

जागा ना निजेला । धाला ना भुकेला ॥२॥

न पुसतां भलें । तुका म्हणे बुझें बोलें ॥३॥

१८०८

श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवे ॥१॥

तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ॥ध्रु.॥

जेवितां जवळी । येऊनियां पुंस घोळी ॥२॥

कोपेल तो घनी । तुका म्हणे नेणें मनीं ॥३॥

१८०९

वटवट केली । न विचारितां मना आली ॥१॥

मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ॥ध्रु.॥

उचित न कळे । जिव्हा भलतें चि बरळे ॥२॥

तुका म्हणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ॥३॥

१८१०

जीवें व्हावें साटी । पडे संवसारें तुटी ॥१॥

ऐशीं बोलिलों वचनें । सवें घेउनि नारायण ॥धृ.॥

नाहीं जन्मा आलों । करील ऐसें नेदीं बोलों ॥२॥

ठाव पुसी सेणें । तुका म्हणे खुंटी येणें ॥३॥

१८११

आता पंढरीराया । माझ्या निरसावें भया ॥१॥

मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ॥धृ.॥

ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥२॥

तुका म्हणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें ॥३॥

१८१२

कवतुकवाणें । बोलों बोबड्या वचनें ॥१॥

हें तों नसावें अंतरीं । आम्हां धरायाचें दुरी ॥धृ.॥

स्तुति तैसी निंदा । माना सम चि गोविंदा ॥२॥

तुका म्हणे बोलें । मज तुम्ही शिकविलें ॥३॥

१८१३

असो मागें जालें । पुडें गोड तें चांगलें ॥१॥

आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ॥धृ.॥

नेदीं अवसान । करितां नामाचें चिंतन ॥२॥

तुका म्हणे बोले । तुज आधीं च गोविलें ॥३॥

१८१४

मातेविण बाळा । आणिक न माने सोहळा ॥१॥

तैसें जालें माझ्या चित्ती । तुजविण पंढरिनाथा ॥ध्रु.॥

वाट पाहेमेघा बिंदु । नेघे चातक सरिता सिंधू ॥२॥

सारसांसी निशीं । ध्यानरवीच्या प्रकाशीं ॥३॥

जीवनाविण मत्स्य । जैसें धेनूलागीं वत्स ॥४॥

पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्त्तमानें ॥५॥

कृपणाचें धन । लोभालागीं जैसें मन ॥६॥

तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे ॥७॥

१८१५

तुजऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ॥१॥

शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । न मागतां त्यांस अढळ देसी ॥ध्रु.॥

धांवसी आडणी ऐकोनियां धांवा । कइवारें देवा भक्तांचिया ॥२॥

दोष त्यांचे जाळी कल्पकोटिवरी । नामासाटीं हरि आपुलिया ॥३॥

तुका म्हणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ॥४॥

१८१६

काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजी आतां ॥१॥

जतन हें माझें करूनि संचित । दिलें अवचित आणूनियां ॥ध्रु.॥

घडल्या दोषांचें न घली च भरी । आली यास थोरी कृपा देवा ॥२॥

नव्हतें ठाउकें आइकिलें नाहीं । न मगतां पाहीं दान दिलें ॥३॥

तुका म्हणे याच्या उपकारासाटीं । नाहीं माझें गाठीं कांहीं एक ॥४॥

१८१७

वाळूनियां जन सांडी मज दुरी । करिसील हरी ऐसें कधीं ॥१॥

आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाहीं डोळां ॥ध्रु.॥

नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥२॥

तुका म्हणे ऐसी धरितों वासना । होई नारायणा साई मज ॥३॥

१८१८

सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरी टेंके चांडाळ हें ॥१॥

म्हणऊनि पाहे तरतें बुडतें । न ल्हाये पुरतें बळ करूं ॥ध्रु.॥

काय तें संचित न कळे पाहातां । मतिमंद चित्ती उपजतें ॥२॥

तुका म्हणे ऐसें बळ नाहीं अंगी । पाहोनियां वेगीं पार टाकीं ॥३॥

१८१९

आतां नको चुकों आपुल्या उचिता । उदारा या कांता रखुमाईंच्या ॥१॥

आचरावे दोष हें आम्हां विहित । तारावे पतित तुमचें तें ॥ध्रु.॥

आम्ही तों आपुलें केलेसें जतन । घडो तुम्हांकून घडेल ते ॥२॥

तुका म्हणे विठो चतुराच्या राया । आहे ते कासया मोडों देसी ॥३॥

१८२०

मुखें बोलावें तें जीविंचें जाणसी । विदित पायांपाशीं सर्व आहे ॥१॥

आतां हें चि भलें भाकावी करुणा । विनियोग तो जाणां तुम्ही त्याचा ॥ध्रु.॥

आपलें तों येथें केलें नव्हे कांहीं । साधनाचा वांहीं पडों नये ॥२॥

तुका म्हणे देह दिला पिंडदान । वेळोवेळां कोण चिंता करी ॥३॥

१८२१

कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ॥१॥

नवल हे लीळा करात्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ॥धृ.॥

लोभालोभ एका धनाचिये ठायीं । आणिकांची सोईं चाड नाहीं ॥२॥

तुका म्हणे भूक न विचारी प्रकार । योजे तें चि सार यथाकाळें ॥३॥

१८२२

बांधे सोडी हें तों धन्याचिये हातीं । हेंकडें गोविती आपणां बळें ॥१॥

भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ॥धृ.॥

घरांत रिघावें दाराचिये सोईं । भिंतीसवें डोईं घेऊनि फोडी ॥२॥

तुका म्हणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यांसी ॥३॥

१८२३

कवण जन्मता कवण जन्मविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥१॥

कवण हा दाता कवण हा मागता । न कळे कृपावंता माव तुझी ॥धृ.॥

कवण भोगिता कवण भोगविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥२॥

कवण ते रूप कवण अरूपता । न कळे कृपावंता माव तुझी ॥३॥

सर्वां ठायीं तूं चि सर्व ही जालासी । तुका म्हणे यासी दुजें नव्हे ॥४॥

१८२४

जेथें देखें तेथें तुझी च पाउलें । विश्व अवघें कोंदाटलें ।

रूप गुण नाम अवघा मेघश्याम । वेगळें तें काय उरलें ।

जातां लोटांगणीं अवघी च मेदिनी । सकळ देव पाट जालें ।

सदा पर्वकाळ सुदिन सुवेळ । चत्ति प्रेमें असे धालें ॥१॥

अवघा आम्हां तूं च जालासी देवा । संसार हेवा कामधंदा ।

न लगे जाणें कोठें कांहीं च करणें । मुखीं नाम ध्यान सदा ॥ध्रु.॥

वाचा बोले ते तुझे चि गुणवाद । मंत्रजप कथा स्तुति ।

भोजन सारूं ठायीं फल तांबोल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ।

चालतां प्रदक्षणा निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रति ।

देखोन दृष्टी परस्परें गोष्टी । अवघ्या तुझ्या मूर्ति ॥२॥

जाल्या तीर्थरूप वावी नदी कूप । अवघें गंगाजळ जालें ।

महाल मंदिरें माड्या तनघरें । झोपड्या अवघीं देव देवाइलें ।

ऐकें कानीं त्या हरिनामध्वनी । नाना शब्द होत जाले ।

तुका म्हणे या विठोबाचे दास । सदा प्रेमसुखें धाले ॥३॥

१८२५

जे दोष घडले न फिटे करितां कांहीं । सरते तुझ्या पायीं जाले तैसे ॥१॥

माझा कां हो करूं नये अंगीकार । जालेती निष्ठ पांडुरंगा ॥ध्रु.॥

यातिहीन नये ऐकों ज्यां वेद । तयां दिलें पद वैकुंठींचें ॥२॥

तुका म्हणे कां रे एकाचा आभार । घेसी माथां भार वाहोनियां ॥३॥

१८२६

हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची॥१॥

म्हणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे ॥ध्रु.॥

निर्लज्ज भोजें नाचत रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ॥२॥

तुका म्हणे विकलें देवें । आपण भावें संवसाटी ॥३॥

१८२७

साधन संपत्ति हें चि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ॥१॥

शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळी च नीट सुखरूप ॥ध्रु.॥

वैष्णवांचा संग रामगाणें गाणें । मंडित भूषण अळंकार ॥२॥

भवनदी आड नव्हतीसी जाली । कोरडी च चाली जावें पायी ॥३॥

मायबाप दोघें पाहातील वाट । ठेवूनिया कटीं कर उभी ॥४॥

तुका म्हणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ॥५॥

१८२८

यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ।

वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणीं धांडोळितां॥१॥

आतां मज क्षमा करावें देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥ध्रु.॥

सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदां श्रुतीं ।

तो आम्ही भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥२॥

सहजरमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रम्हा ठेला ।

तेथें माझी देहबुद्धि तें काईं । थोर मी अन्यायी तुका म्हणे ॥३॥

१८२९

कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्ती । ते ही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥१॥

आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणारे भोगिता नारायण ॥ध्रु.॥

ओविये दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥२॥

नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें एका प्रीती नारायणा ॥३॥

तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥४॥

१८३०

डोळियां पाझर कंठ माझा दाटे । येऊं देई भेटे पांडुरंगे ॥१॥

बहु दिस टाकिले निरास कां केलें । कोठें वो गुंतलें चत्ति तुझें ॥ध्रु.॥

बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ॥२॥

पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ॥३॥

तुजविण कोण सांवा धांवा करी । ये वो झडकरी पांडुरंगे ॥४॥

काय तुझी वाट पाहों कोठवरी । कृपाळु कांपरी विसरलासी ॥५॥

एक वेळ माझा धरूनि आठव । तुका म्हणे ये वो न्यावयासी ॥६॥

१८३१

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥१॥

काय करूं या मना आतां । का विसरातें पंढरिनाथा ।

करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥ध्रु.॥

भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥२॥

बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥३॥

किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळे ॥४॥

मज राखें आतां । तुका म्हणे पंढरिनाथा ॥५॥

१८३२

कथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ॥१॥

करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ॥ध्रु.॥

देऊळ नव्हे घर । प्रपंच परउपकार ॥२॥

विधिसेवन काम । नव्हे शब्द रामराम ॥३॥

हत्या क्षत्रधर्म । नव्हे निष्काम तें कर्म ॥४॥

तुका म्हणे संतीं । करूनि ठेविली आइती ॥५॥

१८३३

पडोनियां राहीं । उगा च संतांचिये पायीं ॥१॥

न लगे पुसणें सांगावें । चत्ति शुद्ध करीं भावें ॥ध्रु.॥

सहज ते स्थिति । उपदेश परयुक्ति ॥२॥

तुका म्हणे भाव । जवळी धरूनि आणी देव ॥३॥

१८३४

देवाचे घरीं देवें केले चोरी । देवें देव नागवूनि केला भिकारी ॥१॥

धांवणियां धांवा धांवणियां धांवा । माग चि नाहीं जावें कवणिया गांव ॥ध्रु.॥

सवें चि होता चोर घरिचिया घरीं । फावलियावरी केलें अवघें वाटोळें ॥२॥

तुका म्हणे येथें कोणी च नाहीं । नागवलें कोण गेलें कोणाचें काईं ॥३॥

१८३५

अवघे चि निजों नका अवघिये ठायीं । वेळ अवेळ तरी सांभाळावी कांहीं ॥१॥

जतन करा रे जतन करा । घालूं पाहे घरावरी घाला चोरटें ॥ध्रु.॥

सीतरिलीं फार खाती भोंवताले फेरे । गेलें नये हातां सेकीं तळमळ उरे ॥२॥

तुका म्हणे आम्ही करूं आपलें जतन । न लगे कांहीं कोणां द्यावें उघडा रे कान ॥३॥

१८३६

काळोखी खाऊन कैवाड केला धीर । आपुलिया हितें जाले जनामध्यें शूर ॥१॥

कां रें तुम्ही नेणां कां रे तुम्ही नेणां । अल्पसुखासाटीं पडशी विपत्तीचे घाणां ॥ध्रु.॥

नाहीं ऐसी लाज काय तयांपें आगळें । काय नव्हे केलें आपुलिया बळें ॥२॥

तुका म्हणे तरी सुख अवघें चि बरें । जतन करून हे आपुलालीं ढोरें ॥३॥

१८३७

जाय परतें काय आणिला कांटाळा । बोला एक वेळा ऐसें तरी ॥१॥

कां हो केलें तुम्ही निष्ठ देवा । मानेना हे सेवा करितों ते ॥ध्रु.॥

भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी । तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ॥२॥

तुका म्हणे तुम्हापासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥३॥

१८३८

अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुम्हांवरी ॥१॥

आवरितां चत्ति नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥ध्रु.॥

अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । म्हणोनि अंतर तुझ्या पायीं ॥२॥

तुका म्हणे काय करूं नेणें वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥३॥

१८३९

तुजकरितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ॥१॥

कां नये कैवार करूं अंगीकार । माझा बहु भार चड जाला ॥ध्रु.॥

चुकलासी म्हणों तरी जीवांचा ही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ॥२॥

तुका म्हणे ऐसें काय सत्ताबळ । माझे परी कृपाळ आहां तुम्ही ॥३॥

१८४०

फळ देंठींहून झडे । मग मागुतें न जोडे ॥१॥

म्हणोनि तांतडी खोटी । कारण उचिताचे पोटीं ॥ध्रु.॥

पुढें चढे हात । त्याग मागिलां उचित ॥२॥

तुका म्हणे रणीं । नये पाहों परतोनि ॥३॥

१८४१

अगी देखोनियां सती । अंगीं रोमांच उठती ॥१॥

हा तो नव्हे उपदेश । सुख अंतरीं उल्हासे ॥ध्रु.॥

वित्तगोतांकडे । चत्ति न घाली न रडे ॥२॥

आठवूनि एका । उडी घाली म्हणे तुका ॥३॥

१८४२

फळ पिके देंठीं । निमित्य वारियाची भेटी ॥१॥

हा तों अनुभव रोकडा । कळों येतो खरा कुडा ॥ध्रु.॥

तोडिलिया बळें । वांयां जाती काचीं फळें ॥२॥

तुका म्हणे मन । तेथे आपुलें कारण ॥३॥

१८४३

हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥१॥

मग तयाच्या आधारें । करणें अवघें चि बरें ॥ध्रु.॥

सुख दुःख साहे । हर्षामर्षी भंगा नये ॥२॥

तुका म्हणे जीवें । आधीं मरोनि राहावें ॥३॥

१८४४

धांवे माते सोईं । बाळ न विचारितां कांहीं ॥१॥

मग त्याचें जाणें निकें । अंग वोडवी कौतुकें ॥ध्रु.॥

नेणे सर्प दोरी । अगी भलतें हातीं धरी ॥२॥

तीविन तें नेणें । आणीक कांहीं तुका म्हणे ॥३॥

१८४५

भोग द्यावे देवा । त्याग भोगीं च बरवा ॥१॥

आपण व्हावें एकीकडे । देव कळेवरी जोडे ॥ध्रु.॥

योजे यथाकाळें । उत्तम पाला कंदें मूळें ॥२॥

वंचक त्यासी दोष । तुका म्हणे मिथ्या सोस ॥३॥

१८४६

पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ॥१॥

मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ॥ध्रु.॥

नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ॥२॥

तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका म्हणे ॥३॥

१८४७

जायांचें अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥१॥

गुसळितां ताक कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वांयां ॥२॥

तुका म्हणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥३॥

१८४८

न बोलावें परी पडिला प्रसंग । हाकलितें जग तुझ्या नामें ॥१॥

लटिकें चि सोंग मांडिला पसारा । भिकारी तूं खरा कळों आलें ॥ध्रु.॥

निलाजिरीं आम्ही करोनियां धीर । राहिलों आधार धरूनियां ॥२॥

कैसा नेणों आतां करिसी शेवट । केली कटकट त्याची पुढें॥३॥

तुका म्हणे कांहीं न बोलसी देवा । उचित हे सेवा घेसी माझी ॥४॥

१८४९

नाहीं जालें मोल कळे देतां काळीं । कोण पाहों बळी दोघांमध्यें ॥१॥

आम्ही तरी जालों जीवासी उदार । कैंचा हा धीर तुजपाशीं ॥ध्रु.॥

बहु चाळविलें मागें आजिवरी । आतां पुढें हरि जाऊं नेदीं ॥२॥

नव्हती जों भेटी नामाची ओळखी । म्हणऊनि दुःखी बहु जालें ॥३॥

तुका म्हणे कांहीं राहों नेदीं बाकी । एकवेळा चुकी जाली आतां ॥४॥

१८५०

कैसा कृपाळु हें न कळसी देवा । न बोलसी सेवा घेसी माझी ॥१॥

काय ऐसें बळ आहे तुजपाशीं । पाहों हा रिघेसी कोणा आड ॥ध्रु.॥

पाडियेला ठायीं तुझा थारा मारा । अवघा दातारा लपसी तो ॥२॥

आतां तुम्हां आम्हां उरी तों चि बरें । काय हें उत्तरें वाढवूनि ॥३॥

तुका म्हणे मज साहए झाले संत । म्हणऊनि मात फावली हे ॥४॥

१८५१

चुकलिया आम्हां करितसां दंड । हाकासी कां खंड पांडुरंगा ॥१॥

चाळविलीं एकें रिद्धिसिद्धीवरी । तैसा मी भिकारी नव्हें देवा ॥ध्रु.॥

कां मी येथें गुंतों मांडूनि पसारा । मागुता दातारा दंभासाटीं ॥२॥

केलें म्यां जतन आपुलें वचन । ठायींचें धरून होतों पोटीं ॥३॥

तुका म्हणे ताळा घातला आडाखीं । ठावें होतें सेकीं आडविसी ॥४॥

१८५२

कृपावंता कोप न धरावा चित्ती । छळूं वक्रोक्ति स्तुती करूं ॥१॥

आम्ही तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते ॥ध्रुवों.॥

अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुणा सचिता सवाौत्तमा ॥२॥

चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लाहान भक्तिकाजा ॥३॥

तुका म्हणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥४॥

१८५३

आतां तुझा भाव कळों आला देवा । ठकूनियां सेवा घेसी माझी ॥१॥

टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतावरी भार ॥ध्रु.॥

स्तुती करवूनि पिटिला डांगोरा । तें कोण दातारा साच करी ॥२॥

जातीचें वाणी मी पोटींचे कुडें । नका मजपुढें ठकाठकी ॥३॥

तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा । आधीं च मी देवा कैसें नाचों ॥४॥

१८५४

जन पूजी याचा मज कां आभार । हा तुम्ही विचार जाणां देवा ॥१॥

पत्र कोण मानी वंदितील सिक्का । गौरव सेवका त्या चि मुळें ॥ध्रु.॥

मी मीपणें होतों जनामधीं आधीं । कोणें दिलें कधीं काय तेव्हां ॥२॥

आतां तूं भोगिता सर्व नारायणा । नको आम्हां दीनां पीडा करूं ॥३॥

आपुलिया हातें देसील मुशारा । तुका म्हणे खरा तो चि आम्हां ॥४॥

१८५५

आमची कां नये तुम्हासी करुणा । किती नारायणा आळवावें ॥१॥

काय जाणां तुम्ही दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया ॥ध्रु.॥

देती घेती करिती खटपटा आणिकें । निराळा कौतुकें पाहोनियां ॥२॥

दिवस बोटी आम्हीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ॥३॥

तुका म्हणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आम्ही ॥४॥

१८५६

तुम्हां आम्हां तुटी होईल यावरी । ऐसें मज हरी दिसतसे ॥१॥

वचनाचा कांहीं न देखों आधार । करावा हा धीर कोठवरी ॥ध्रु.॥

सारिलें संचित होतें गांठी कांहीं । पुढें ॠण तें ही नेदी कोणी ॥२॥

जावें चि न लगे कोणांचिया घरा । उडाला पातेरा तुझ्या संगें ॥३॥

तुका म्हणे आम्हां हा चि लाभ जाला । मनुष्यधर्म गेला पांडुरंगा ॥४॥

१८५७

देव मजुर देव मजुर । नाहीं उजुर सेवेपुढें ॥१॥

देव गांढ्याळ देव गांढ्याळ । देखोनियां बळ लपतसे ॥२॥

देव तर काईं देव तर काईं । तुका म्हणे राईं तरी मोटी ॥३॥

१८५८

देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा ॥१॥

देव उदार देव उदार । थोड्यासाटीं फार देऊं जाणे ॥२॥

देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥३॥

१८५९

देव बासर देव बासर । असे निरंतर जेथें तेथें ॥१॥

देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा म्हूण कोंडी ॥ध्रु.॥

देव लागट देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ॥२॥

देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडी ॥३॥

देव न व्हावा देव न व्हावा । तुका म्हणे गोवा करी कामीं ॥४॥

१८६०

देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी ॥१॥

देव अकुळी देव अकुळी । भलते ठायीं सोयरीक ॥२॥

देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका म्हणे भाड्या दंभें ठकी ॥३॥

१८६१

देव बराडी देव बराडी । घाली दैंठासाटीं उडी ॥१॥

देव भ्याड देव भ्याड । राखे बळीचें कवाड ॥ध्रु.॥

देव भाविक भाविक । होय दासाचें सेवक ॥२॥

देव होया देव होया । जैसा म्हणे तैसा तया ॥३॥

देव लाहान लाहान । तुका म्हणे अनुरेण ॥४॥

१८६२

देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला ॥१॥

देव उदार उदार । देतां नाहीं थोडें फार ॥ध्रु.॥

देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥२॥

देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवां ॥३॥

देव चांगला चांगला । तुका चरणीं लागला ॥४॥

१८६३

देव पाहों देव पाहों । उंचे ठायीं उभे राहों ॥१॥

देव देखिला देखिला । तो नाहीं कोणां भ्याला ॥ध्रु.॥

देवा कांहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ॥२॥

देव जाणे देव जाणे । पुरवी मनींचिये खुणे ॥३॥

देव कातर कातर । तुका म्हणे अभ्यंतर ॥४॥

१८६४

देव आमचा आमचा । जीव सकळ जीवांचा ॥१॥

देव आहे देव आहे । जवळीं आम्हां अंतरबाहे ॥ध्रु.॥

देव गोड देव गोड । पुरवी कोडाचें ही कोड ॥२॥

देव आम्हां राखे राखे । घाली कळिकाळासी काखे ॥३॥

देव दयाळ देव दयाळ । करी तुक्याचा सांभाळ ॥४॥

१८६५

जाऊं देवाचिया गांवां । देव देईल विसांवा ॥१॥

देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ॥ध्रु.॥

घालूं देवासी च भार । देव सुखाचा सागर ॥२॥

राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥३॥

तुका म्हणे आम्ही बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥४॥

१८६६

प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ॥१॥

प्रेम यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ॥ध्रु.॥

प्रेमें पाठी लागे बळें । भक्त देखोनियां भोळे ॥२॥

प्रेम न वजे दवडितां । शिरे बळें जेथें कथा ॥३॥

तुका म्हणे थोर आशा । प्रेमा घरीं विष्णुदासां ॥४॥

१८६७

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥१॥

तुम्ही कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥ध्रु.॥

गोविलों थोरिवां । दुःख वाटतसे जीवा ॥२॥

तुका म्हणे माया । अवरा हे पंढरिराया ॥३॥

१८६८

नाहीं तुम्ही केला । अंगीकार तो विठ्ठला ॥१॥

सोंगें न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ॥ध्रु.॥

प्रेम नाही अंगीं । भले म्हणविलें जगीं ॥२॥

तुका म्हणे देवा । मज वांयां कां चाळवा ॥३॥

१८६९

आतां चक्रधरा । झणी आम्हांस अव्हेरा ॥१॥

तुमचीं म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ॥ध्रु.॥

काळ आम्हां खाय । तरी तुझें नांव जाय ॥२॥

तुका म्हणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥३॥

१८७०

मज ऐसें कोण उद्धरिलें सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ॥१॥

हातींच्या कांकणां कायसा आरिसा । उरलों मी जैसा तैसा आहें ॥ध्रु.॥

धनमंत्री हरी रोग्याचिये वेथे । तें तों कांहीं येथें न देखिजे ॥२॥

तुका म्हणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ॥३॥

१८७१

काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय जालीं बळें शक्तिहीण ॥१॥

माझिया संचितें आणिलासी हरी । जालें तुजवरी वरिष्ठ तें ॥ध्रु.॥

काय गमाविली सुदर्शन गदा । नो बोला गोविंदा लाजतसां ॥२॥

तुका म्हणे काय ब्रिदाचें तें काम । सांडा परतें नाम दिनानाथ ॥३॥

१८७२

बळ बुद्धी वेचुनियां शक्ति । उदक चालवावें युक्ति ॥१॥

नाहीं चळण तया अंगीं । धांवें लवणामागें वेगीं ॥ध्रु.॥

पाट मोट कळा । भरित पखाळा सागळा ॥२॥

बीज ज्यासी घ्यावें । तुका म्हणे तैसें व्हावें ॥३॥

१८७३

न म्हणे साना थोर । दृष्ट पापी अथवा चोर ॥१॥

सकळा द्यावी एकी चवी । तान हरूनि निववी ॥ध्रु.॥

न म्हणे दिवस राती । सर्व काल सर्वां भूतीं ॥२॥

तुका म्हणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ॥३॥

१८७४

इच्छा चाड नाहीं । न धरी संकोच ही कांहीं ॥१॥

उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज व्हावें ॥ध्रु.॥

मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ॥२॥

तुका म्हणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ॥३॥

१८७५

तरले ते मागें आपुलिया सत्ता । कमाईं अनंता करूनियां ॥१॥

उसनें फेडितां धर्म तेथैं कोण । ते तुज अनन्ये तुम्ही त्यांसी ॥ध्रु.॥

मज ऐसा कोण सांगा वांयां गेला । तो तुम्ही तारिला पांडुरंगा ॥२॥

तुका म्हणे नांवासारिखी करणी । न देखें हें मनीं समजावें ॥३॥

१८७६

कवणांशीं भांडों कोण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ॥१॥

धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडी एकसरें केली माझी ॥ध्रु.॥

आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनियां खोळ बुंथी घेसी ॥२॥

तुका म्हणे एके गांवींची वसती । म्हणऊनि खंती वाटे देवा ॥३॥

१८७७

आळवितां कंठ शोकला भीतर । आयुष्य वेचे धीर नाहीं मना ॥१॥

अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दिनाच्या माहेरा पांडुरंगा ॥ध्रु.॥

धन दिसे डोळा दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष जालें ॥२॥

चुकलों काय तें मज क्षमा करीं । आळिंगूनि हरी प्रेम द्यावें ॥३॥

अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरी सर्व काळ ॥४॥

तुका म्हणे माजे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥५॥

॥ शिवाजी राजे यांनीं स्वामींस अबदागिरी, घोडा, कारकून असे न्यावयास पाठविले ते अभंग ॥ १४ ॥

१८७८

दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥१॥

आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ॥ध्रु.॥

मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्ठा ॥२॥

तुका म्हणे देवा । माझे सोडववणे धांवा ॥३॥

१८७९

नावडे जें चित्ती । तें चि होसी पुरविता ॥१॥

कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवेसाटीं ॥ध्रु.॥

न करावा संग । वाटे दुरावावें जग ॥२॥

सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥३॥

जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥४॥

तुका म्हणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ॥५॥

१८८०

जाणोनि अंतर । टाळिसील करकर ॥१॥

तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ॥ध्रु.॥

उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ॥२॥

तुका म्हणे पाये । कैसे सोडीन ते पाहें ॥३॥

१८८१

नाहीं विचारीत । मेघ हागनदारी सेत ॥१॥

नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारणापें चत्ति ॥ध्रु.॥

वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥२॥

तुका म्हणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥३॥

१८८२

काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठल चि व्हावा ॥१॥

तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥ध्रु.॥

जीव दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥२॥

तुका म्हणे धन । आम्हां गोमासासमान ॥३॥

१८८३

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥१॥

पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मवितां ॥ध्रु.॥

खोलीं पडे ओली बीज । तरीं च हातीं लागे निज ॥२॥

तुका म्हणे धनी । विठ्ठल अक्षरी हीं तिन्ही ॥३॥

१८८४

मुंगी आणि राव । आम्हां सारखाची जीव ॥१॥

गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ध्रु.॥

सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्ती ॥२॥

तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥३॥

१८८५

तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ॥१॥

हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ध्रु.॥

काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥२॥

तुका म्हणे सत्ता । अवघी आमुची च आतां ॥३॥

१८८६

आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥१॥

तुमचें येर वत्ति धन । तें मज मृत्तिकेसमान ॥ध्रु.॥

कंटीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥२॥

म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥३॥

॥९॥

१८८७

नाही काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥१॥

प्रेम प्रीतीचे बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥धृ.॥

पदरीं घालीं पिळा । बाप निर्बळ साटी बाळा ॥२॥

तुका म्हणे भावें । भेणें देवा आकारावें ॥३॥

१८८८

भावापुढें बळ । नाहीं कोणाचे सबळ ॥१॥

करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ॥धृ.॥

बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥२॥

तुका म्हणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥३॥

१८८९

भावाचिया बळें । आम्ही निर्भर दुर्बळें ॥१॥

नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ती ॥धृ.॥

तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥२॥

एकछत्रीं राज । तुक्या पांडुरंगीं काज ॥३॥

१८९०

सत्तावर्त्ते मन । पाळी विठ्ठलाची आन ॥१॥

आज्ञा वाहोनियां शिरीं । सांगितलें तें चि करीं ॥धृ.॥

सरलीसे धांव । न लगे वाढवावी हांव ॥२॥

आहे नाहीं त्याचें । तुका म्हणे कळे साचें ॥३॥

१८९१

खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥१॥

आतां चुकली खटपट । झाड्या पाड्याचा बोभाट ॥ध्रु.॥

आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ॥२॥

तुका म्हणे चिंता । भार वाहे तुझ्या माथां ॥३॥

१८९२

आतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ॥१॥

चुकली हे मरमर । भार माथांचे डोंगर ॥ध्रु.॥

नसतां कांहीं जोडी । करिती बहुतें तडातोडी ॥२॥

जाला झाडापाडा । तुका म्हणे गेली पीडा ॥३॥

१८९३

संचितें चि खावें । पुढें कोणाचें न घ्यावें ॥१॥

आतां पुरे हे चाकरी । राहों बैसोनियां घरीं ॥ध्रु.॥

नाहीं काम हातीं । आराणूक दिसराती ॥२॥

तुका म्हणे सत्ता । पुरे पराधीन आतां ॥३॥

१८९४

ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास॥१॥

तरी च जोडिलें तें भोगे । कांहीं आघात न लगे ॥ध्रु.॥

वाढवावी थोरी । मुखें म्हणे तुझे हरी ॥२॥

तुका म्हणे हे गोमटी । दासा न घलावी तुटी ॥३॥

१८९५

माझा तुम्ही देवा केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ॥१॥

कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहें तैसा ॥धृ.॥

लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दुःखाचा हा ॥२॥

तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥३॥

१८९६

तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें । जीव येरेयेरें वंचिजे ना ॥१॥

हें तुम्हां सांगणें काय उगवूनि । जावें समजोनि पांडुरंगा ॥धृ.॥

जेवित्याची खूण वाढित्या अंतरीं । प्रीतीनें हे धरी चाली तेथें ॥२॥

तुका म्हणे बहु परीचे आदर । अत्यंत वेव्हारसंपादणी ॥३॥

१८९७

न पालटे एक । भोळा भक्त चि भाविक ॥१॥

येरां नास आहे पुढें । पुण्य सरतां उघडें ॥धृ.॥

नेणे गर्भवास । एक विष्णूचा चि दास ॥२॥

तुका म्हणे खरें । नाम विठोबाचे बरें ॥३॥

॥ स्वामींनीं पत्र पंढरीनाथास पंढरीस पाठविलें ते अभंग ॥ ६६ ॥ संतांबरोबर पाठविल्या पत्राचे अभंग ३६

१८९८

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरिनाथ बोलावितो ॥१॥

मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची ॥ध्रु.॥

निरांजिरें चत्ति करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥२॥

तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥३॥

१८९९

कां माझा विसर पडिला मायबाप । सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥१॥

कैसा कंठूनियां राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ध्रु.॥

नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥२॥

तुका म्हणे एक वेचूनि वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥३॥

१९००

कांहीं माझे कळों आले गुणदोष । म्हणऊनि उदास धरिलें ऐसें ॥१॥

नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥ध्रु.॥

कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचे हें घ्यावें विचारूनि ॥२॥

मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥३॥

१९०१

नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरीं कोप येऊ सुखें ॥१॥

कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ॥ध्रु.॥

नाहीं तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणीक नाहीं ॥२॥

तुका म्हणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥३॥

१९०२

आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें ॥१॥

काय करूं आतां न गमेसें जालें । बहुत सोसिलें बहु दिस ॥ध्रु.॥

घर लागे पाठी चित्ती उभे वारे । आपुलें तें झुरे पाहावया ॥२॥

तुका म्हणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भाव सिद्धी ॥३॥

१९०३

विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥१॥

धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणे थोडी मति माझी ॥ध्रु.॥

जेथें देवा तुझा न कळे चि पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥२॥

जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितों ॥३॥

तुका म्हणे विटेवरि जी पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥४॥

१९०४

देवांच्या ही देवा गोपिकांच्या पती । उदार हे ख्याती त्रिभुवनीं ॥१॥

पातकांच्या रासी नासितोसी नामें । जळतील कर्में महा दोष ॥ध्रु.॥

सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्तिचारी ॥२॥

इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वातां टाळी ॥३॥

तुका म्हणे जड जीव शक्तिहीन । त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥४॥

१९०५

काय जालें नेणों माझिया कपाळा । न देखीजे डोळां मूळ येतां ॥१॥

बहु दिस पाहें वचनासी वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ध्रु.॥

नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठ न पाहिजे ॥२॥

पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनि गोविंदा जरूरसा ॥३॥

तुका म्हणे आलें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तो ही धाक ॥४॥

१९०६

एवढा संकोच तरि कां व्यालासी । आम्ही कोणांपाशीं तोंड वासूं ॥१॥

कोण मज पुसे सिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्हीं देवा ॥ध्रु.॥

कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥२॥

कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥३॥

तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्ती पांडुरंगा ॥४॥

१९०७

देई डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ॥१॥

तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहनिऩशीं नाम घेतां थोडें ॥ध्रु.॥

फार थोडें काहीं करूनि पातळ । त्याजमध्यें काळ कडे लावूं ॥२॥

आहे माझी ते चि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ॥३॥

तुका म्हणे आम्हां लेंकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥४॥

१९०८

सीण भाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥१॥

इंद्रियांची धांव होईल कुंटित । पावेल हें चित्ती समाधान ॥ध्रु.॥

माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥२॥

आस नाहीं परी उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥३॥

तुका म्हणे माझी अविट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ॥४॥

१९०९

धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥१॥

तळमळी चत्ति घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ध्रु.॥

प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥२॥

जातों तळा येतों मागुता लौकरी । वोळशाचे फेरी सांपडलों ॥३॥

तुका म्हणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ॥४॥

१९१०

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥१॥

पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ध्रु.॥

कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥२॥

कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईंना जिव्हा कीर्ती ॥३॥

तुका म्हणे कई जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥४॥

१९११

काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ॥१॥

म्हणऊनि केली सांडी । घांस घेऊं न ल्हां तोंडीं ॥ध्रु.॥

करूं कलागती । तुज भांडणें भोंवतीं ॥२॥

तुका म्हणे टांचें । घरीं जालेंसे वरोचें ॥३॥

१९१२

कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण ॥१॥

तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां जाला भार ॥ध्रु.॥

आली कांहीं तुटी । गेली सुटोनियां गांठी ॥२॥

तुका म्हणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥३॥

१९१३

निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ॥१॥

परी हें नेघेवे चि यश । भेओं नको सुखी आस ॥ध्रु.॥

सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥२॥

न लगे निरोपासी मोल । तुका म्हणे वेचे बोल ॥३॥

१९१४

जोडीच्या हव्यासें । लागे धनांचें चि पिसें ॥१॥

मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ध्रु.॥

पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥२॥

तुका म्हणे देवा । तुला बहुत चि हेवा ॥३॥

१९१५

मविलें मविती । नेणों रासी पडिल्या किती ॥१॥

परि तूं धाला चि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥ध्रु.॥

अवघ्यां अवघा काळ । वाटा पाहाती सकळ ॥२॥

तुका म्हणे नाहीं । अराणूक तुज कांहीं ॥३॥

१९१६

न बैससी खालीं । सम उभा च पाउलीं ॥१॥

ऐसे जाले बहुत दिस । जालीं युगें अठ्ठाविस ॥ध्रु.॥

नाहीं भाग सीण । अराणूक एक क्षण ॥२॥

तुका म्हणे किती । मापें केलीं देती घेती ॥३॥

१९१७

जोडी कोणांसाटीं । एवढी करितोसी आटी ॥१॥

जरी हें आम्हां नाहीं सुख । रडों पोरें पोटीं भूक ॥ध्रु.॥

करूनि जतन । कोणा देसील हें धन ॥२॥

आमचे तळमळे । तुझें होईल वाटोळें ॥३॥

घेसील हा श्राप । माझा होऊनियां बाप ॥४॥

तुका म्हणे उरी । आतां न ठेवीं यावरी ॥५॥

१९१८

करूनि चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥१॥

जरि तूं होऊनि उदास । माझी बुडविसी आस ॥ध्रु.॥

येथें न करी काम । मुखें नेघें तुझें नाम ॥२॥

तुका म्हणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥३॥

१९१९

समर्थाचे पोटीं । आम्ही जन्मलों करंटीं ॥१॥

ऐसी जाली जगीं कीर्ति । तुझ्या नामाची फजिती ॥ध्रु.॥

येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥२॥

तुका म्हणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥३॥

१९२०

पुढें तरी चित्ती । काय येईल तें आतां ॥१॥

मज सांगोनिया धाडीं । वाट पाहातों वराडी ॥ध्रु.॥

कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥२॥

तुका म्हणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥३॥

१९२१

कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥१॥

जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥ध्रु.॥

कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥२॥

तुका म्हणे कोण दशा आली सांगा ॥३॥

१९२२

समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥१॥

आतां भावें करूनि साचा । पायां पडिलों विठोबाच्या ॥ध्रु.॥

न कळे उचित । करूं समाधान चित्ती ॥२॥

तुका म्हणे विनंती । विनविली धरा चित्ती ॥३॥

१९२३

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥१॥

घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ध्रु.॥

पत्र हातीं दिलें । जया जेथें पाठविलें ॥२॥

तुका म्हणे येती । जाइन सामोरा पुढती ॥३॥

१९२४

रुळें महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥१॥

तैसें माझें दंडवत । सांगा निरोप हा संत ॥ध्रु.॥

पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥२॥

तुका म्हणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥३॥

१९२५

तुम्ही संतजनीं । माझी करावी विनवणी ॥१॥

काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ध्रु.॥

भाका बहुतां रीती । माझी कीव काकुलती ॥२॥

न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥३॥

१९२६

होइल कृपादान । तरी मी येईंन धांवोन ॥१॥

होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥ध्रु.॥

रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥२॥

तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप ॥३॥

१९२७

परिसोनि उत्तर । जाब देईंजे सत्वर ॥१॥

जरी तूं होसी कृपावंत । तरि हा बोलावीं पतित ॥ध्रु.॥

नाणीं कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ॥२॥

तुका म्हणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥३॥

१९२८

ऐकोनियां कीर्ती । ऐसी वाटती विश्रांती ॥१॥

माते सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ध्रु.॥

बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥२॥

तुका म्हणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥३॥

१९२९

किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख ॥१॥

आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ध्रु.॥

पुण्य होतें गांठी । तरि कां लागती हे आटी ॥२॥

तुका म्हणे बळ । माझी राहिली तळमळ ॥३॥

१९३०

करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥१॥

जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ध्रु.॥

घरीं लागे कळहे । नाहीं जात तो शीतळ ॥२॥

तुका म्हणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥३॥

१९३१

आतां आशीर्वाद । माझा असो सुखें नांद ॥१॥

म्हणसी कोणा तरी काळें । आहेतसी माझीं बाळें ॥ध्रु.॥

दुरी दूरांतर । तरी घेसी समाचार ॥२॥

नेसी कधीं तरी । तुका म्हणे लाज हरी ॥३॥

१९३२

आतां हे सेवटीं । माझी आइकावी गोष्टी ॥१॥

आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥ध्रु.॥

आतां करकर । पुढें न करीं उत्तर ॥२॥

तुका म्हणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥३॥

१९३३

बोलिलों ते आतां । कांहीं जाणतां नेणतां ॥१॥

क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥ध्रु.॥

स्तुती निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥२॥

तुका म्हणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥३॥

॥३६॥

या पत्राच्या उत्तराच्या मार्गप्रतीक्षेचे अभंग १९

१९३४

माहेरिंचा काय येईंल निरोप । म्हणऊनि झोंप नाहीं डोळां ॥१॥

वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निडळा हे ठेवीं वरी बाहे ॥ध्रु.॥

बोटवरी माप लेखितों दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ॥२॥

काय नेणों संतां पडेल विसर । कीं नव्हे सादर मायबाप ॥३॥

तुका म्हणे तेथें होईंल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥४॥

१९३५

परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अंतर पडों नेदी ॥१॥

बहुकानदृष्टी आइके देखणा । पुरोनियां जना उरलासे ॥ध्रु.॥

सांगितल्याविणें जाणे अंतरिंचें । पुरवावें ज्याचें तैसें कोड ॥२॥

बहुमुखें कीर्ती आइकिली कानीं । विश्वास ही मनीं आहे माझा ॥३॥

तुका म्हणे नाहीं जात वांयांविण । पाळितो वचन बोलिलों तें ॥४॥

१९३६

यावरि न कळे संचित आपुलें । कैसें वोडवलें होइल पुढें ॥१॥

करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ॥ध्रु.॥

जोंवरी हे डोळां देखें वारकरी । तों हें भरोवरी करी चित्ती ॥२॥

आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचे ही वेग वावडती ॥३॥

तुका म्हणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥४॥

१९३७

होईल निरोप घेतला यावरी । राउळाभीतरीं जाऊनियां ॥१॥

करूनियां दधिमंगळभोजन । प्रयाण शकुनसुमुहूर्ते ॥ध्रु.॥

होतील दाटले सद्‌गदित कंठीं । भरतें या पोटीं वियोगाचें ॥२॥

येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केलीं समाधान होतीं संतीं ॥३॥

तुका म्हणे चाली न साहे मनास । पाहाती कळस परपरतों ॥४॥

१९३८

ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येते वारकरी होत वाटे ॥१॥

देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ॥ध्रु.॥

केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ती होइल प्रेम ॥२॥

गरुडटके टाळ मृदांग पताका । सांगती ते एकां एक सुख ॥३॥

तुका म्हणे आतां येती लवलाहीं । आलिंगूनि बाहीं देइन क्षेम ॥४॥

१९३९

क्षेम मायबाप पुसेन हें आधीं । न घलीं हें मधीं सुख दुःख ॥१॥

न करीं तांतडी आपणांपासूनि । आइकेन कानीं सांगतीं तें ॥ध्रु.॥

अंतरींचें संत जाणतील गूज । निरोप तो मज सांगतील ॥२॥

पायांवरी डोईं ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें आळिंगून ॥३॥

तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओवाळून सांडीं त्यांवरून ॥४॥

१९४०

होइल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ॥१॥

शृंगारूनि माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥ध्रु.॥

क्षेम आहे ऐसें होइल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥२॥

अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होइल कृपावंता निरोपिली ॥३॥

तुका म्हणे सवें येईंल मुऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ॥४॥

१९४१

दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ॥१॥

करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्ती माये ॥ध्रु.॥

लौकिकाची तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥२॥

अथवा कोणाचें घेणें लागे रीण । नाहीं तरी हीनकर्मी कांहीं ॥३॥

व्यालीचिये अंगीं असती वेधना । तुका म्हणे मना मन साक्ष ॥४॥

१९४२

बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन ते चि सोईं ॥१॥

घडी घडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ॥ध्रु.॥

नो बोलावें ऐसा करितों विचार । प्रसंगीं तों फार आठवतें ॥२॥

इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली ये चि ठायीं ॥३॥

एकसरें सोस माहेरासी जावें । तुका म्हणे जीवें घेतलासे ॥४॥

१९४३

नाहीं हानि परी न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥१॥

पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ॥ध्रु.॥

आणीक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ॥२॥

बहु कामें केलें बहु कासावीस । बहु जाले दिस भेटी नाहीं ॥३॥

तुका म्हणे त्याचें न कळे अंतर । अवस्था तों फार होते मज ॥४॥

१९४४

तोंवरी म्यां त्यास कैसें निषेधावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥१॥

कोणाचिया मुखें तट नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ॥ध्रु.॥

दिसे हानि परी निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ॥२॥

आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरी कां धीर केला नाहीं ॥३॥

तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठायीं आहे ॥४॥

१९४५

माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करिन त्यासी ॥१॥

पायांवरी माथा आळिंगीन बाहीं । घेईंन लवलाहीं पायवणी ॥ध्रु.॥

सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥२॥

आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन अघवें आहे तैसें ॥३॥

तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिली च वाचा बोलवीन ॥४॥

१९४६

वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्ती ॥१॥

विसरु न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥ध्रु.॥

कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणे फिकें ॥२॥

निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ॥३॥

तुका म्हणे हित चित्ते ओढियेलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥४॥

१९४७

आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागली ते ॥१॥

सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥ध्रु.॥

काय लाभ जाला काय होतें केणें । काय काय कोणे सांटविलें ॥२॥

मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ॥३॥

तुका म्हणे काय सांगती ते कानीं । ऐकोनियां मनीं धरुनि राहें ॥४॥

१९४८

काय करावें म्यां केले ते विचार । घडेल साचार काय पाहों ॥१॥

काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं जोडी ते चि खरी ॥ध्रु.॥

काय म्यां तेथींचें रांधिलें चाखोनि । तें हें करीं मनीं विवंचना ॥२॥

आणीक ही त्यासी बहुत कारण । बहु असे जिणें ओढीचें ही ॥३॥

तुका म्हणे आम्हां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ॥४॥

१९४९

आम्हां अराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजिवरी ॥१॥

पुत्रदाराधन होता मनी धंदा । गोवियेलों सदा होतों कामें ॥ध्रु.॥

वोडवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनि ॥२॥

मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनियां चिंता उपजली ॥३॥

तुका म्हणे वाट पाहयाचें कारण । येथीचिया हिंणें जालें भाग्य ॥४॥

१९५०

बहु दिस नाहीं माहेरिंची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें ॥१॥

आपुल्याला होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें ॥धृ.॥

तुटातें तुटतें जडती जडलें । आहे तें आपुलें आपणापें ॥२॥

बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळी च पर एक तें ही ॥३॥

काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका म्हणे ॥४॥

१९५१

होतीं नेणों जालीं कठिणें कठीण । जवळी च मन मनें ग्वाही ॥१॥

आम्ही होतों सोईं सांडिला मारग । घडिलें तें मग तिकून ही ॥धृ.॥

निश्चिंतीनें होते पुढिलांची सांडी । न चाले ते कोंडी मायबापा ॥२॥

आम्हां नाहीं त्यांचा घडिला आठव । त्यांचा बहु जीव विखुरला ॥३॥

तुका म्हणे जालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आम्हांकूनि ॥४॥

१९५२

आतां करावा कां सोंस वांयांविण । लटिका चि सीण मनासी हा ॥१॥

असेल तें कळों येईल लौकरी । आतां वारकरी आल्यापाठी ॥धृ.॥

बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥२॥

चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥३॥

तुका म्हणे आसे लागलासे जीव । म्हणऊनि कींव भाकीतसें ॥४॥

॥१९॥

संत परत आले त्यांची भेट झाली ते अभंग ११

१९५३

भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥१॥

तुम्ही क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥ध्रु.॥

मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ॥२॥

तुका म्हणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ॥३॥

१९५४

घालूनियां ज्योती । वाट पाहें दिवसराती ॥१॥

बहु उतावळि मन । तुमचें व्हावें दरुषण ॥ध्रु.॥

आलों बोळवीत । तैसें या चि पंथें चित्ती ॥२॥

तुका म्हणे पेणी । येतां जातां दिवस गणीं ॥३॥

१९५५

आजि दिवस धन्य । तुमचें जालें दरुषण ॥१॥

सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ॥ध्रु.॥

आइकतों मन । करूनि सादर श्रवण ॥२॥

तुका म्हणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥३॥

१९५६

बोलिलीं तीं काय । माझा बाप आणि माय ॥१॥

ऐसें सांगा जी झडकरी । तुम्ही सखे वारकरी ॥ध्रु.॥

पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥२॥

तुका म्हणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥३॥

१९५७

काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥१॥

आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ॥ध्रु.॥

फेडिलें मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥२॥

तुका म्हणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥३॥

१९५८

आजिचिया लाभें ब्रम्हांड ठेंगणें । सुखी जालें मन कल्पवेना ॥१॥

आर्तभूत माझा जीव जयांसाटीं । त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें ॥ध्रु.॥

वाटुली पाहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ॥२॥

माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होइल समाचार सांगती तो ॥३॥

तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळलें संकल्प संत आले ॥४॥

१९५९

आजि बरवें जालें । माझें माहेर भेटलें ॥१

डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥ध्रु.॥

धन्य जालों आतां । क्षेम देऊनियां संतां ॥२॥

इच्छेचें पावलों । तुका म्हणे धन्य जालों ॥३॥

१९६०

वोरसोनि येती । वत्सें धेनुवेच्या चित्ती ॥१॥

माझा कराया सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ॥ध्रु.॥

स्नेहें भूक तान । विसरती जाले सीण ॥२॥

तुका म्हणे कौतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥३॥

१९६१

आलें तें आधीं खाईंन भातुकें । मग कवतुकें गाईंन ओव्या ॥१॥

सांगितला आधीं आइकों निरोप । होइल माझा बाप पुसें तों तें ॥२॥

तुका म्हणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरीहून आजि ॥३॥

१९६२

आमुप जोडल्या सुखाचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां ॥१॥

काय सांगों सुख जालें आलिंगन । निवाली दर्शनें कांति माझी ॥२॥

तुका म्हणे यांच्या उपकारासाटीं । नाहीं माझे गांठी कांहीं एक ॥३॥

१९६३

पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हें ॥१॥

जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेइन पायवणी धोवोनियां ॥२॥

तुका म्हणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ॥३॥

॥११॥

पत्राचे अभंग समाप्त । ३६ । १९ । ११ ॥ ६६॥

१९६४

मना एक करीं । म्हणे जाईंन पंढरी । उभा विटेवरी । तो पाहेन सांवळा ॥१॥

करीन सांगती तें काम । जरी जपसी हें नाम । नित्य वाचे राम । हरि कृष्ण गोविंदा ॥ध्रु.॥

लागें संतांचिया पायां । कथे उल्हास गावया । आलों मागावया । शरण देई उचित ॥२॥

नाचें रंगीं वाहें टाळी । होय सादर ते काळीं । तुका म्हणे मळी । सांडूनियां अंतरी ॥३॥

१९६५

न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागरीं त्रिपुटी ।

जाय तेथें दाटी । वैष्णवांची धांवोनि ॥१॥

भाविक गे माये भोळें गुणाचें । आवडे तयाचें नाम घेतां तयासी ॥ध्रु.॥

जो नातुडे कवणिये परी । तपें दानें व्रतें थोरी ।

म्हणतां वाचे हरि । राम कृष्ण गोविंदा ॥२॥

चौदा भुवनें जया पोटीं । तो राहे भक्तांचिये कंठीं ।

करूनियां साटी। चत्ति प्रेम दोहींची ॥३॥

जया रूप ना आकार । धरी नाना अवतार ।

घेतलीं हजार । नांवें ठेवूनि आपणां ॥४॥

ऐसा भक्तांचा ॠणी । पाहातां आगमीं पुराणीं ।

नाहीं तुका म्हणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ॥५॥

१९६६

स्वल्प वाट चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ॥१॥

तुम्ही आम्ही खेळीमेळीं । गदा रोळी आनंदें ॥ध्रु.॥

ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करोनि ॥२॥

तुका म्हणे हें चि नीट । जवळी वाट वैकुंठा ॥३॥

१९६७

आनंदाच्या कोटी । सांटवल्या आम्हां पोटीं ॥१॥

प्रेम चालिला प्रवाहो । नामओघ लवलाहो ॥ध्रु.॥

अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥२॥

थडी आहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ॥३॥

१९६८

चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्वता ॥१॥

पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ॥ध्रु.॥

जेणों त्याच्या वाचें । कांहीं सोडिलें गाठीचें ॥२॥

तुका म्हणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ॥३॥

१९६९

सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥१॥

काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंकी जन ॥ध्रु.॥

विंचु हाणें नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥२॥

तुका म्हणे जाती । नरका पाउलीं चालती ॥३॥

॥६॥

स्वामींनीं स्त्रीस उपदेश केला ते अभंग ॥ ११ ॥

१९७०

पिकल्या सेताचा आम्हां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ॥१॥

सत्तर टके बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजिवरी ॥ध्रु.॥

हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज । माजघरीं बाजे बैसलासे ॥२॥

मज यासी भांडतां जाब नेदी बळें । म्हणे एका वेळे घ्याल वांटा ॥३॥

तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावें काय कोठें ॥४॥

१९७१

करितां विचार अवघें एक राज्य । दुजा कोण मज पाठी घाली ॥१॥

कोण्या रीती जावें आम्ही वो पळोनि । मोकळ अंगणीं मागें पुढें ॥ध्रु.॥

काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती याच पाठी ॥२॥

कोठें याची करूं केलों कुळवाडी । आतां हा न सोडी जीवें आम्हां ॥३॥

होऊनि बेबाख येथें चि राहावें । देईल तें खावें तुका म्हणे ॥४॥

१९७२

नागवूनि एकें नागवीं च केली । फिरोनियां आलीं नाहीं येथें ॥१॥

भेणें सुती कोणी न घेती पालवीं । करूनियां गोवी निसंतान ॥ध्रु.॥

एकें तीं गोविलीं घेऊनि जमान । हांसतील जन लोक तयां ॥२॥

सरले तयांसी घाली वैकुंठीं । न सोडी हे साटी जीवें जाली ॥३॥

तुका म्हणे जालों जाणोनि नेणती । सांपडलों हातीं याचे आम्ही ॥४॥

१९७३

आतां तूं तयास होईं वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा ॥१॥

जरूर हें जालें मज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ॥ध्रु.॥

बरें म्या तुझिया जीवाचें तें काय । व्हावें हें तें पाहें विचारूनि ॥२॥

तुज मज तुटी नव्हे या विचारें । सहित लेकुरें राहों सुखें ॥३॥

तुका म्हणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ॥४॥

१९७४

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीववित्ती साटी केली ॥१॥

न म्हणावें कोणी माझें हें करणें । हुकुम तो येणें देवें केला ॥ध्रु.॥

करूनि मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥२॥

पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आम्हां ॥३॥

तुका म्हणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥४॥

१९७५

नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥१॥

आपुला तूं गळा घेई उगवूनि । चुकवीं जाचणी गर्भवास ॥ध्रु.॥

अवेज देखोनि बांधितील गळा । म्हणोनि निराळा पळतुसें ॥२॥

देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥३॥

तुका म्हणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्ति आतां ॥४॥

१९७६

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ॥१॥

म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें जालीं मज ॥ध्रु.॥

आस निरसूनि कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥२॥

किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनि । पावसील धनी परमानंद ॥३॥

तुका म्हणे थोर चुकती सायास । भवबंद पाश तुटोनियां ॥४॥

१९७७

ऐक हें सुख होईल दोघांसी । सोहळा हे ऋषि करिती देव ॥१॥

जडितविमानें बैसविती मानें । गंधर्वांचें गाणें नामघोष ॥ध्रु.॥

संत महंत सिद्धि येतील सामोरे । सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥२॥

आलिंगूनि लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ॥३॥

तुका म्हणे तया सुखा वर्णू काय । जेव्हां बापमाय देखें डोळां ॥४॥

१९७८

देव पाहावया करीं वो सायास । न धरीं हे आस नाशिवंत ॥१॥

दिन शुद्ध सोम सकाळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥ध्रु.॥

द्विजां पाचारूनि शुद्ध करीं मन । देई वो हें दान यथाविध ॥२॥

नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥३॥

तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ॥४॥

१९७९

सुख हें नावडे आम्हां कोणा बळें । नेणसी अंधळें जालीशी तूं ॥१॥

भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥धृ.॥

द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनि हीन ॥२॥

सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥३॥

तुका म्हणे आम्हां जवळी च आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥४॥

१९८०

गुरुकृपे मज बोलविलें देवें । होईल हें घ्यावें हित कांहीं ॥१॥

सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ॥धृ.॥

होईं बळकट घालूनियां कास । हा चि उपदेश तुज आतां ॥२॥

सडा संमार्जन तुळसीवृंदावन । अतीतपूजन ब्राम्हणाचें ॥३॥

वैष्णवांची दासी होई सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥४॥

पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥५॥

तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ती धरील कोणी ॥६॥

॥११॥

१९८१

खडा रवाळी साकर । जाला नामाचा चि फेर ।

न दिसे अंतर । गोडी ठायीं निवडितां ॥१॥

तुम्ही आम्ही पांडुरंगा । भिन्न ऐसें काय सांगा ।

जाळविलें जगा । मी हें माझें यासाटीं ॥धृ॥

पायीं हातीं नाकीं शिरीं । हेम राहे अळंकारीं ।

मुसे आल्यावरी । काय निवडे वेगळें ॥२॥

निजलिया लाभ हानी । तों च खरी ते स्वप्नीं ।

तुका म्हणे दोन्ही । निवारलीं जागतां ॥३॥

१९८२

आम्ही जाणों तुझा भाव । कैंचा भक्त कैंचा देव । बीजा नाहीं ठाव । कैंचें फळ शेवटीं ॥१॥

संपादिलें बहु रूप । कैंचें पुण्य कैंचें पाप । नव्हतों आम्ही आप । आपणासी देखिलें ॥धृ.॥

एके ठायीं घरिच्याघरीं । न कळतां जाली चोरी । तेथें तें चि दुरी । जाणें येणें खुंटलें ॥२॥

तुका म्हणे धरूनि हातीं । उर ठेविली मागुती । एकांतीं लोकांतीं । देवभक्तिसोहळा ॥३॥

१९८३

कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुम्हांपुढें । सलगी लाडें कोडें । मज क्षमा करावी ॥१॥

काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा । आवडीनें सीमा । सांडविली मज हातीं ॥धृ.॥

घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें । काय म्यां सांगावें । आहे ठावें तुम्हासी ॥२॥

तुका म्हणे देवा । प्रेम लोभ न संडावा । पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ॥३॥

१९८४

बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा ।

घेइन प्रेमपान्हा । भक्तिसुख निवाडें ॥१॥

यासी तुळे ऐसे कांहीं । दुजें त्रिभुवनीं नाहीं ।

काला भात दहीं । ब्रम्हादिकां दुर्लभ ॥ध्रु.॥

निमिशा अर्ध संतसंगति । वास वैकुंठीं कल्पांतीं ।

मोक्षपदें होती । ते विश्रांति बापुडी ॥२॥

तुका म्हणे हें चि देई । मीतूंपणा खंड नाहीं ।

बोलिलों त्या नाहीं । अभेदाची आवडी ॥३॥

॥४॥

१९८५

देवा आतां ऐसा करीं उपकार । देहेचा विसर पाडीं मज ॥१॥

तरीं च हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें ॥ध्रु.॥

ठाव देई चित्ती राख पायांपाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ॥२॥

असे भय आतां लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ॥३॥

मागणें तें एक हें चि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देई ॥४॥

तुका म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भावशुद्ध ॥५॥

१९८६

तुज न करितां काय नव्हे एक । हे तों सकळिक संतवाणी ॥१॥

घेई माझा भार करीं कइवार । उतरीं हा पार भवसिंधु ॥ध्रु.॥

उचित अनुचित पापपुण्यकाला । हा तों नये मला निवडितां ॥२॥

कुंटित राहिली बोलतां बोलतां । पार न पवतां वाणी पुढें ॥३॥

पुसतां ही कोणां न कळे हें गुज । राखें आतां लाज पांडुरंगा ॥४॥

तुका म्हणे बहु पाहिलें या जीवें । वर्म जालें जी ठावें नाम तुझें ॥५॥

१९८७

मज त्याची भीड नुलंघवे देवा । जो म्हणे केशवा दास तुझा ॥१॥

मज आवडती बहु तैसे जन । करिती कीर्तन कथा तुझी ॥ध्रु.॥

सांडूनियां लाज नाचेन त्यांपुढें । आइकती कोडें नाम तुझें ॥२॥

न लगे उपचार होईंन भिकारी । वैष्णवांच्या घरीं उष्टावळी ॥३॥

तुका म्हणे जाणों उचित अनुचित । विचारूनि हित तें चि करूं ॥४॥

१९८८

तुझे पाय माझे राहियेले चित्ती । ते मज दाविती वर्म देवा ॥१॥

आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चाळवितां ॥ध्रु.॥

मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ । हें तों माझें बळ नव्हे देवा ॥२॥

पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुण शरीर सांडियेलें ॥३॥

तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥४॥

१९८९

जेथें जातों तेथें तू माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥१॥

चालों वाटे आम्ही तुझा चि आधार । चालविसी भार सवें माझा ॥ध्रु.॥

बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥२॥

अवघें जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥३॥

तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥४॥

१९९०

जालें पीक आम्हां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख ॥१॥

जाली अराणुक अवघियांपासून । अवघा गेला सीण भाग आतां ॥ध्रु.॥

अवघा जाला आम्हां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ॥२॥

अवघे चि आम्ही ल्यालों अळंकार । शोभलों हि फार अवघ्यांवरी ॥३॥

तुका म्हणे आम्ही सदेवांचे दास । करणें न लगे आस आणिकांची ॥४॥

॥६॥

१९९१

साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ॥१॥

प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्मरसें अलिप्त त्या ॥ध्रु.॥

सांगणें तें तें नाहीं करणें आपण । मोलही वचन बाध जालें ॥२॥

तुका म्हणे आम्हां भांडवल हातीं । येरझारा खाती केवढियें ॥३॥

१९९२

शुभ जाल्या दिशा अवघा चि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ॥१॥

हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे ते ही ॥ध्रु.॥

सुख दुःखाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ॥२॥

तुका म्हणे आतां आम्हांसी हें भलें । अवघे चि जाले जीव जंत ॥३॥

१९९३

पाप पुण्य दोन्ही वाहाती मारग । स्वर्गनर्कभोग यांचीं पेणीं ॥१॥

एका आड एक न लगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ॥ध्रु.॥

राहाटीं पडिलें भरोनियां रितीं । होतील मागुतीं येतीं जातीं ॥२॥

तुका म्हणे आम्ही खेळतियांमधीं । नाहीं केली बुद्धी स्थिर पाहों ॥३॥

॥३॥

१९९४

हित तें हें एक राम कंठीं राहे । नाठविती देहभाव देही ॥१॥

हा चि एक धर्म निज बीजवर्म । हें चि जाळी कर्में केलीं महा ॥ध्रु.॥

चित्ती राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ॥२॥

अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु ॥३॥

॥१॥

१९९५

माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥१॥

आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियाचे मनीं आर्त माझें ॥ध्रु.॥

तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥२॥

सुफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥३॥

तुका म्हणे तो चि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरि ॥४॥

१९९६

आमुचें जीवन हें कथाअमृत । आणिक ही संतसमागम ॥१॥

सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वादरसें गोडी पदोपदीं ॥ध्रु.॥

धालिया ढेंकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥२॥

पिकलें स्वरूप आलिया घुमरि । रासी ते अंबरीं न समाये ॥३॥

मोजितां तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुका म्हणे ॥४॥

१९९७

जोडिलें तें आतां न सरे सारितां । जीव बळी देतां हाता आलें ॥१॥

संचित सारूनि बांधिलें धरणें । तुंबिलें जीवन आक्षय हें ॥ध्रु.॥

शीत उष्ण तेथें सुखदुःख नाहीं । अंतर सबाही एक जालें ॥२॥

बीज तो अंकुर पत्र शाखा फळें । प्राप्तबीज मुळें अवघें नासे ॥३॥

तुका म्हणे नामीं राहिलीसे गोडी । बीजाच्या परवडी होती जाती ॥४॥

१९९८

भक्तिभाव आम्ही बांधिलासे गांठी । साधावितों हाटीं घ्या रे कोणी ॥१॥

सुखाचिया पेंठे घातला दुकान । मांडियेले वान रामनाम ॥ध्रु.॥

सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भवसिंधु ॥२॥

मागें भाग्यवंत जाले थोर थोर । तिहीं केला फार हा चि सांटा ॥३॥

खोटें कुडें तेथें नाहीं घातपात । तुका म्हणे चत्ति शुद्ध करीं ॥४॥

१९९९

प्रजन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुलाल्या दैवें पिके भूमि ॥१॥

बीज तें चि फळ येईल शेवटीं । लाभहानितुटी ज्याची तया ॥ध्रु.॥

दीपाचिये अंगीं नाहीं दुजाभाव । धणी चोर साव सारिखे चि ॥२॥

काउळें ढोंपरा ककर तित्तिरा । राजहंसा चारा मुक्ताफळें ॥३॥

तुका म्हणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जयां तैसा ॥४॥

२०००

धीर तो कारण एकविधभाव । पतिव्रते नाहो सर्वभावें ॥१॥

चातक हे जळ न पाहाती दृष्टी । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ध्रु.॥

सूर्यविकाशनी नेघे चंद्रामृत । वाट पाहे अस्तउदयाची ॥२॥

धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥३॥

तुका म्हणे नेम प्राणांसवेंसाटी । तरी च या गोष्टी विठोबाची ॥४॥

॥६॥

२००१

रामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ॥१॥

आणिकें दुरावलीं करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माविण ॥ध्रु.॥

रामनामीं जिंहीं धरिला विश्वास । तिंहीं भवपाश तोडियेले ॥२॥

तुका म्हणे केलें कळिकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ॥३॥

२००२

वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साही अठरांजणीं चहूं वेदीं ॥१॥

ऐसे कोणी दावा ग्रंथांचे वाचक । कर्मठ धार्मिक पुण्यशील ॥ध्रु.॥

आदिनाथ शंकर नारद मुनेश्वर । शुका ऐसा थोर आणिक नाहीं ॥२॥

तुका म्हणे मुगुटमणी हे भक्ति । आणीक विश्रांति अरतिया ॥३॥

२००३

बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुम्हां ठावें जातिकुळ ॥१॥

करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरि ॥ध्रु.॥

वाचेचा चाळक जाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥२॥

तुका म्हणे घडे अपराध नेणतां । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥३॥

२००४

संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परोपरीं लोळतसें ॥१॥

चरणींचे रज लागती अंगांस । तेण बेताळीस उद्धरती ॥ध्रु.॥

उच्छष्टि हें जमा करुनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ॥२॥

तुका म्हणे मी आणीक विचार । नेणें हे चि सार मानीतसें ॥३॥

॥४॥

२००५

एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड ॥१॥

कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥ध्रु.॥

ओठ हात तुझा जागा । येर सिणसी वाउगा ॥२॥

तुका म्हणे श्रम । एक विसरतां राम ॥३॥

२००६

आलें धरायच पेट । पुढें मागुतें न भेटे ॥१॥

होसी फजीती वरपडा । लक्ष चौऱ्यासीचे वेढां ॥ध्रु.॥

नाहीं कोणांचा सांगात । दुःख भोगितां आघात ॥२॥

एका पाउलाची वाट । कोणां सांगावा बोभाट ॥३॥

जुंतिजेसी घाणां । नाहीं मारित्या करुणा ॥४॥

तुका म्हणे हित पाहें । जोंवरि हें हातीं आहे ॥५॥

२००७

लाभ जाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी । मनुष्यदेहा ऐसी । उत्तमजोडी जोडिली ॥१॥

घेई हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें । जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥ध्रु.॥

घेउनि माप हातीं । काळ मोवी दिवस राती । चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥२॥

हित सावकासें । म्हणे करीन तें पिसें । हातीं काय ऐसें । तुका म्हणे नेणसी ॥३॥

॥३॥

२००८

सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥१॥

मनेंधरिला अभिळास । मिठी घातली पायांस ॥ध्रु.॥

होतां दृष्टादृष्टी । तापगेला उठाउठी ॥२॥

तुका म्हणे जाला । लाभें लाभ दुणावला ॥३॥

२००९

झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ॥१॥

जो हें माप तोंडें धरी । सळे जाली ते आवरी ॥ध्रु.॥

जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ॥२॥

तुका म्हणे तळ । नाहीं पाहेसा सकळ ॥३॥

२०१०

आम्ही बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे ॥१॥

काय परिहाराचें काम । जाणें अंतरींचें राम ॥ध्रु.॥

कळोनियां काय चाड । माझी लोकांसी बडबड ॥२॥

कारण सवें एका । अवघें आहे म्हणे तुका ॥३॥

२०११

उमटे तें ठायीं । तुझे निरोपावें पायीं ॥१॥

आम्हीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ॥ध्रु.॥

भोजन भोजनाच्या काळीं । मागों करूनियां आळी ॥२॥

तुका म्हणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा ॥३॥

२०१२

केला पण सांडी । ऐसियासी म्हणती लंडी ॥१॥

आतां पाहा विचारून । समर्थासी बोले कोण ॥ध्रु.॥

आपला निवाड । आपणें चि करितां गोड ॥२॥

तुम्हीं आम्हीं देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ॥३॥

आसे धुरे उणें । मागें सरे तुका म्हणे ॥४॥

२०१३

न व्हावें तें जालें । तुम्हां आम्हांसी लागलें ॥१॥

आतां हालमाकलमें । भांडोनियां काढूं वर्मे ॥ध्रु.॥

पाटोळ्यासवेंसाटी । दिली रगट्याची गांठी ॥२॥

तुका म्हणे हरी । आणूनियां करिन सरी ॥३॥

२०१४

पतितमिरासी । ते म्यां धरिला जीवेंसी ॥१॥

आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ॥ध्रु.॥

पावणांचा ठसा । दावीं मज तुझा कैसा ॥२॥

वाव तुका म्हणे जालें । रोख पाहिजे दाविलें ॥३॥

२०१५

करितां वेरझारा । उभा न राहासी वेव्हारा ॥१॥

हे तों झोंडाईंचे चाळे । काय पोटीं तें न कळे ॥ध्रु.॥

आरगुणी मुग । बैसलासी जैसा बग ॥२॥

तुका म्हणे किती । बुडविलीं आळवितीं ॥३॥

२०१६

नाहीं देणें घेणे । गोवी केली अभिमानें ॥१॥

आतां कां हो निवडूं नेदां । पांडुरंगा येवढा धंदा ॥ध्रु.॥

पांचांमधीं जावें । थोड्यासाटीं फजित व्हावें ॥२॥

तुज ऐसी नाहीं । पांडुरंगा आम्ही कांहीं ॥३॥

टाकुं तो वेव्हार । तुज बहू करकर ॥४॥

तुका म्हणे आतां । निवडूं संतां हें देखतां ॥५॥

॥९॥

२०१७

सिंचन करितां मूळ । वृक्ष वोल्हावे सकळ ॥१॥

नको पृथकाचे भरी । पडों एक मूळ धरीं ॥ध्रु.॥

पाणचोऱ्याचें दार । वरिल दाटावें तें थोर ॥२॥

वस्व जाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा ॥३॥

एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ॥४॥

तुका म्हणे धांवा । आहे पंढरिये विसांवा ॥५॥

२०१८

करूं याची कथा नामाचा गजर । आम्हां संवसार काय करी ॥१॥

म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तयाभेणें कळिकाळ ॥धृ.॥

आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ॥२॥

तुका म्हणे करूं ऐसियांचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥३॥

॥२॥

२०१९

काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥१॥

अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईंट ॥धृ.॥

काय उंदीर नाहीं धांवीं । राख लावी गाढव ॥२॥

तुका म्हणे सुसर जळीं । काउळीं कां न न्हाती ॥३॥

२०२०

मदें मातलें नागवें नाचे । अनुचित वाचे बडबडी ॥१॥

आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट ॥धृ.॥

आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ॥२॥

तुका म्हणे कळों येईल तो भाव । अंगावरिल घाव उमटतां ॥३॥

॥२॥

२०२१

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरू ॥१॥

परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥धृ.॥

अमृतें सागर भरवे ती गंगा । म्हणवेल उगा राहें काळा ॥२॥

भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धिसिद्धी ॥३॥

स्थान मान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रम्हांडासी ॥४॥

तुका म्हणे मोक्ष राहे आलीकडे । इतर बापुडें काय तेथें ॥५॥

॥१॥

२०२२

भाविकां हें वर्म सांपडलें निकें । सेविती कवतुकें धणीवरि ॥१॥

इच्छितील तैसा नाचे त्यांचे छंदें । वंदिती तीं पदें सकुमारें ॥ध्रु.॥

विसरले मुक्ति भक्तिअभिळासें । ओढत सरिसें सुखा आलें ॥२॥

तुका म्हणे नाहीं मागायाची आस । पांडुरंग त्यांस विसंबेना ॥३॥

२०२३

भक्तां समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न संगतां ॥१॥

सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ध्रु.॥

मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥२॥

तुका म्हणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मगती ॥३॥

२०२४

प्रेमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥१॥

सकळ ही तेथें वोळलीं मंगळें । वृष्टि केली जळें आनंदाच्या ॥ध्रु.॥

सकळ इंद्रियें जालीं ब्रम्हरूप । ओतलें स्वरूप माजी तया ॥२॥

तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥३॥

॥३॥

२०२५

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥१॥

काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असें ॥ध्रु.॥

नष्टदुष्टपण कवणाचें वाणू । तयाहून आनु अधिक माझें ॥२॥

कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळां आपुलिये ॥३॥

तुका म्हणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरिनाथा लावियेलें ॥४॥

॥१॥

२०२६

काळ जवळि च उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ॥१॥

कैसा हुशार सावध राहीं । आपुला तूं अपुलेठायीं ॥ध्रु.॥

काळ जवळिच उभा पाहीं । नेदी कोणासि देऊं कांहीं ॥२॥

काळें पुरविली पाठी । वरुषें जालीं तरी साठी ॥३॥

काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हे ॥४॥

तुका म्हणे काळा । कर्म मळितें तें जाळा ॥५॥

॥१॥

२०२७

दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्यलाभ पुण्य त्याचें ॥१॥

धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकांवारि ॥ध्रु.॥

मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ॥२॥

तुका म्हणे त्याचा । प्रीती आदर करा साचा ॥३॥

२०२८

साहोनियां टांकीघाये । पाषाण देव चि जाला पाहें ॥१॥

तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ॥ध्रु.॥

बाण शस्त्र साहे गोळी । सुरां ठाव उंच स्थळीं ॥२॥

तुका म्हणे सती । अग्न न देखे ज्या रीती ॥३॥

॥२॥

२०२९

तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग आत्मैपणे ।

नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ।

भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एक चि पणें ।

विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिलीं । भागलीं नुटित तेणें ॥१॥

आतां त्यांसीं काय चाले माझें बळ । जालोंसें दुर्बळ सत्वहीन ।

दग्ध पट दिसे संगति बरवंट । काय त्याचें कारण ॥ध्रु.॥

आळसें दृष्टी न पाहे आपुलें । एक चि देखिलें सर्वरूप ।

मानामान तेथें खुंटोनि राहिलें । पिसुन तो कोण बाप ।

ज्योति ना अंधार अवघा एकंकार । तेथें काय पुण्यपाप ।

विठ्ठलावांचुनि कांहीं च नावडे । वेगळाल्या भावें रूप ॥२॥

बळबडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ।

सुखदुःखाची वार्ता नाइके । अंतरलों दुरी तया ।

मीतूंपणनिःकाम होऊनि । राहिलों आपुलिया ठायां ।

तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका म्हणे देवराया ॥३॥

॥१॥

२०३०

कथा पुराण ऐकतां । झोंप नाथिलि तत्वता । खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळ ॥१॥

ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती । जाले जाणते जो चित्ती । कांहीं नेघे आपुला ॥ध्रु.॥

उदक लावितां न धरे । चिंता करी केव्हां सरे । जाऊं नका धीरें । म्हणे करितां ढवाळ्या ॥२॥

जवळी गोंचिड क्षीरा । जैसी कमळणी ददुऩरा । तुका म्हणे दुरा । देशत्यागें तयासी ॥३॥

२०३१

संदेह बाधक आपआपणयांतें । रज्जुसर्पवत भासतसे ।

भेऊनियां काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ॥१॥

आपणें चि तारी आपण चि मारी । आपण उद्धरी आपणयां ।

शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाहें मोकळिया ॥ध्रु॥

पापपुण्य कैसे भांजिले अख । दशकाचा एक उरविला ।

जाणोनियां काय होतोसी नेणता । शून्या ठाव रिता नाहीं नाहीं ॥२॥

दुरा दृष्टी पाहें न्याहाळूनि । मृगजला पाणी न म्हणें चाडा ।

धांवतां चि फुटे नव्हे समाधान । तुका म्हणे जाण पावे पीडा ॥३॥

॥२॥

२०३२

कथे उभा अंग राखे जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ॥१॥

येथें तो पातकी न येता च भला । रणीं कुचराला काय चाले ॥धृ.॥

कथे बैसोनी आणीक चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ॥२॥

तुका म्हणे ऐलपैल ते थडीचे । बुडतील साच मध्यभागीं ॥३॥

२०३३

नावडे ज्या कथा उठोनियां जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥१॥

तो असे जवळी गोंचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठायें तया दुरी ॥धृ.॥

नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥२॥

तुका म्हणे तया करावें तें काईं । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥३॥

२०३४

जवळी नाहीं चित्ति । काय मांडियेलें प्रेत ॥१॥

कैसा पाहे चद्रिद्राष्टि । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥धृ.॥

कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥२॥

त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका म्हणे ॥३॥

२०३५

दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं ॥१॥

काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ ॥धृ.॥

तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥२॥

तुका म्हणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥३॥

॥४॥

२०३६

परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणीक नांवांचीं थोडीं । एक तें कातिवें उभविलीं ढवळारें

एकाचिया कुड मेडी । एक दीनरूप आणिती मेळिया । एक ते बांधोनि माड ।

अवघियां बाजार एक चि जाला । मांविकलीं आपुल्या पाडीं ॥१॥

गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडीतसे ॥धृ.॥

एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवांचे खडे । एक समर्थ दुर्बळा घरीं ।

फार मोलाचे थोडे । एक झगमग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे ।

सभाग्य संपन्न आपुलाले घरीं । मायेक दैन्य बापुडें ॥२॥

एक मानें रूपें सारिख्या असती । अनेकप्रकार याती । ज्याचिया संचितें जैसें आलें पुढें ।

तयाची तैसी च गति । एक उंचपदीं बैसउनि सुखें । दास्य करवी एका हातीं

तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वांयां खंती ॥३॥

॥१॥

२०३७

नाहीं आम्हां शत्रु सासुरें पिसुन । दाटलें हें घन माहियेर ॥१॥

पाहें तेथें पांडुरंग रखुमाईं । सत्यभामा राही जननिया ॥ध्रु.॥

लज्जा भय कांही आम्हां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळगती ॥२॥

तुका म्हणे आम्ही सदैवाचीं बाळें । जालों लडिवाळें सकळांचीं ॥३॥

२०३८

गर्भा असतां बाळा । कोण पाळी त्याचा लळा ॥१॥

कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥ध्रु.॥

सर्प पिलीं वितां चि खाय । वांचलिया कोण माय ॥२॥

गगनीं लागला कोसरा । कोण पुरवी तेथें चारा ॥३॥

पोटीं पाषाणांचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥४॥

तुका म्हणे निश्चळ राहें । होईल तें सहज पाहें ॥५॥

२०३९

न म्हणे कवणां सद्धि साधक गंव्हार । अवघा विश्वंभर वांचूनियां ॥१॥

ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावीं तुझें ध्यान पांडुरंगा ॥ध्रु.॥

गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावी ॥२॥

देई चरणसेवा भूतांचें भजन । वर्णा अभिमान सांडवूनि ॥३॥

आशापाश माझी तोडीं माया चिंता । तुजविण वेथा नको कांहीं ॥४॥

तुका म्हणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देई प्रेम देवा ॥५॥

२०४०

अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तें च ठेलें ॥१॥

काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण ॥ध्रु.॥

लोह लागेपरिसा अंगीं । तो ही भूषण जाला जगीं ॥२॥

सरिता वोहळा ओघा । गंगे मिळोनि जाल्या गंगा ॥३॥

चंदनाच्या वासें । तरु चंदन जालेस्पर्शे ॥४॥

तुका जडला संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥५॥

॥४॥

२०४१

ऐशा भाग्यें जालों । तरी धन्य जन्मा आलों ॥१॥

रुळें तळीले पायरी । संत पाय देती वरी ॥ध्रु.॥

प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ॥२॥

तुका म्हणे सुखें । तया हरतील दुःखें ॥३॥

२०४२

करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥१॥

माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ॥ध्रु.॥

ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ॥२॥

तुका म्हणे गोड । तेथें पुरे माझें कोड ॥३॥

॥२॥

२०४३

वेद जया गाती । आम्हां तयाची संगति ॥१॥

नाम धरियेलें कंठीं । अवघा सांटविला पोटीं ॥धृ.॥

ॐकाराचें बीज । हातीं आमुचे तें निज ॥२॥

तुका म्हणे बहु मोटें । अणुरणियां धाकुटें ॥३॥

२०४४

तूं श्रीयेचा पति । माझी बहु हीन याती ॥१॥

दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ॥धृ.॥

माझ्या दीनपणां पार । नाहीं बहु तूं उदार ॥२॥

तुका म्हणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ॥३॥

२०४५

मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ॥१॥

म्या तों पसरिला हात । करीं आपुलें उचित ॥धृ.॥

आम्ही घ्यावें नाम । तुम्हां समाधान काम ॥२॥

तुका म्हणे देवराजा । वाद खंडीं तुझा माझा ॥३॥

२०४६

तुझे पोटीं ठाव । व्हावा ऐसा माझा भाव ॥१॥

करीं वासनेसारिखें । प्राण फुटे येणें दुःखें ॥ध्रु.॥

अहंकार खोटे । वाटे श्वापदांची थाटे ॥२॥

तुका म्हणे आईं । हातीं धरूनि संग देईं ॥३॥

२०४७

दारीं परोवरी । कुडीं कवाडीं मी घरीं ॥१॥

तुमच्या लागलों पोषणा । अवघे ठायीं नारायणा ॥ध्रु.॥

नेदीं खाऊं जेवूं । हातींतोंडींचें ही घेऊं ॥२॥

तुका म्हणे अंगीं । जडलों ठायींचा सलगी ॥३॥

२०४८

मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ॥१॥

व्याला वाडविलें म्हुण । मज सुख तुज सीण ॥ध्रु.॥

माझें पोट धालें । तुझे अंगीं उमटलें ॥२॥

तुका म्हणे खेळें । तेथें तुमचिया बळें ॥३॥

२०४९

जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥१॥

हें चि माझेंभांडवल ।जाणे कारण विठ्ठल ॥ध्रु.॥

भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥२॥

तुका म्हणे डोईं । ठेवीं वेळोवेळां पायीं ॥३॥

२०५०

आम्ही घ्यावें तुझें नाम । तुम्ही आम्हां द्यावें प्रेम ॥१॥

ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ॥ध्रु.॥

माझी डोईं पायांवरी । तुम्ही न धरावी दुरी ॥२॥

तुका म्हणे केला । खंड दोघांचा विठ्ठला ॥३॥

२०५१

वारिलें लिगाड । बहुदिसांचें हें जाड ॥१॥

न बोलावें ऐसें केलें । काहीं वाउगें तितुलें ॥ध्रु.॥

जाला चौघांचार । गेला खंडोनि वेव्हार ॥२॥

तुका म्हणे देवा । करीन ते घ्यावी सेवा ॥३॥

२०५२

पायरवे अन्न । मग करी क्षीदक्षीण ॥१॥

ऐसे होती घातपात । लाभे विण संगें थीत ॥ध्रु.॥

जन्माची जोडी । वाताहात एके घडी ॥२॥

तुका म्हणे शंका । हित आड या लौकिका ॥३॥

२०५३

आम्हां वैष्णवांचा । नेम काया मनें वाचा ॥१॥

धीर धरूं जिवासाटीं । येऊं नेदूं लाभा तुटी ॥ध्रु.॥

उचित समय । लाजनिवारावें भय ॥२॥

तुका म्हणे कळा । जाणों नेम नाहीं बाळा ॥३॥

२०५४

उलंघिली लाज । तेणें साधियेलें काज ॥१॥

सुखें नाचे पैलतीरीं । गेलों भवाचे सागरीं ॥ध्रु.॥

नामाची सांगडी । सुखें बांधली आवडी ॥२॥

तुका म्हणे लोकां । उरली वाचा मारीं हाका ॥३॥

२०५५

बैसलोंसे दारीं । धरणें कोंडोनि भिकारी ॥१॥

आतां कोठें हालों नेदीं । बरी सांपडली संदी ॥ध्रु.॥

किती वेरझारा । मागें घातलीया घरा ॥२॥

माझें मज नारायणा । देतां कां रे नये मना ॥३॥

भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ॥४॥

तुका म्हणे नाहीं । लाज तुझे अंगीं कांहीं ॥५॥

२०५६

जालों द्वारपाळ । तुझें राखिलें सकळ ॥१॥

नाहीं लागों दिलें अंगा । आड ठाकलों मी जगा ॥ध्रु.॥

करूनियां नीती । दिल्याप्रमाणें चालती ॥२॥

हातीं दंड काठी । भा जिवाचिये साटीं ॥३॥

बळ बुद्धी युक्ति । तुज दिल्या सर्व शक्ति ॥४॥

तुका म्हणे खरा । आतां घेईंन मुशारा ॥५॥

२०५७

फळाची तों पोटीं । घडे वियोगें ही भेटी ॥१॥

करावें चिंतन । सार तें चि आठवण ॥ध्रु.॥

चित्त चित्ती ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥२॥

तुका म्हणे देवा । पावे अंतरींची सेवा ॥३॥

॥१५॥

२०५८

दुर्बळाचें कोण । ऐके घालूनियां मन । राहिलें कारण । तयावांचूनि काय तें ॥१॥

कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें । न संगतां ठावें । पडे चर्या देखोनि ॥ध्रु.॥

काम क्रोध माझा देहीं । भेदाभेद गेले नाहीं । होतें तेथें कांहीं । तुज कृपा करितां ॥२॥

हें तों नव्हे उचित । नुपेक्षावें शरणागत । तुका म्हणे रीत । तुमची आम्हां न कळे ॥३॥

२०५९

आम्ही भाव जाणों देवा । न कळती तुझिया मावा । गणिकेचा कुढावा । पतना न्यावा दशरथ ॥१॥

तरी म्यां काय गा करावें । कोण्या रीती तुज पावें । न संगतां ठावें । तुम्हांविण न पडे ॥ध्रु.॥

दोनी फाकलिया वाटा । गोवी केला घटापटा । नव्हे धीर फांटा । आड रानें भरती ॥२॥

तुका म्हणे माझे डोळे । तुझे देखती हे चाळे । आतां येणें वेळे । चरण जीवें न सोडीं ॥३॥

२०६०

वेरझारीं जाला सीण । बहु केलें क्षीदक्षीण । भांडणासी दिन । आजी येथें फावला ॥१॥

आतां काय भीड भार । धरूनियां लोकचार । बुडवूनि वेव्हार । सरोबरी करावी ॥ध्रु.॥

आलें बहुतांच्या मना । कां रे न होसी शाहाणा । मुळींच्या वचना । आम्ही जागों आपुल्या ॥२॥

तुका म्हणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं । आतां नामधीं । उरी कांहीं राहिली ॥३॥

॥३॥

२०६१

कल्पतरूखालीं । फळें येती मागीतलीं ॥१॥

तेथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोलें ठाव ॥ध्रु.॥

द्यावें तें उत्तर । येतो प्रतित्याचा फेर ॥२॥

तुका म्हणे मनीं । आपुल्या च लाभहानि ॥३॥

२०६२

रंगलें या रंगें पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना ॥१॥

सावळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें कैसे शोभा देती ॥ध्रु.॥

पवित्र जालें तें न लिंपे विटाळा । नैदी बैसों मला आडवरी ॥२॥

तुका म्हणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनियां ॥३॥

२०६३

जगा काळ खाय । आम्ही माथां दिले पाय ॥१॥

नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंग करी साहे ॥ध्रु.॥

हरिच्या गुणें धाला । होता खात चि भुकेला ॥२॥

तुका म्हणे हळु । जाला कढत शीतळु ॥३॥

॥३॥

२०६४

ब्रम्हरस घेई काढा । जेणें पीडा वारेल ॥१॥

पथ्य नाम विठोबाचें । अणीक वाचे न सेवीं ॥ध्रु.॥

भवरोगाऐसें जाय । आणीक काय क्षुल्लकें ॥२॥

तुका म्हणे नव्हे बाधा । अणीक कदा भूतांची ॥३॥

२०६५

अंगें अनुभव जाला मज । संतरजचरणांचा ॥१॥

सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥ध्रु.॥

निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ॥२॥

तुका म्हणे भावसार । करूनि फार मिश्रित ॥३॥

२०६६

वैद्य एक पंढरिराव । अंतर्भाव तो जाणे ॥१॥

रोगाऐशा द्याव्या वल्ली । जाणे जाली बाधा ते ॥ध्रु.॥

नेदी रुका वेचों मोल । पोहे बोल प्रीतीचे ॥२॥

तुका म्हणे दयावंता । सदा चिंता दीनांची ॥३॥

२०६७

करितां कोणाचें ही काज । नाहीं लाज देवासी ॥१॥

बरे करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधुस ॥ध्रु.॥

करुनि अराणूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ॥२॥

बोले तैसी करणी करी । तुका म्हणे एक हरि ॥३॥

॥४॥

२०६८

उभें चंद्रभागे तीरीं । कट धरोनियां करीं ।

पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ॥१॥

त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा ।

संचिताचा ठेवा । जोडी हातीं लागली ॥ध्रु.॥

रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे ।

मस्तक नावडे । उठों पायांवरोनि ॥२॥

तुका म्हणे नाम । ज्याचें नासी क्रोध काम ।

हरी भवश्रम । उच्चारितां वाचेसी ॥३॥

२०६९

आम्हां हें चि भांडवल । म्हणों विठ्ठल विठ्ठल ॥१॥

सुखें तरों भवनदी । संग वैष्णवांची मांदी ॥ध्रु.॥

बाखराचें वाण । सांडूं हें जेवूं जेवण ॥२॥

न लगे वारंवार । तुका म्हणे वेरझार ॥३॥

२०७०

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥१॥

आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ध्रु.॥

दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥२॥

तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फांटे ॥३॥

॥३॥

२०७१

काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥१॥

करी अक्षरांची आटी । एके कवडी च साटीं ॥ध्रु.॥

निंदी कोणां स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥२॥

तुका म्हणे भांड । जलो जळो त्याचें तोंड ॥३॥

२०७२

मागणें तें मागों देवा । करूं भक्ति त्याची सेवा ॥१॥

काय उणे तयापाशीं । रिद्धिसिद्धी ज्याच्या दासी ॥ध्रु.॥

कायावाचामन । करूं देवा हें अर्पण ॥२॥

तुका म्हणे विश्वंभर । ज्याच्यानें हें चराचर ॥३॥

२०७३

चित्ती नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥१॥

असे भक्तांचिये घरीं । काम न संगतां करी ॥ध्रु.॥

अनाथाचा बंधु । असे अंगीं हा संबंधुं ॥२॥

तुका म्हणे भावें । देवा सत्ता राबवावें ॥३॥

२०७४

कर्कशसंगति । दुःख उदंड फजिती ॥१॥

नाहीं इह ना परलोक । मजुर दिसे जैसें रंक ॥ध्रु.॥

वचन सेंटावरी । त्याचें ठेवूनि धिक्कारी ॥२॥

तुका म्हणे पायीं बेडी । पडिली कपाळीं कुऱ्हाडी ॥३॥

॥४॥

२०७५

बीज पेरे सेतीं । मग गाडेवरी वाहाती ॥१॥

वांयां गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥ध्रु.॥

पाल्याची जतन । तरि प्रांतीं येती कण ॥२॥

तुका म्हणे आळा । उदक देतां लाभे फळा ॥३॥

२०७६

जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ॥१॥

डोळे झांकिलिया रवि । नाहीं ऐसा होय जेवीं ॥धृ.॥

बहुथोड्या आड । निवारितां लाभें जाड ॥२॥

तुका म्हणे खरें । नेलें हातींचे अंधारें ॥३॥

२०७७

मुळीं नेणपण । जाला तरी अभिमान ॥१॥

वांयां जावें हें चि खरें । केलें तेणें चि प्रकारें ॥धृ.॥

अराणूक नाहीं कधीं । जाली तरि भेदबुद्धि ॥२॥

अंतरली नाव । तुका म्हणे नाहीं ठाव ॥३॥

॥३॥

२०७८

संवसारसांते आले हो आइका । तुटीचें ते नका केणें भरूं ॥१॥

लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ॥धृ.॥

शृंगारिलें दिसे न कळें अंतर । गोविला पदर उगवेना ॥२॥

तुका म्हणे खोटें गुंपतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ॥३॥

२०७९

सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळूहळू ॥१॥

पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥धृ.॥

वेचल्याचा पाहे वरावरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥२॥

तुका म्हणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भरोनी शेवट तों ॥३॥

२०८०

बुद्धिमंद शिरीं । भार फजिती पदरीं ॥१॥

जाय तेथें अपमान । पावे हाणी थुंकी जन ॥धृ.॥

खरियाचा पाड । मागें लावावें लिगाड ॥२॥

तुका म्हणे करी । वर्म नेणें भरोवरी ॥३॥

॥३॥

२०८१

पूर्वजांसी नकाऩ । जाणें तें आइका ॥१॥

निंदा करावी चाहाडी । मनीं धरूनि आवडी ॥धृ.॥

मात्रागमना ऐसी । जोडी पातकांची रासी ॥२॥

तुका म्हणे वाट । कुंभपाकाची ते नीट ॥

२०८२

वेडीं तें वेडीं बहुत चि वेडीं । चाखतां गोडी चवी नेणे ॥धृ.॥

देहा लावी वात । पालव घाली जाली रात ॥१॥

कडिये मूल भोंवतें भोंये । मोकलुनि रडे धाये ॥२॥

लेंकरें वत्ति पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥३॥

आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे काईं ॥४॥

तुका म्हणे ऐसे जन । नर्का जातां राखे कोण ॥५॥

२०८३

आवडीचें दान देतो नारायण । बाहे उभारोनि राहिलासे ॥१॥

जें जयासी रुचे तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ॥धृ.॥

ठायीं पडिलिया तें चि लागे खावें । ठायींचे चि घ्यावें विचारूनि ॥२॥

बीज पेरूनियां तें चि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैंचें लागे ॥३॥

तुका म्हणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूं चि पाहीं शत्रु सखा ॥४॥

२०८४

अडचणीचें दार । बाहेर माजी पैस फार ॥१॥

काय करावें तें मौन्य । दाही दिशा हिंडे मन ॥धृ.॥

बाहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ॥२॥

नाहीं इंद्रियां दमन । काय मांडिला दुकान ॥३॥

सारविलें निकें । वरि माजी अवघें फिकें ॥४॥

तुका म्हणे अंतीं । कांहीं न लगे चि हातीं ॥५॥

२०८५

लय लक्षूनियां जालों म्हणती देव । तो ही नव्हे भाव सत्य जाणा ॥१॥

जालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं । नको राहूं ते ही निश्चिंतीनें ॥धृ.॥

तपें दान काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥२॥

कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥३॥

तुका म्हणे जरी होईल निष्काम । तरि च होय राम देखे डोळां ॥४॥

॥५॥

२०८६

पुरली धांव कडिये घेई । पुढें पायीं न चलवीं ॥१॥

कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंगे जिवलगे ॥ध्रु.॥

अवघी निवारावी भूक । अवघ्या दुःख जन्माचें ॥२॥

तुका म्हणे बोलवेना । लावीं स्तनां विश्वरें ॥३॥

२०८७

जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी ॥१॥

आतां तूं चि बाह्यात्कारीं । अवघ्यापरी जालासी ॥ध्रु.॥

नाहीं सायासाचें काम । घेतां नाम आवडी ॥२॥

तुका म्हणे सर्वसांगे । पांडुरंगे दयाळे ॥३॥

२०८८

जेथें माझी दृष्टि जाय । तेथें पाय भावीन ॥१॥

असेन या समाधानें । पूजा मनें करीन ॥ध्रु.॥

अवघा च अवघे देसी । सुख घेवविसी संपन्न ॥२॥

तुका म्हणे बंधन नाहीं । ऐसें कांहीं ते करूं ॥३॥

॥३॥

२०८९

नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ॥१॥

भला भला पुंडलिका । मानलासी जनलोकां ॥ध्रु.॥

कोण्या काळें सुखा । ऐशा कोण पावता ॥२॥

अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥३॥

तुका म्हणे धन्य जालें । भूमी वैकुंठ आणिलें ॥४॥

२०९०

अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास ॥१॥

जीव देऊनियां बळी । अवघीं तारिलीं दुर्बळीं । केला भूमंडळीं । माजी थोर पवाडा ॥ध्रु.॥

कांहीं न मगे याची गती । लुटवितो जगा हातीं ॥२॥

तुका म्हणे भक्तराजा । कोण वर्णी पार तुझा ॥३॥

२०९१

प्रमाण हें त्याच्या बोला । देव भक्तांचा अंकिला ॥१॥

न पुसतां जातां नये । खालीं बैसतां ही भिये ॥ध्रु.॥

अवघा त्याचा होत । जीव भावाही सहित ॥२॥

वदे उपचाराची वाणी । कांहीं माग म्हणऊनि ॥३॥

उदासीनाच्या लागें । तुका म्हणे धांवे मागें ॥४॥

२०९२

कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धांवे सेवा ॥१॥

हळूहळू फेडी ऋण । होऊनियां रूपें दीन ॥ध्रु.॥

होऊं न सके वेगळा । क्षण एक त्यां निराळा ॥२॥

तुका म्हणे भक्तिभाव । हा चि देवाचा ही देव ॥३॥

२०९३

जाणे अंतरिंचा भाव । तो चि करितो उपाव ॥१॥

न लगें सांगावें मांगावें ॥

जीवें भावें अनुसरावें । अविनाश घ्यावें । फळ धीर धरोनि ॥ध्रु.॥

बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ॥२॥

तुका म्हणे तरी । एकीं लंघियेले गिरी ॥३॥

२०९४

आम्ही नाचों तेणें सुखें । वाऊं टाळी गातों मुखें ॥१॥

देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ॥ध्रु.॥

आम्हां जाला हा निर्धार । मागें तारिलें अपार ॥२॥

तुका म्हणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ॥३॥

२०९५

जालों निर्भर मानसीं । म्हणऊनि कळलासी ॥१॥

तुझे म्हणविती त्यांस । भय चिंता नाहीं आस ॥ध्रु.॥

चुकविसी पाश । गर्भवासयातना ॥२॥

तुझें जाणोनियां वर्म । कंठीं धरियेलें नाम ॥३॥

तुका म्हणे तेणें सुखें । विसरलों जन्मदुःख ॥४॥

॥७॥

२०९६

नको दुष्टसंग । पडे भजनामधीं भंग ॥१॥

काय विचार देखिला । सांग माझा तो विठ्ठला ॥ध्रु.॥

तुज निषेधितां । मज न साहे सर्वथा ॥२॥

एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें ॥३॥

तुझे वणूप गुण । कीं हे राखों दुष्टजन ॥४॥

काय करूं एका । मुखें सांग म्हणे तुका ॥५॥

२०९७

विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणें काय ॥१॥

घेतों अमृताची धनी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥ध्रु.॥

क्रीडों वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ॥२॥

तुका म्हणे कृपावंत । ठेवीं आम्हांपाशीं चत्ति ॥३॥

२०९८

भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर जाले ॥१॥

हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ध्रु.॥

महां दोषां आला त्रास । जन्ममरणां केला नाश ॥२॥

सहस्रनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी ॥३॥

नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यावांचून ॥४॥

का म्हणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥५॥

॥३॥

२०९९

पंधरां दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥१॥

काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ॥ध्रु.॥

स्वहित कारण मानवेल जन । हरिकथा पूजन वैष्णवांचें ॥२॥

थोडे तुज घरीं होती उजगरे । देउळासी कां रे मरसी जातां ॥३॥

तुका म्हणे कां रे सकुमार जालासी । काय जाब देसी यमदूतां ॥४॥

२१००

कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहुत येणें ॥१॥

नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद ॥ध्रु.॥

देव त्याची माथां वंदी पायधुळी । दीप झाला कुळीं वंशाचिये ॥२॥

त्याची निंदा करी त्याची कुष्ठ वाणी । मुख संवदणी रजकाची ॥३॥

तुका म्हणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम ध्यावें ॥४॥

२१०१

टाळघोळ सुख नामाचा गजर । घोषें जेजेकार ब्रम्हानंदु ॥१॥

गरुडटके दिंडी पताकांचे भार । आनंद अपार ब्रम्हादिकां ॥ध्रु.॥

आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहुनि भद्रजाति ॥२॥

तेणें सुखें सुटे पाषाणां पाझर । नष्ट खळ नर शुद्ध होती ॥३॥

तुका म्हणे सोपें वैकुंठवासी जातां । रामकृष्ण कथा हे ची वाट ॥४॥

॥३॥

२१०२

देखोवेखीं करिती गुरू । नाहीं ठाउका विचारु ॥१॥

वर्म तें न पडे ठायीं । पांडुरंगाविण कांहीं ॥ध्रु.॥

शिकों कळा शिकों येती । प्रेम नाहीं कोणां हातीं ॥२॥

तुका म्हणे सार । भक्ति नेणती गव्हार ॥३॥

२१०३

भाग्यवंत म्हणों तयां । शरण गेले पंढरिराया ॥१॥

तरले तरले हा भरवसा । नामधारकांचा ठसा ॥ध्रु.॥

भक्तिमुक्तीचें तें स्थळ । भाविकनिर्मळ निर्मळ ॥२॥

गाइलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ॥३॥

२१०४

जैसें चित्ती जयावरी । तैसें जवळी तें दुरी ॥१॥

न लगे द्यावा परिहार । या कोरडें उत्तर ।

असे अभ्यंतर । साक्षभूत जवळी ॥ध्रु.॥

अवघें जाणे सूत्रधारी । कोण नाचे कोणे परी ॥२॥

तुका म्हणे बुद्धि । ज्याची ते च तया सिद्धि ॥३॥

२१०५ ना

हीं पाइतन भूपतीशीं दावा । धिग त्या कर्तव्या आगी लागो ॥१॥

मुंगियांच्या मुखा गजाचा आहार । न साहावे भार जाय जीवें ॥२॥

तुका म्हणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा ॥३॥

२१०६

तिन्ही लोक ॠणें बांधिले जयानें । सर्वसिद्धि केणें तये घरीं ॥१॥

पंढरीचोहोटां घातला दुकान । मांडियेले वान आवडीचे ॥धृ.॥

आषाढी कार्तिकी भरियेले हाट । इनाम हे पेंठ घेतां देतां ॥२॥

मुक्ति कोणी तेथें हातीं नेघे फुका । लुटितील सुखा प्रेमाचिया ॥३॥

तुका म्हणे संतसज्जन भाग्याचें । अनंतां जन्मींचे सांटेकरी ॥४॥

२१०७

दुःखाचिये साटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ॥१॥

उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पालवितो ॥धृ.॥

जाणतियाहूनि नेणत्याची गोडी । आळिंगी आवडी करूनियां ॥२॥

शीण घेऊनियां प्रेम देतो साटी । न विचारी तुटी लाभा कांहीं ॥३॥

तुका म्हणे असों अनाथ दुबळीं । आम्हांसी तो पाळी पांडुरंग ॥४॥

२१०८

आणिक मात माझ्या नावडे जीवासी । काय करूं यासी पांडुरंगा ॥१॥

मुखा तें चि गोड श्रवणां आवडी । चित्ती माझें ओढी तुझे पायीं ॥ध्रु.॥

जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम । मज होती श्रम आइकतां ॥२॥

आणिकाचें मज म्हणवितां लाज । वाटे हें सहज न बोलावें ॥३॥

तुका म्हणे मज तूं च आवडसी । सर्वभावेंविसीं पांडुरंगा ॥४॥

२१०९

कळेल हें तैसें गाईंन मी तुज । जनासवें काज काय माझें ॥१॥

करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा ॥ध्रु.॥

होऊनी निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनियां ॥२॥

काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकळिका ॥३॥

तुका म्हणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥४॥

२११०

तयासी नेणतीं बहु आवडती । होय जयां चित्तीं एक भाव ॥१॥

उपमन्यु धुरु हें काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ॥ध्रु.॥

कोळें भिल्लें पशु श्वापदें अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं ॥२॥

काय तें गोपाळें चांगलीं शाहाणीं । तयां चक्रपाणी जेवी सवें ॥३॥

तुका म्हणे भोळा भाविक हा देव । आम्ही त्याचे पाव धरूनी ठेलों ॥४॥

२१११

न लगे पाहावें अबद्ध वांकडें । उच्चारावें कोडें नाम तुझें ॥१॥

नाहीं वेळ नाहीं पंडितांचा धाक । होत कां वाचक वेदवक्ते ॥ध्रु.॥

पुराणीं ही कोठें न मिळे पाहातां । तैशीं या अनंता ठेवूं नामें ॥२॥

आपुलिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथेकाळीं ॥३॥

तुका म्हणे आम्ही आनंदें चि धालों । आनंद चि ल्यालों अळंकार ॥४॥

२११२

दैन्य दुःख आम्हां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ॥१॥

सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ॥ध्रु.॥

आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ॥२॥

आमचें मागणें मागों त्याची सेवा । मोक्षाची निर्दैवा कोणा चाड ॥३॥

तुका म्हणे पोटीं सांटविला देव । नुन्य तो भाव कोण आम्हां ॥४॥

२११३

काळतोंडा सुना । भलतें चोरुनि करी जना ॥१॥

धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ॥ध्रु.॥

मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥२॥

तुका म्हणे थीत । नागवला नव्हे हित ॥३॥

२११४

विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलता ॥१॥

मज न साहावें कानीं । विष उत्तर लागे मनीं ॥ध्रु.॥

हरीकथेतें धीकारी । शत्रु माझा तो वैरी ॥२॥

सुना काळतोंडा । जो या देवा म्हणे धोंडा ॥३॥

अहं म्हणे ब्रम्ह । नेणे भक्तीचें तें वर्म ॥४॥

तुका म्हणे क्षण । नको तयाचें दर्षण ॥५॥

२११५

यमपुरी त्यांणीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधी केला ॥१॥

अवघड कोणी न करी सांगतां । सुलभ बहुतां गोड वाटे ॥ध्रु.॥

काय ते नेणते होते मागें ॠषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ॥२॥

द्रव्य दारा कोणें स्थापियेलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ॥३॥

तुका म्हणे दोहीं ठायीं हा फजित । पावे यमदूतजना हातीं ॥४॥

२११६

न कळतां कोणीं मोडियेलें व्रत । तया प्रायिश्चत्त चाले कांहीं ॥१॥

जाणतियां वज्रलेप जाले थोर । तयांस अघोर कुंभपाक ॥ध्रु.॥

आतां जरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तें चि पाप ॥२॥

काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबिलें काय होतें ॥३॥

तुका म्हणे जना पाहा विचारूनी । सुख वाटे मनीं तें चि करा ॥४॥

२११७

वाचे विठ्ठल नाहीं । तो चि प्रेतरूप पाहीं ॥१॥

धिग त्याचें ज्यालेपण । भार न साहे मेदिन ॥ध्रु.॥

न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥२॥

जातां कांटाळे देउळा । तो चि सुना मुखकाळा ॥३॥

हरिभक्तीविण । त्याचें जळो शाहाणपण ॥४॥

तुका म्हणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥५॥

२११८

तारिलीं बहुतें चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां ॥१॥

नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाटीं ॥ध्रु.॥

जन्म नांव धरी भक्तीच्या पाळणा । आकार कारणा या च साटीं ॥२॥

असुरीं दाटली पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ॥३॥

तुका म्हणे देव भक्तपण सार । कवतुक वेव्हार तयासाटीं ॥४॥

२११९

याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्ती पायीं सुखें ॥१॥

माझें सुखदुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥ध्रु.॥

कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंखिलीं । म्हणऊनि लागली यास चिंता ॥२॥

मन राखे हातीं घेऊनियां काठी । इंद्रियें तापटीं फांकों नेदी ॥३॥

तुका म्हणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥४॥

२१२०

उभाउभी फळ । अंगीं मंत्राचे या बळ ॥१॥

म्हणा विठ्ठल विठ्ठल । गोड आणि स्वल्प बोल ॥ध्रु.॥

किळकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा ॥२॥

तुका म्हणे रोग । वारे भवाऐसा भोग ॥३॥

२१२१

जैसा अधिकार । तैसें बोलावें उत्तर ॥१॥

काय वाउगी घसघस । आम्ही विठोबाचे दास ॥ध्रु.॥

आम्ही जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ॥२॥

तुका म्हणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ॥३॥

२१२२

नव जातां घरा । आम्ही कोणाच्या दातारा ॥१॥

कां हे छळूं येती लोक । दाट बळें चि कंटक ॥ध्रु.॥

नाहीं आम्ही खात । कांहीं कोणाचें लागत ॥२॥

कळे तैसी सेवा । तुका म्हणे करूं देवा ॥३॥

२१२३

मोहरोनी चित्ती । आणूं हळूं चि वरि हिता ॥१॥

तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ॥ध्रु.॥

संवसारा भेणें । कांहीं उसंती तों पेणें ॥२॥

एखादिया भावें । तुका म्हणे जवळी यावें ॥३॥

२१२४

काय जाणों वेद । आम्ही आगमाचे भेद ॥१॥

एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनी ॥ध्रु.॥

कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ॥२॥

तुका म्हणे दीना । नुपेक्षावें नारायणा ॥३॥

२१२५

धर्माचे पाळण । करणें पाषांड खंडण ॥१॥

हें चि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥धृ.॥

तीक्षण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरें ॥२॥

नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥३॥

२१२६

निवडावें खडे । तरी दळण वोजें घडे ॥१॥

नाहीं तरि नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ॥धृ.॥

निवडावें तन । सेतीं करावें राखण ॥२॥

तुका म्हणे नीत । न विचारितां नव्हे हित ॥३॥

२१२७

दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥१॥

लात हाणोनियां वारी । गुंड वाट शुद्ध करी ॥धृ.॥

बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥२॥

तुका म्हणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ॥३॥

२१२८

नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ॥१॥

येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्ती ॥धृ.॥

नाहीं केली निंदा । आम्हीं दुसिलेंसे भेदा ॥२॥

तुका म्हणे मज । येणें विण काय काज ॥३॥

२१२९

कांहीं जडभारी । पडतां ते अवश्वरी ॥१॥

तुज आठवावे पाय । आम्हीं मोकलूनि धाय ॥ध्रु.॥

तान पीडी भूक । शीत उष्ण वाटे दुःख ॥२॥

तुका म्हणे लाड । तेथें पुरे माझें कोड ॥३॥

२१३०

होउनि कृपाळ । भार घेतला सकळ ॥१॥

तूं चि चालविसी माझें । भार सकळ ही ओझें ॥ध्रु.॥

देह तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराईं ॥२॥

कायावाचामनें । तुका म्हणे दुजें नेणें ॥३॥

२१३१

आतां होई माझे बुद्धीचा जनिता । अवरावें चित्ती पांडुरंगा ॥१॥

येथूनियां कोठें न वजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ध्रु.॥

अनावर गुण बहुतां जातींचे । न बोलावें वाचे ऐसें करीं ॥२॥

तुका म्हणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥३॥

२१३२

नित्य मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥१॥

आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हे जाळें उगवतां ॥ध्रु.॥

सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥२॥

तुका म्हणे मी तों अज्ञान चि आहें । परि तुझी पाहें वास देवा ॥३॥

२१३३

दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥१॥

तैसी परी मज झाली नारायणा । योगक्षेम जाणां तुम्ही आतां ॥ध्रु.॥

खातां लेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जनराग ॥२॥

तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥३॥

२१३४

मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ॥१॥

ऐसें गोही माझें मन मजपाशीं । तुटी मुदलेंसी दिसे पुढें ॥ध्रु.॥

पुढिलांचे मना आणि गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥२॥

तुका म्हणे जाली कोंबड्याची परी । पुढें चि उकरी लाभ नेणें ॥३॥

२१३५

किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥१॥

आतां माझें हातीं देई हित । करीं माझें चित्ती समाधान ॥ध्रु.॥

राग आला तरी कापूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजें ॥२॥

तुका म्हणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥३॥

२१३६

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशी ॥१॥

चुकलिया काम मागतों मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ध्रु.॥

पाय सांडूनिया फिरतों बासर । स्वामिसेवे चोर होऊनियां ॥२॥

तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हे घडलें न पाहिजे ॥३॥

२१३७

पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥१॥

हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥ध्रु.॥

खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ॥२॥

तुका म्हणे पाळी तोंडीचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥३॥

२१३८

आतां गुण दोष काय विचारिसी । मी तों आहे रासी पातकांची ॥१॥

पतितपावनासवें समागम । अपुलाला धर्म चालवीजे ॥ध्रु.॥

घनघायें भेटी लोखंडपरिसा । तरी अनारिसा न पालटे ॥२॥

तुका म्हणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ॥३॥

२१३९

कृपावंता दुजें नाहीं तुम्हां पोटीं । लाडें बोलें गोठी सुख मातें ॥१॥

घेउनि भातुकें लागसील पाठी । लाविसील ओंठीं ब्रम्हरस ॥ध्रु.॥

आपुलिये पांख घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ॥२॥

तुका म्हणे आम्हांकारणें गोविंदा । वागविसी गदा सुदर्शन ॥३॥

२१४०

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करीं धरोनियां ॥१॥

आतां काय माझा घडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ॥ध्रु.॥

नेदी वारा अंगीं लागों आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥२॥

तुका म्हणे बोल करितों आवडी । अविट ते चि गोडी अंतरींची ॥३॥

२१४१

पांडुरंगा कांहीं आइकावी मात । न करावें मुक्त आतां मज ॥१॥

जन्मांतरें मज तैसीं देई देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ॥ध्रु.॥

वाखाणीन कीर्ती आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुजपुढें ॥२॥

करूनि कामारी दास दीनाहुनी । आपुला अंगणीं ठाव मज ॥३॥

तुका म्हणे आम्ही मृत्युलोकीं भले । तुझे चि अंखिले पांडुरंगा ॥४॥

२१४२

माझे अंतरींचें तो चि जाणे एक । वैकुंठनायक पांडुरंग ॥१॥

जीव भाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशीं ॥ध्रु.॥

सुखसमारंभें संतसमागमें । गाऊं वाचे नाम विठोबाचें ॥२॥

गातां पुण्य होय आइकतां लाभ । संसारबंद तुटतील ॥३॥

तुका म्हणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ॥४॥

२१४३

कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा याची बरी विठोबाची ॥१॥

कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ॥धृ.॥

कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥२॥

कथा मंत्रजप कथा हरी ताप । कथाकाळी कांप किळकाळासी ॥३॥

तुका म्हणे कथा देवाचें ही ध्यान । समाधि लागोन उभा तेथें ॥४॥

॥१३॥

२१४४

काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ॥१॥

तुझे पायीं पावें ऐसा । जेणें उगवे हा फांसा ॥धृ.॥

करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ॥२॥

तुका म्हणे देवा । माझें हृदय वसवा ॥३॥

२१४५

भला म्हणे जन । परि नाहीं समाधान ॥१॥

माझें तळमळी चित्ती । अंतरलें दिसे हित ॥धृ.॥

कृपेचा आधार । नाहीं दंभ जाला भार ॥२॥

तुका म्हणे कृपे । अंतराय कोण्या पापें ॥३॥

२१४६

शिकविले बोल । बोलें तैसी नाहीं ओल ॥१॥

आतां देवा संदेह नाहीं । वांयां गेलों यासी कांहीं ॥धृ.॥

एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ॥२॥

बुद्धि नाहीं स्थिर । तुका म्हणे शब्दा धीर ॥३॥

२१४७

उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥१॥

कां रे न घालिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ॥ध्रु.॥

काय बळयुक्ति । नाहीं तुझे अंगीं शक्ति ॥२॥

तुका म्हणे तूं विश्वंभर । ओस माझें कां अंतर ॥३॥

२१४८

वाहवितों पुरीं । आतां उचित तें करीं ॥१॥

माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ॥ध्रु.॥

आम्हां ओढी काळ । तुझें क्षीण झालें बळ ॥२॥

तुका म्हणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ॥३॥

२१४९

आतां घेई माझें । भार सकळ ही ओझें ॥१॥

काय करिसी होईं वाड । आलों पोटासीं दगड ॥ध्रु.॥

तूं चि डोळे वाती । होईं दीपक सांगातीं ॥२॥

तुका म्हणे कांहीं । विचाराया चाड नाहीं ॥३॥

२१५०

असोत हे बोल । अवघें तूं चि भांडवल ॥१॥

माझा मायबाप देवा । सज्जन सोयरा केशवा ॥ध्रु.॥

गाळियेले भेद । सारियेले वादावाद ॥२॥

तुका म्हणे मधीं । आतां न पडे उपाधि ॥३॥

२१५१

करीन कोल्हाळ । आतां हा चि सर्वकाळ ॥१॥

आतां ये वो माझे आईं । देई भातुकें विठाईं ॥ध्रु.॥

उपायासी नाम । दिलें याचें पुढें क्षेम ॥२॥

बीज आणि फळ । हें चि तुका म्हणे मूळ ॥३॥

२१५२

धनासीं च धन । करी आपण जतन ॥१॥

तुज आळवितां गोडी । पांडुरंगा खरी जोडी ॥ध्रु.॥

जेविल्याचें खरें । वरी उमटे ढेंकरें ॥२॥

तुका म्हणे धाय । तेथें कोठें उरे हाय ॥३॥

२१५३

अनुभवा आलें । माझें चित्तीचें क्षरलें ॥१॥

असे जवळी अंतर । फिरे आवडीच्या फेरें ॥ध्रु.॥

खादलें चि वाटे । खावें भेटलें चि भेटे ॥२॥

तुका म्हणे उभें । आम्ही राखियेलें लोभें ॥३॥

॥१०॥

२१५४

पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥१॥

तैसें मज कां गा केलें पंढरिराया । लौकिक हा वांयां वाढविला ॥ध्रु.॥

ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्याची ॥२॥

तुका म्हणे मढें शृंगारिलें वरी । ते चि जाली परी मज देवा ॥३॥

२१५५

बेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ॥१॥

माझें चित्ती मज जवळीच गो ही । तुझी मज नाहीं भेटी ऐसें ॥ध्रु.॥

दासीसुतां नाहीं पितियाचा ठाव । अवघें चि वाव सोंग त्याचें ॥२॥

तुका म्हणे माझी केली विटंबना । अनुभवें जना येईल कळों ॥३॥

२१५६

मजपुढें नाहीं आणीक बोलता । ऐसें कांहीं चित्ती वाटतसें ॥१॥

याचा कांहीं तुम्हीं देखा परिहार । सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥ध्रु.॥

काम क्रोध नाहीं सांडिलें आसन । राहिले वसोन देहामध्यें ॥२॥

तुका म्हणे आतां जालों उतराईं । कळों यावें पायीं निरोपिलें ॥३॥

२१५७

सावित्रीची विटंबण । रांडपण करीतसे ॥१॥

काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥ध्रु.॥

कुबिर नांव मोळी वाहे । कैसी पाहें फजिती ॥२॥

तुका म्हणे ठुणगुण देखें । उगीं मूर्ख फुंदता ॥३॥

२१५८

न गमेसी जाली दिवसरजनी । राहिलों लाजोनि नो बोलावें ॥१॥

रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें कोप येत असे ॥ध्रु.॥

आपुलिया रडे आपुलें चि मन । दाटे समाधान पावतसें ॥२॥

तुका म्हणे तुम्ही असा जी जाणते । काय करूं रिते वादावाद ॥३॥

२१५९

मेल्यावरि मोक्ष संसारसंबंधें । आरालिया बधे ठेवा आम्हां ॥१॥

वागवीत संदेह राहों कोठवरी । मग काय थोरी सेवकाची ॥ध्रु.॥

गाणें गीत आम्हां नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ॥२॥

तुका म्हणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानकुळ ॥३॥

२१६०

एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरि च हे खोटे चाळे केले ॥१॥

वाजवूनि तोंड घातलों बाहेरी । कुल्प करुनी दारीं माजी वसा ॥ध्रु.॥

उजेडाचा केला दाटोनि अंधार । सवें हुद्देदार चेष्टाविला ॥२॥

तुका म्हणे भय होतें तों चि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ॥३॥

२१६१

काय नव्हेसी तूं एक । देखों कासया पृथक ॥१॥

मुंग्या कैंचे मुंगळे । नटनाट्य तुझे चाळे ॥ध्रु.॥

जाली तरी मर्यादा । किंवा त्रासावें गोविंदा ॥२॥

तुका म्हणे साचा । कोठें जासी हृदयींचा ॥३॥

२१६२

कां जी वाढविलें । न लगतां हें उगलें ॥१॥

आतां मानितां कांटाळा । भोवतीं मिळालिया बाळा ॥ध्रु.॥

लावूनियां सवे । पळतां दिसाल बरवे ॥२॥

तुका म्हणे बापा । येतां न कळा चि रूपा ॥३॥

॥३॥

२१६३

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र न विचारून ॥१॥

धर्म आहे वर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ध्रु.॥

द्रव्य आणि कन्या । येथें कुळ कर्म शोधण्या ॥२॥

तुका म्हणे पुण्य गांठी । तरि च उचितासी भेटी ॥३॥

२१६४

वेचावें तें जीवें । पूजा घडे ऐशा नावें ॥१॥

बिगारीची ते बिगारी । साक्षी अंतरींचा हरी ॥ध्रु.॥

फळ बीजाऐसें । कार्यकारणासरिसें ॥२॥

तुका म्हणे मान । लवणासारिखें लवण ॥३॥

२१६५

मज नाहीं धीर । तुम्ही न करा अंगीकार ॥१॥

ऐसें पडिलें विषम । बळी देवाहूनि कर्म ॥ध्रु.॥

चालों नेणें वाट । केल्या न पवा बोभाट ॥२॥

वेचों नेणे जीवें । तुका उदास धरिला देवें ॥३॥

२१६६

तळमळी चित्ती दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ॥१॥

वचनीं च संत पावले स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ॥ध्रु.॥

वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवे चि जीव समाधान ॥२॥

तुका म्हणे कईं देसील विसांवा । पांडुरंगे धांवा घेतें मन ॥३॥

॥४॥

२१६७

हागतां ही खोडी । चळण मोडवितें काडी ॥१॥

ऐसे अनावर गुण । आवरावे काय म्हुण ॥ध्रु.॥

नाहीं जरी संग । तरी बडबडविती रंग ॥२॥

तुका म्हणे देवा । तुमची न घडे चि सेवा ॥३॥

॥१॥

२१६८

देह निरसे तरी । बोलावया नुरे उरी ॥१॥

येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ॥ध्रु.॥

काचें तरी कढे । जाती ऐसें चित्ती ओढे ॥२॥

विष्णुदास तुका । पूर्ण धनी जाणे चुका ॥३॥

२१६९

खोट्याचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ॥१॥

काय दावायाचें काम । उगा च वाढवावा श्रम ॥ध्रु.॥

परीक्षकाविण । मिरवों जाणों तें तें हीण ॥२॥

तुका पायां पडे । वाद पुरे हे झगडे ॥३॥

॥२॥

२१७०

पंढरीस घडे अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अधःपाता ॥१॥

दुराचारें मोक्ष सुखाचे वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ॥ध्रु.॥

केला न सहावे तीर्थउपवास । कथेविण दोषसाधन तें ॥२॥

कालियापें भेद मानितां निवडे । श्रोत्रियांसी जोडे आंतेजेता ॥३॥

माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पावविते ॥४॥

तुका म्हणे तेथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ॥५॥

॥१॥

२१७१

चातुर्याच्या अनंतकळा । सत्या विरळा जाणत ॥१॥

हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे ॥ध्रु.॥

जळो ऐसे वांजट बोल । गुणां मोल भूस मिथ्या ॥२॥

तुका म्हणे अंधळ्याऐसें । वोंगळ पिसें कौतुक ॥३॥

२१७२

नयो वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धि ॥१॥

ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि ॥ध्रु.॥

कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ॥२॥

तुका म्हणे नानाछंदें । या विनोदें न पडावें ॥३॥

२१७३

माझिया देहाची मज नाहीं चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥१॥

इच्छितां ते मान मागा देवापासीं । आसा संचितासी गुंपले हो ॥ध्रु.॥

देह आम्ही केला भोगाचे सांभाळीं । राहिलों निराळीं मानामानां ॥२॥

तुका म्हणे कोणें वेचावें वचन । नसतां तो सीण वाढवावा ॥३॥

२१७४

धरितां इच्छा दुरी पळे । पाठी सोहळे उदासा ॥१॥

म्हणऊनि असट मन । नका खुण सांगतों ॥ध्रु.॥

आविसापासी अवघें वर्म । सोस श्रम पाववी ॥२॥

तुका म्हणे बीज न्यावें । तेथें यावें फळानें ॥३॥

॥४॥

२१७५

वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥१॥

तार्किंयाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखें वाईंचाळे ॥ध्रु.॥

माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खपर याचे नावें ॥२॥

तुका म्हणे आडराणें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ॥३॥

२१७६

कस्तुरीचें अंगीं मीनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखूं ॥१॥

तयापरि भेद नाहीं देवभक्तीं । संदेहाच्या युक्ति सरों द्याव्या ॥ध्रु.॥

इंधनें ते आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरुषणें वाहाळ तों चि ॥२॥

तुका म्हणे माझें साक्षीचें वचन । येथें तों कारण शुद्ध भाव ॥३॥

२१७७

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रम्हीं भोग ब्रम्हतनु ॥१॥

देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ध्रु.॥

उदक अग्नि धान्य जाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥२॥

तुका म्हणे मज केले ते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥३॥

॥३॥

२१७८

श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हें करीं दंडवत ॥१॥

विश्रांती पावलों सांभाळउत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुखें ॥ध्रु.॥

डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥२॥

तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोडवला ॥३॥

२१७९

नेणों काय नाड । आला उचित काळा आड ॥१॥

नाहीं जाली संतभेटी । येवढी हानी काय मोठी ॥ध्रु.॥

सहज पायांपासीं । जवळी पावलिया ऐसी ॥२॥

चुकी जाली आतां काय । तुका म्हणे उरली हाय ॥३॥

२१८०

आणीक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ॥१॥

माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ॥ध्रु.॥

भांडवल सेवा । हा चि ठेवियेला ठेवा ॥२॥

करीं मानभावा । तुका विनंती करी देवा ॥३॥

२१८१

आरुश माझी वाणी बोबडीं उत्तरें । केली ते लेकुरें सलगी पायीं ॥१॥

करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे ॥ध्रु.॥

आधारें वदली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवणी तुमचिया ॥२॥

तुका म्हणे हे चि करितों विनंती । मागोनि पुढती सेवादान ॥३॥

॥४॥

२१८२

पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्ति या ॥१॥

पाहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली ॥ध्रु.॥

जळो ऐसी ब्रिदावळी । भाटवोळीपणाची ॥२॥

तुका म्हणे पाहों डोळां । अवकळा नये हे ॥३॥

२१८३

वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥१॥

जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥धृ.॥

अभिमान सिरीं भार । जाले खर तृष्णेचे ॥२॥

तुका म्हणे नरका जावें । हा चि जीवें व्यापार ॥३॥

२१८४

सेवटासी जरी आलें । तरी जालें आंधळें ॥१॥

स्वहिताचा लेश नाहीं । दगडा कांहीं अंतरीं ॥धृ.॥

काय परिसासवें भेटी । खापरखुंटी जालिया ॥२॥

तुका म्हणे अधम जन । अवगुणें चि वाढवी ॥३॥

२१८५

प्रायिश्चत्तें देतो तुका । जातो लोकां सकळां ॥१॥

धरितील ते तरती मनीं । जाती घाणी वांयां त्या ॥धृ.॥

निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनि ॥२॥

तुका जाला नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ॥३॥

॥४॥

२१८६

दुर्जनाचें अंग अवघें चि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ॥१॥

खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्टणें ॥ध्रु.॥

सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळे चि ॥२॥

तुका म्हणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखट्याची ॥३॥

२१८७

ऐका जी संतजन । सादर मन करूनि ॥१॥

सकळांचें सार एक । कंटक ते तजावे ॥ध्रु.॥

विशेषता कांद्याहूनि । सेवित्या घाणी आगळी ॥२॥

तुका म्हणे ज्याची जोडी । ते परवडी बैसीजे ॥३॥

२१८८

आज्ञा पाळुनियां असें एकसरें । तुमचीं उत्तरें संतांचीं हीं ॥१॥

भागवूनि देह ठेवियेला पायीं । चरणावरि डोईं येथुनें चि ॥ध्रु.॥

येणें जाणें हें तों उपाधीचे मूळ । पूजा ते सकळ अकर्तव्य ॥२॥

तुका म्हणे असें चरणींचा रज । पदीं च सहज जेथें तेथें ॥३॥

॥३॥

२१८९

न संडावा ठाव । ऐसा निश्चयाचा भाव ॥१॥

आतां पुरे पुन्हा यात्रा । हें चि सारूनि सर्वत्रा ॥ध्रु.॥

संनिध चि सेवा । असों करुनियां देवा ॥२॥

आज्ञेच्या पाळणें । असें तुका संतां म्हणे ॥३॥

२१९०

उपाधीजें बीज । जळोनि राहिलें सहज ॥१॥

आम्हां राहिली ते आतां । चाली देवाचिया सत्ता ॥ध्रु.॥

प्राधीन तें जिणें । केलें सत्ता नारायणें ॥२॥

तुका म्हणे जाणें पाय । खुंटले आणीक उपाय ॥३॥

२१९१

गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी । हगवण घाणी पिटपिट ते ॥१॥

मस्तक सांडूनि सिसफूल गुडघां । चार तो अवघा बावळ्याचा ॥ध्रु.॥

अंगभूत म्हूण पूजितो वाहाणा । म्हणतां शाहाणा येइल कैसा ॥२॥

तुका म्हणे वेश्या सांगे सवासिणी । इतर पूजनीं भाव तैसा ॥३॥

२१९२

कुतऱ्याऐसें ज्याचें जिणें । संग कोणी न करीजे ॥१॥

जाय तिकडे हाडहाडी । गोऱ्हावाडी च सोइरीं ॥ध्रु.॥

अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ॥२॥

तुका म्हणे कैंची लवी । ठेंग्या केवीं अंकुर ॥३॥

२१९३

सर्वथा ही खोटा संग । उपजे भंग मनासी ॥१॥

बहु रंगें भरलें जन । संपन्न चि अवगुणी ॥ध्रु.॥

सेविलिया निःकामबुद्धी । मदें शुद्धी सांडवी ॥२॥

त्रासोनियां बोले तुका । आतां लोकां दंडवत ॥३॥

॥५॥

२१९४

उपचारासी वांज जालों । नका बोलों यावरी ॥१॥

असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ॥ध्रु.॥

दुसऱ्यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहु मतें ॥२॥

एकाएकीं आतां तुका । लौकिका या बाहेरी ॥३॥

२१९५

मी तें मी तूं तें तूं । कुंकुड हें लाडसी ॥१॥

वचनासी पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ॥ध्रु.॥

तेथील तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथे कोण भारें ॥२॥

याचें यास त्याचें त्यास । तुक्यानें कास घातली ॥३॥

॥२॥

२१९६

लाडाच्या उत्तरीं वाढविती कलहे । हा तो अमंगळ जातिगुण ॥१॥

तमाचे शरीरीं विटाळ चि वसे । विचाराचा नसे लेश तो ही ॥ध्रु.॥

कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥२॥

तुका म्हणे काय उपदेश खळा । न्हाउनि काउळा खतें धुंडी ॥३॥

२१९७

आतां मज देवा । इचे हातींचें सोडवा ॥१॥

पाठी लागलीसे लांसी । इच्छा जिते जैसी तैसी ॥ध्रु.॥

फेडा आतां पांग । अंगीं लपवुनी अंग ॥२॥

दुजें नेणें तुका । कांहीं तुम्हासी ठाउका ॥३॥

२१९८

बहु वाटे भये । माझे उडी घाला दये ॥१॥

फांसा गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडी ॥ध्रु.॥

कुंटित चि युक्ति । माझ्या जाल्या सर्व शक्ति ॥२॥

तुका म्हणे देवा । काममोहें केला गोवा ॥३॥

॥३॥

२१९९

विष्ठा भक्षी तया अमृत पारिखें । वोंगळ चि सखें वोंगळाचें ॥१॥

नये पाहों कांहीं गोऱ्हावाडीचा अंत । झणी ठाका संत दुर्जनापें ॥ध्रु.॥

भेंसळीच्या बीजा अमंगळ गुण । उपजवी सीण दरुषणें ॥२॥

तुका म्हणे छी थूं जया घरीं धन । तेथें तें कारण कासयाचें ॥३॥

॥१॥

२२००

चावळलें काय न करी बडबड । न म्हणे फिकें गोड भुकेलें तें ॥१॥

उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ॥ध्रु.॥

गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोणा काईं ॥२॥

तुका म्हणे भोग भोगितील भोगें । संचित तें जोगें आहे कोणा ॥३॥

२२०१

आपुला तो देह आम्हां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥१॥

कोण नाहीं दक्ष करितां संसार । आम्हीं हा विचार वमन केला ॥ध्रु.॥

नाहीं या धरीत जीवित्वाची चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥२॥

तुका म्हणे असों चिंतोनियां देवा । मी माझें हा हेवा सारूनियां ॥३॥ ॥२॥

२२०२

चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥१॥

धणी काढोनियां निजा । करील ये कामाची पूजा ॥ध्रु.॥

उचितावेगळें । अभिलाषें तोंड काळें ॥२॥

सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ॥३॥

२२०३

बरें सावधान । राहावें समय राखोन ॥१॥

नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावतां अवकळा ॥ध्रु.॥

लाभ अथवा हानी । थोड्यामध्यें च भोवनी ॥२॥

तुका म्हणे राखा । आपणा नाहीं तोंचि वाखा ॥३॥

॥२॥

२२०४

काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥१॥

जाली माकडाची परि । येतों तळा जातों वरी ॥ध्रु.॥

घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैस लात ॥२॥

आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ॥३॥

२२०५

धर्म तो न कळे । काय झांकितील डोळे ॥१॥

जीव भ्रमले या कामें । कैसीं कळों येती वर्मे ॥ध्रु.॥

विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥२॥

तुका म्हणे लांसी । माया नाचविते कैसी ॥३॥

॥२॥

२२०६

दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेंटर तोडी ॥१॥

पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ॥ध्रु.॥

न म्हणे रामराम । मनें वाचे हें चि काम ॥२॥

तुका म्हणे भागा । आली निंदा करी मागा ॥३॥

२२०७

शादीचें तें सोंग । संपादितां जरा वेंग ॥१॥

पाहा कैसी विटंबना । मूर्खा अभाग्याची जना ॥ध्रु.॥

दिसतें तें लोपी । झिंज्या बोडुनियां पापी ॥२॥

सिंदळी त्या सती । तुका म्हणे थुंका घेती ॥३॥

॥२॥

२२०८

भक्ता म्हणऊनि वंचावें जीवें । तेणें शेण खावें काशासाटीं ॥१॥

नासिले अडबंद कौपीन ते माळा । अडचण राउळामाजी केली ॥ध्रु.॥

अंगीकारिले सेवे अंतराय । तया जाला न्याय खापराचा ॥२॥

तुका म्हणे कोठें तगों येती घाणीं । आहाच ही मनीं अधीरता ॥३॥

॥१॥

२२०९

गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं ॥१॥

चित्ती न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥ध्रु.॥

न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्ती नाहीं त्यासी ॥२॥

तुका म्हणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥३॥

२२१०

बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ॥१॥

ऐसें बरें जालें ठावें । अनुभवें आपुल्या ॥ध्रु.॥

सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ॥२॥

तुका म्हणे निघे अगी । दुजे संगीं आतळतां ॥३॥

अलकापुरीं स्वामी कीर्तनास उभे राहिले तेव्हां कवित्वाचा निषेध करून लोक

बोलिले कीं कवित्व बुडवणें तेव्हां कवित्व बुडवून पांच दिवस होते ॥

लोकांनीं फार पीडा केली कीं संसारही नाहीं व परमार्थही बुडविला आणीक कोणी असतें तें जीव देतें मग निद्रा केली ते अभंग ॥ २० ॥

२२११

भूतबाधा आम्हां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥१॥

जाला भक्तीचा कळस । आले वस्तीस दोष ॥ध्रु.॥

जागरणाचें फळ । दिली जोडोनि तळमळ ॥२॥

तुका म्हणे देवा । आहाच कळों आली सेवा ॥३॥

२२१२

नाहीं जों वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ॥१॥

जाणिवलें आतां करीं ये उदेश । जोडी किंवा नाश तुमची जीवें ॥ध्रु.॥

ठायींचे चि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ॥२॥

तुका म्हणे मग वेचीन उत्तरें । उद्धेसिलें खरें जाल्यावरी ॥३॥

२२१३

करूं कवि काय आतां नाही लाज । मज भक्तराज हांसतील ॥१॥

आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला ॥ध्रु.॥

अनुभवाविण कोण करी पाप । रिते चि संकल्प लाजलावे ॥२॥

तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥३॥

२२१४

नाहीं आइकत तुम्ही माझे बोल । कासया हें फोल उपणूं भूस ॥१॥

येसी तें करीन बैसलिया ठाया । तूं चि बुझावया जवळी देवा ॥ध्रु.॥

करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनि वास ॥२॥

तुका म्हणे आला आज्ञेसी सेवट । होऊनियां नीट पायां पडों ॥३॥

२२१५

नव्हे तुम्हां सरी । येवढें कारण मुरारी ॥१॥

मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ॥ध्रु.॥

स्वामींचें तें सांडें । पुत्र होतां काळतोंडें ॥२॥

शब्दा नाहीं रुची । मग कोठें तुका वेची ॥३॥

२२१६

केल्यापुरती आळी । कांहीं होते टाळाटाळी ॥१॥

सत्यसंकल्पाचें फळ । होतां न दिसे चि बळ ॥ध्रु.॥

दळणांच्या ओव्या । रित्या खरें मापें घ्याव्या ॥२॥

जातीं उखळें चाटूं । तुका म्हणे राज्य घाटूं ॥३॥

२२१७

आतां नेम जाला । या च कळसीं विठ्ठला ॥१॥

हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥ध्रु.॥

जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ॥२॥

तुका म्हणे घाटी । चाटू कोरडा शेवटीं ॥३॥

२२१८

पावावे संतोष । तुम्हीं यासाटीं सायास ॥१॥

करीं आवडी वचनें । पालटूनि क्षणक्षणें ॥ध्रु.॥

द्यावें अभयदान । भुमीन पाडावें वचन ॥२॥

तुका म्हणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥३॥

२२१९

बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ॥१॥

मागतिलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची ॥ध्रु.॥

समाधानासाटीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ॥२॥

तुका म्हणे आम्हां तुमचे चि फंद । वरदळ छंद कळों येती ॥३॥

२२२०

काशासाटीं बैसों करूनियां हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ॥१॥

काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उच्चारें काय हो तें ॥ध्रु.॥

नेदी पट परी अन्नें तों न मरी । आपुलिये थोरीसाटीं राजा ॥२॥

तुका म्हणे आतां अव्हेरिलें तरी । मग कोण करी दुकान हा ॥३॥

२२२१

माझा मज नाहीं । आला उबेग तो कांहीं ॥१॥

तुमच्या नामाची जतन । नव्हतां थोर वाटे सीण ॥ध्रु.॥

न पडावी निंदा । कानीं स्वामींची गोविंदा ॥२॥

तुका म्हणे लाज । आम्हां स्वामीचें तें काज ॥३॥

२२२२

कांहीं मागणें हें आम्हां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ॥१॥

देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ॥ध्रु.॥

शब्द तो उपाधि अचळ निश्चय । अनुभव हो काय नाहीं अंगीं ॥२॥

तुका म्हणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ॥३॥

२२२३

मागितल्यास कर पसरी । पळतां भरी वाखती ॥१॥

काय आम्ही नेणों वर्म । केला श्रम नेणतां ॥ध्रु.॥

बोलतां बरें येतां रागा । कठीण लागा मागेंमागें ॥२॥

तुका म्हणे येथें बोली । असे चाली उफराटी ॥३॥

२२२४

असो तुझें तुजपाशीं । आम्हां त्यासी काय चाड ॥१॥

निरोधें कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥ध्रु.॥

करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ॥२॥

तुका म्हणे येउनि रागा । कां मी भागा मुकेन ॥३॥

२२२५

आहे तें चि पुढें पाहों । बरे आहों येथें चि ॥१॥

काय वाढवूनि काम । उगा च श्रम तृष्णेचा ॥ध्रु.॥

स्थिरावतां ओघीं बरें । चाली पुरें पडेना ॥२॥

तुका म्हणे विळतां मन । आम्हां क्षण न लगे ॥३॥

२२२६

सांगा दास नव्हें तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनि ॥१॥

कोणासाटीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ॥ध्रु.॥

नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ॥२॥

तुका म्हणे आम्हां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं दुजें कांहीं ॥३॥

२२२७

अनन्यासी ठाव एक सर्वकाजें । एकाविण दुजें नेणे चित्ती ॥१॥

न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे ॥ध्रु.॥

लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ॥२॥

तुका म्हणे किती घातली लांबणी । समर्थ होउनि केवढ्यासाटीं ॥३॥

२२२८

स्तुती तरि करूं काय कोणापासीं । कीर्त तरि कैसी वाखाणावी ॥१॥

खोट्या तंव नाहीं अनुवादाचें काम । उरला भ्रम वरि बरा ॥ध्रु.॥

म्हणवावें त्याची खुण नाहीं हातीं । अवकळा फजिती सावकाशें ॥२॥

तुका म्हणे हेंगे तुमचें माझें तोंड । होऊनिया लंड आळवितों ॥३॥

२२२९

कांहीं च न लगे आदि अवसान । बहुत कठीण दिसतसां ॥१॥

अवघ्याच माझ्या वेचविल्या शक्ती । न चलेसी युक्ति जाली पुढें ॥ध्रु.॥

बोलिलें वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आहों तैसीं ॥२॥

तुका म्हणे कांहीं न करावेंसें जालें । थकित चि ठेलें वित्त उगें ॥३॥

२२३०

रूपें गोविलें चित्ती । पायीं राहिलें निश्चिंत ॥१॥

तुम्हीं देवा अवघे चि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ॥ध्रु.॥

जाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडत ते होतीं ॥२॥

तुका म्हणे भेटी । सुटली भवबंदाची गांठी ॥३॥

॥२०॥

स्वामींनीं तेरा दिवस निद्रा केली. मग भगवंतें येऊन समाधान केलें कीं,कवित्व कोरडें आहे तें काढणें उदकांतून

२२३१

थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला । जनाचिया बोलासाटीं चित्ती क्षोभविलें ॥१॥

भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन । झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों ॥ध्रु.॥

अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें । योगक्षेम पुढें तुज करणें लागेल ॥२॥

उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद । तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ॥३॥

२२३२

तूं कृपाळू माउली आम्हां दीनांची साउली । न संरित आली बाळवेशें जवळी ॥१॥

माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण । निववलें मन आलिंगन देऊनी ॥ध्रु.॥

कृपा केली जना हातीं पायीं ठाव दिला संतीं । कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें ॥२॥

तुका म्हणे मी अन्यायी क्षमा करीं वो माझे आईं । आतां पुढें काईं तुज घालूं सांकडें ॥३॥

२२३३

कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन । तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥१॥

चुकी जाली एकवेळा मज पासूनि चांडाळा । उभें करोनियां जळा माजी वह्या राखिल्या ॥ध्रु.॥

नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार । समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥२॥

गेलें होऊनियां मागें नये बोलों तें वाउगें । पुढिलिया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ॥३॥

२२३४

काय जाणें मी पामर पांडुरंगा तुझा पार । धरिलिया धीर काय एक न करिसी ॥१॥

उताविळ जालों आधीं मतिमंद हीनबुद्धि । परि तूं कृपानिधी नाहीं केला अव्हेर ॥ध्रु.॥

तूं देवांचा ही देव अवघ्या ब्रम्हांडाचा जीव । आम्हां दासां कींव कां भाकणें लागली ॥२॥

तुका म्हणे विश्वंभरा मी तों पतित चि खरा । अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ॥३॥

२२३५

नव्हती आली सीसा सुरी अथवा घाय पाठीवरी । तो म्यां केला हरी एवढा तुम्हां आकांत ॥१॥

वांटिलासी दोहीं ठायीं मजपाशीं आणि डोहीं । लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ॥ध्रु.॥

जीव घेती मायबापें थोड्या अन्याच्या कोपें । हें तों नव्हे सोपें साहों तों चि जाणीतलें ॥२॥

तुका म्हणे कृपावंता तुज ऐसा नाहीं दाता । काय वाणूं आतां वाणी माझी कुंटली ॥३॥

२२३६

तूं माउलीहून मयाळ चंद्राहूनि शीतळ । पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ॥१॥

देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळूनि नामा तुझ्या वरूनि टाकिलों ॥ध्रु.॥

तुवां केलें रे अमृता गोड त्या ही तूं परता । पांचां तत्वांचा जनिता सकळ सत्तानायक ॥२॥

कांहीं न बोलोनि आतां उगा च चरणीं ठेवितों माथा । तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥३॥

२२३७

मी अवगुणी अन्यायी किती म्हणोन सांगों काईं । आतां मज पायीं ठाव देई विठ्ठले ॥१॥

पुरे पुरे हा संसार कर्म बिळवंत दुस्तर । राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ॥ध्रु.॥

अनेक बुद्धिचे तरंग क्षणक्षणां पालटती रंग । धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥२॥

तुका म्हणे आतां अवघी तोडीं माझी चिंता । येऊनि पंढरिनाथा वास करीं हृदयीं ॥३॥

॥७॥

२२३८

बरें आम्हां कळों आलें देवपण । आतां गुज कोण राखे तुझें ॥१॥

मारिलें कां मज सांग आजिवरी । आतां सरोबरी तुज मज ॥ध्रु.॥

जें आम्ही बोलों तें आहे तुझ्या अंगीं । देईंन प्रसंगीं आजि शिव्या ॥२॥

निलाजिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा जना ॥३॥

खासी धोंडे माती जीव जंत झाडें । एकलें उघडें परदेसी ॥४॥

गाढव कुतरा ऐसा मज ठावा । बईल तूं देवा भारवाही ॥५॥

लडिका तूं मागें बहुतांसी ठावा । आलें अनुभवा माझ्या तें ही ॥६॥

तुका म्हणे मज खविळलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे ॥७॥

२२३९

आम्ही भांडों तुजसवें । वर्मी धरूं जालें ठावें ॥१॥

होसी सरड बेडुक । बाग गांढव्या ही पाईंक ॥ध्रु.॥

बळ करी तया भ्यावें । पळों लागे तया घ्यावें ॥२॥

तुका म्हणे दूर परता । नर नारी ना तूं भूता ॥३॥

२२४०

काय साहतोसी फुका । माझा बुडविला रुका ॥१॥

रीण घराचें पांगिलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ध्रु.॥

चौघांचिया मतें । आधीं खरें केलें होते ॥२॥

तुका म्हणे यावरी । आतां भीड कोण धरी ॥३॥

२२४१

प्रीतीचा कलहे पदरासी घाली पीळ । सरों नेदी बाळ मागें पुढें पित्यासी ॥१॥

काय लागे त्यासी बळ हेडावितां कोण काळ । गोवितें सबळ जाळीं स्नेहसूत्राचीं ॥ध्रु.॥

सलगी दिला लाड बोले तें तें वाटे गोड । करी बुझावोनि कोड हातीं देऊनि भातुकें ॥२॥

तुका म्हणे बोल कोणा हें कां नेणां नारायणा । सलगीच्या वचना कैचें उपजे विषम ॥३॥

॥४॥

२२४२

भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥१॥

आले आले वैष्णववीर । काळ कांपती असुर ॥धृ.॥

गरुडटकयाच्या भारें । भूमी गर्जे जेजेकारें ॥ २॥

तुका म्हणे काळ । पळे देखोनियां बळ ॥३॥

॥१॥

२२४३

रंगीं रंगें रे श्रीरंगे । काय भुललासी पतंगें ॥१॥

शरीर जायांचें ठेवणें । धरिसी अभिळास झणें ॥धृ.॥

नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ॥२॥

अंतकाळींचा सोइरा । तुका म्हणे विठो धरा ॥३॥

॥१॥

२२४४

जन्मा येउनि काय केलें । तुवां मुदल गमाविलें ॥१॥

कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ॥धृ.॥

केली गांठोळीची नासी । पुढें भीके चि मागसी ॥२॥

तुका म्हणे ठाया । जाई आपल्या आलिया ॥३॥

॥१॥

२२४५

पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षम सांगा ॥१॥

अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥धृ.॥

ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥२॥

कामक्रोधसुनीं श्वापदीं बहुतीं । वेढलों आवर्तीं मायेचिये ॥३॥

मृदजलनदी बुडविना तरी । आणूनियां वरी तळा नेते ॥४॥

तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरि पाहों वास कवणाची ॥५॥

२२४६

कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हें चि कृपादान तुमचें मज ॥१॥

आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ॥ध्रु.॥

अनाथ अपराधी पतिताआगळा । परि पायांवेगळा नका करूं ॥२॥

तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरि । मग मज हरि उपेक्षीना ॥३॥

२२४७

संतांचिया पायीं माझा विश्वास । सर्वभावें दास जालों त्यांचा ॥१॥

ते चि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ॥ध्रु.॥

भागलिया मज वाहतील कडे । यांचियातें जोडे सर्व सुख ॥२॥

तुका म्हणे शेष घेईंन आवडी । वचन न मोडीं बोलिलों तें ॥३॥

॥३॥

२२४८

लाघवी सूत्रधारी दोरी नाचवी कुसरी । उपजवी पाळूनि संसारि नानापरिचीं लाघवें ॥१॥

पुरोनि पंढरिये उरलें भक्तिसुखें लांचावलें । उभें चि राहिलें कर कटीं न बैसे ॥ध्रु.॥

बहु काळें ना सावळें बहु कठिण ना कोंवळें । गुणत्रया वेगळें बहुबळें आथीलें ॥२॥

असोनि नसे सकळांमधीं मना अगोचर बुद्धी । स्वामी माझा कृपानिधि तुका म्हणे विठ्ठल ॥३॥

२२४९

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन देखावया ॥१॥

उदित हें भाग्य होईल कोणे काळीं । चित्ती तळमळी म्हणऊनि ॥ध्रु.॥

उतावीळ बाह्या भेटिलागीं दंड । लोटांगणीं धड जावयासी ॥२॥

तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं । होतील पारणी इंद्रियांची ॥३॥

२२५०

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥१॥

गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कइवाड माझ्या चित्ती ॥ध्रु.॥

प्रेमरसें जाली पुष्ट अंगकांति । त्रिविध सांडिती ताप अंग ॥२॥

तुका म्हणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥३॥

॥३॥

२२५१

स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ॥१॥

हे चि विष्णूची महापूजा । अनुभाव नाहीं दुजा ॥ध्रु.॥

सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ॥२॥

निश्चयाचें बळ । तुका म्हणे तें च फळ ॥३॥

२२५२

चित्ती घेऊनियां तू काय देसी । ऐसें मजपासीं सांग आधीं ॥१॥

तरि च पंढरिराया करिन साटोवाटी । नेघें जया तुटी येईल तें ॥ध्रु.॥

रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिळास । नाहीं मज आस मुक्तीची ही ॥२॥

तुका म्हणे तुझें माझें घडे तर । भक्तीचा भाव रे देणें घेणें ॥३॥

२२५३

तुझा संग पुरे संग पुरे । संगति पुरे विठोबा ॥१॥

आपल्या सारिखें करिसी दासां । भिकारिसा जग जाणे ॥ध्रु.॥

रूपा नाहीं ठाव नांवा । तैसें आमुचें करिसी देवा ॥२॥

तुका म्हणे तोयें आपुलें भेंडोळें । करिसी वाटोळें माझें तैसें ॥३॥

२२५४

आतां मज तारीं । वचन हें साच करीं ॥१॥

तुझें नाम दिनानाथ । ब्रिदावळी जगविख्यात ॥ध्रु.॥

कोण लेखी माझ्या दोषा । तुझा त्रिभुवनीं ठसा ॥२॥

वांयां जातां मज । तुका म्हणे तुम्हां लाज ॥३॥

२२५५

विठ्ठल आमुचा निजांचा । सज्जन सोयरा जीवाचा ॥१॥

मायबाप चुलता बंधु । अवघा तुजशीं संबंधु ॥ध्रु.॥

उभयकुळींसाक्ष । तूं चि माझा मातुळपक्ष ॥२॥

समर्पिली काया । तुका म्हणे पंढरिराया ॥३॥

२२५६

वेदाचा तो अर्थ आम्हांसी च ठावा । येरांनी वाहावा भार माथां ॥१॥

खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ॥ध्रु.॥

उत्पत्तिपाळणसंहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ॥२॥

तुका म्हणे आलें आपण चि फळ । हातोहातीं मूळ सांपडलें ॥३॥

२२५७

आमचा तूं ॠणी ठायींचा चि देवा । मागावया ठेवा आलों दारा ॥१॥

वर्म तुझें आम्हां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ॥ध्रु.॥

बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ॥२॥

तुज मज सरी होइल या विचारें । जळो भांडखोरें निलाजिरीं ॥३॥

भांडवल माझें मिरविसी जनीं । सहजर वोवनी नाममाळा ॥४॥

तुका म्हणे आम्ही केली जिवें साटी । तुम्हां आम्हां तुटी घालूं आतां ॥५॥

२२५८

काय धोविलें बाहेरी मन मळलें अंतरीं । गादलें जन्मवरीं असत्यकाटें काटलें ॥१॥

सांडी व्यापार दंभाचा शुद्ध करीं रे मन वाचा । तुझिया चित्तीचा तूं च ग्वाही आपुला ॥ध्रु.॥

पापपुण्यविटाळ देहीं भरितां न विचारिसी कांहीं । काय चाचपसी मही जी अखंड सोंवळी ॥२॥

कामक्रोधा वेगळा ऐसा होई कां सोंवळा । तुका म्हणे कळा गुंडुन ठेवीं कुसरी ॥३॥

२२५९

ऊंस वाढवितां वाढली गोडी । गुळ साकर हे त्याची परवडी ॥१॥

सत्यकर्में आचरें रे । बापा सत्यकर्में आचरें रे । सत्यकर्में आचरें होईल हित । वाढेल दुःख असत्याचें ॥ध्रु.॥

साकरेच्या आळां लाविला कांदा । स्थूळसानापरि वाढे दुगपधा ॥२॥

सत्य असत्य हें ऐसिया परी । तुका म्हणे याचा विचार करीं ॥३॥

२२६०

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥१॥

सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव ते चि जाले ॥ध्रु.॥

उदका भिन्न पालट काईं । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥२॥

तुका म्हणे हें भाविकांचें वर्म । येरीं धर्माधर्म विचारावें ॥३॥

॥१०॥

२२६१

जन्मा येऊनि कां रे निदसुरा । जायें भेटी वरा रखुमाईंच्या ॥१॥

पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळउत्तम तें ॥ध्रु.॥

संतमहंतसद्धिहरिदासदाटणी । फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥२॥

तुका म्हणे तेथें नामाचा गजर । फुकाची अपार लुटी घेई ॥३॥

२२६२

काय धोविलें कातडें । काळकुट भीतरि कुडें ॥१॥

उगा राहें लोकभांडा । चाळविल्या पोरें रांडा ॥ध्रु.॥

घेसी बुंथी पानवथां । उगा च हालविसी माथा ॥२॥

लावूनि बैसे टाळी । मन इंद्रियें मोकळीं ॥३॥

हालवीत बैस माळा । विषयजप वेळोवेळां ॥४॥

तुका म्हणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ॥५॥

॥२॥

२२६३

येईवो येईवो येईधांवोनियां । विलंब कां वायां लाविला कृपाळे ॥१॥

विठाबाईं विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस अगे विश्वव्यापके ॥ध्रु.॥

न करीं न करीं न करीं आतां अळस अव्हेरु । व्हावया प्रकट कैंचें दूरि अंतरु ॥२॥

नेघें नेघें नेघें माझी वाचा विसांवा । तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ॥३॥

२२६४

हें चि याच्या ऐसें मागावें दान । वंदूनि चरण नारायणा ॥१॥

धीर उदारींव निर्मळ निर्मत्सर । येणें सर्वेश्वर ऐसें नांव ॥ध्रु.॥

हा चि होईंजेल याचिया विभागें । अनुभववी अंगें अनुभवील ॥२॥

जोडे तयाचे कां न करावे सायास । जाला तरि अळस दीनपणे ॥३॥

पावल्यामागें कां न घलावी धांव । धरिल्या तरि हांव बळ येतें ॥४॥

तुका म्हणे घालूं खंडीमध्ये टांक । देवाचें हें एक करुनी घेऊं ॥५॥

२२६५

सत्ताबळें येतो मागतां विभाग । लावावया लाग निमित्य करूं ॥१॥

तुझीं ऐसीं मुखें करूं उच्चारण । बोलें नारायण सांपडवूं ॥ध्रु.॥

आसेविण नाहीं उपजत मोहो । तरि च हा गोहो न पडे फंदीं ॥२॥

तुका म्हणे आतां व्हावें याजऐसें । सरिसें सरिसें समागमें ॥३॥

२२६६

करितां होया व्हावें चित्ती चि नाहीं । घटापटा कांहीं करूं नये ॥१॥

मग हालत चि नाहीं जवळून । करावा तो सीण सीणवितो ॥ध्रु.॥

साहत चि नाहीं कांहीं पांकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे ॥२॥

तुका म्हणे तरी बोलावें झांकून । येथें खुणे खूण पुरतें चि ॥३॥

२२६७

संतसंगें याचा वास सर्वकाळ । संचला सकळ मूर्तिमंत ॥१॥

घालूनियां काळ अवघा बाहेरी । त्यासी च अंतरीं वास दिला ॥ध्रु.॥

आपुलेसें जिंहीं नाहीं उरों दिलें । चोजवितां भलें ऐसीं स्थळें ॥२॥

तुका म्हणे नाही झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदन चि ॥३॥

२२६८

पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ॥१॥

अंतर्बाहीं विलेपन । हें भूषण मिरवूं ॥ध्रु.॥

इच्छेऐसी आवड पुरे । विश्वंभरे जवळी ॥२॥

तुका करी नारायण । या या सेवन नामाचें ॥३॥

२२६९

सुकाळ हा दिवसरजनी । नीत धणी नवी च ॥१॥

करुण सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ॥ध्रु.॥

सरे ऐसा नाहीं झरा । पंक्ती करा समवेत ॥२॥

तुका म्हणे बरवा पान्हा । कान्हाबाईं माउलीचा ॥३॥

२२७०

पाहतां तव एकला दिसे । कैसा असे व्यापक ॥१॥

ज्याचे त्याचे मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ॥ध्रु.॥

जाणिवेचें नेदी अंग । दिसों रंग निवडीना ॥२॥

तुका म्हणे ये चि ठायीं । हें तों नाहीं सर्वत्र ॥३॥

॥८॥

२२७१

तुम्हांसाटीं आम्हां आपुला विसर । करितां अव्हेर कैसें दिसे ॥१॥

विचाराजी आतां ठायीचें हे देवा । आम्हां नये हेवा वाढवितां ॥ध्रु.॥

आलों टाकोनियां सुखाची वसती । पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ॥२॥

तुका म्हणे जाला सकळ वृत्तांत । केला प्रणिपात म्हणऊनि ॥३॥

२२७२

करावा उद्धार हें तुम्हां उचित । आम्ही केली नीत कळली ते ॥१॥

पाववील हाक धांवा म्हणऊन । करावें जतन ज्याचें तेणें ॥धृ.॥

दुश्चितासी बोल ठेवायासी ठाव । ऐसा आम्ही भाव जाणतसों ॥२॥

तुका म्हणे माझें कायावाचामन । दुसरें तें ध्यान करित नाही ॥३॥

२२७३

संताचे उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृतेलोकीं राहाणेसा ॥१॥

म्हणऊनि बहु तळमळी चित्ती । येईवो धांवत पांडुरंगे ॥धृ.॥

उपजली चिंता लागला उसीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ॥२॥

तुका म्हणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसें जालें ॥३॥

२२७४

काळावरि घालूं तरि तो सरिसा । न पुरतां इच्छा दास कैसे ॥१॥

आतां नाहीं कांहीं उसिराचें काम । न खंडावें प्रेम नारायणा ॥धृ.॥

देणें लागे मग विलंब कां आड । गोड तरि गोड आदि अंत ॥२॥

तुका म्हणे होइल दरुषणें निश्चिंती । गाईंन तें गीतीं ध्यान मग ॥३॥

२२७५

परउपकारें कायावाचामन । वेचे सुदर्शन रक्षी तया ॥१॥

याजसाटीं असें योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व जोडा ॥धृ.॥

परपीडे ज्याची जिव्हा मुंडताळे । यमदूत डाळे करिती पूजा ॥२॥

तुका म्हणे अंबऋषी दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ॥३॥

२२७६

हागिल्याचे सिंके वोणवा चि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ॥१॥

अत्यंत समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ॥ध्रु.॥

भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ॥२॥

तुका म्हणे किती सांगों उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥३॥

२२७७

नारे तरि काय नुजेडे कोंबडें । करूनियां वेडें आघ्रो दावी ॥१॥

आइत्याचें साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग ची थू करी ॥ध्रु.॥

नेमून ठेविला करत्यानें काळ । नल्हायेसें बळ करूं पुढें ॥२॥

तुका म्हणे देव साहे जाल्यावरी । असांग चि करी सर्व संग ॥३॥

॥७॥

२२७८

तरी सदा निर्भर दास । चिंताआसविरहित ॥१॥

अवघा चि एकीं ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ॥ध्रु.॥

निरविलें तेव्हां त्यास । जाला वास त्यामाजी ॥२॥

तुका म्हणे रूप ध्यावें । नाहीं ठावे गुणदोष ॥३॥

२२७९

वेडिया उपचार करितां सोहळे । काय सुख कळे तयासी तें ।

अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ॥१॥

तिमाणें राखण ठेवियेलें सेता । घालुनियां माथां चुना तया ।

खादलें म्हणोनि सेवटीं बोबाली । ठायींची भुली कां नेणां रया ॥ध्रु.॥

मुकियापासाव सांगतां पुराण । रोगिया मिष्टान्न काईं होय ।

नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसे होय ॥२॥

हात पाय नाहीं करिल तो काईं । वृक्षा फळ आहे अमोलिक ।

हातां नये तैसा वांयां च तळमळी । भावेंविण भोळीं म्हणे तुका ॥३॥

२२८०

मेघवृष्टीनें करावा उपदेश परि गुरुनें न करावा शिष्य । वांटा लाभे त्यास केल्या अर्धकर्माचा ॥१॥

द्रव्य वेचावें अन्नसत्रीं भूतीं द्यावें सर्वत्र । नेदावा हा पुत्र उत्तमयाती पोसना ॥ध्रु.॥

बीज न पेरावें खडकीं ओल नाहीं ज्याचे बुडखीं । थीतां ठके सेखीं पाठी लागे दिवाण ॥२॥

गुज बोलावें संतांशीं पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां तियेसी वांटा पावे कर्माचा ॥३॥

शुद्ध कसूनिपाहावें वरि रंगा न भुलावें । तुका म्हणे घ्यावें जया नये तुटी तें ॥४॥

२२८१

नावडावें जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूं चि होई ॥१॥

सोडुनि देहसंबंध वेसनें । ऐसी नारायणें कृपा कीजे ॥ध्रु.॥

नावडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥२॥

तुका म्हणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा ऐसें ॥३॥

२२८२

उपाधिवेगळे तुम्ही निर्विऩकार । कांहीं च संसार तुम्हां नाहीं ॥१॥

ऐसें मज करूनि ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ॥ध्रु.॥

निसंग तुम्हांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येक ॥२॥

तुका म्हणे नाहीं मिळों येत शिळा । रंगासी सकळा स्पटिकाची ॥३॥

२२८३

माहार माते चपणी भरे । न कळे खरें पुढील ॥१॥

वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी न लगे चि ॥ध्रु.॥

श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उतरे ॥२॥

तुका म्हणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ॥३॥

२२८४

डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तें हि न समाये ॥१॥

तैसें शुद्ध करीं हित । नका चित्ती बाटवूं ॥ध्रु.॥

आपल्याचा कळवळा। आणिका बाळावरि न ये ॥२॥

तुका म्हणे बीज मुडा । जैशा चाडा पिकाच्या ॥३॥

२२८५

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ॥१॥

वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूसी ॥ध्रु.॥

भस्म दंड न लगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ॥२॥

तुका म्हणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥३॥

२२८६

आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥१॥

मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥ध्रु.॥

जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कुळ ॥२॥

तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥३॥

२२८७

आतां न म्हणे मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ॥१॥

तूं चि तारिता मारिता । कळों आलासी निरुता ॥ध्रु.॥

अवघा तूं चि जनार्दन । संत बोलती वचन ॥२॥

तुका म्हणे पांडुरंगा । तुझ्या रिगालों वोसंगा ॥३॥

२२८८

समुद्रवळयांकित पृथ्वीचें दान । करितां समान न ये नामा ॥१॥

म्हणऊनि कोणीं न करावा आळस । म्हणा रात्रीदिवस रामराम ॥ध्रु.॥

सकळ ही शास्त्रें पठण करतां वेद । सरी नये गोविंदनाम एकें ॥२॥

सकळ ही तीर्थी प्रयाग काशी । करितां नामाशीं तुळेति ना ॥३॥

कर्वतीं कर्मरीं देहासी दंडण । करितां समान नये नामा ॥४॥

तुका म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हें चि सार विठोबाचें ॥५॥

२२८९

अवघ्या वाटा झाल्या क्षीण कळीं न घडे साधन । उचित विधि विधान न कळे न घडे सर्वथा ॥१॥

भक्तिपंथ बहु सोपा पुण्य नागवया पापा । येणें जाणें खेपा येणें चि एक खंडती ॥ध्रु.॥

उभारोनि बाहे विठो पालवीत आहे । दासां मी चि साहे मुखें बोले आपुल्या ॥२॥

भाविक विश्वासी पार उतरिलें त्यांसी । तुका म्हणे नासी कुतर्क्याचे कपाळीं ॥३॥

२२९०

आम्हीं नामाचें धारक नेणों प्रकार आणीक । सर्व भावें एक विठ्ठल चि प्रमाण ॥१॥

न लगे जाणावें नेणावें गावें आनंदें नाचावें । प्रेमसुख घ्यावें वैष्णवांचे संगती ॥ध्रु.॥

भावबळें घालूं कास लज्जा चिंता दवडूं आस । पायीं निजध्यास म्हणों दास विष्णूचे ॥२॥

भय नाहीं जन्म घेतां मोक्षपदा हाणों लाता । तुका म्हणे सत्ता धरूं निकट सेवेची ॥३॥

२२९१

आम्ही हरिचे सवंगडे जुने ठायींचे वेडे बागडे । हातीं धरुनी कडे पाठीसवें वागविलों ॥१॥

म्हणोनि भिन्न भेद नाहीं देवा आम्हां एकदेहीं । नाहीं जालों कहीं एका एक वेगळे ॥ध्रु.॥

निद्रा करितां होतों पायीं सवें चि लंका घेतली तई । वान्नरें गोवळ गाईं सवें चारित फिरतसों ॥२॥

आम्हां नामाचें चिंतन राम कृष्ण नारायण। तुका म्हणे क्षण खातां जेवितां न विसंभों ॥३॥

२२९२

मागें बहुतां जन्मीं हें चि करित आलों आम्ही । भवतापश्रमी दुःखें पीडिलीं निववूं त्यां ॥१॥

गर्जावे हरिचे पवाडे मिळों वैष्णव बागडे । पाझर रोकडे काढूं पाषाणामध्यें ॥ध्रु.॥

भाव शुद्ध नामावळी हर्षॉ नाचों पिटूं टाळी । घालूं पायां तळीं किळकाळ त्याबळें ॥२॥

कामक्रोध बंदखाणी तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धणी आम्ही जालों गोसांवी ॥३॥

२२९३

अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ॥१॥

चाल जाऊं संतांपुढें । वाद सांगेन निवाडें ॥ध्रु.॥

तुज नांव जर नाहीं । तर माझें दाव काईं ॥२॥

तुज रूप नाहीं । तर माझें दाव काईं ॥३॥

खळसी तूं लीळा । तेथें मी काय वेगळा ॥४॥

साच तूं लटिका । तैसा मी ही म्हणे तुका ॥५॥

२२९४

मंत्र चळ पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥१॥

आशोचे तो बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ॥धृ.॥

रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥२॥

आणिकां भजना बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ॥३॥

तुका म्हणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ॥४॥

२२९५

नव्हती ते संत करितां कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत ॥१॥

येथें नाहीं वेश सरतें आडनांवें । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥धृ.॥

नव्हती ते संत धरितां भोंपळा । करितां वाकळा प्रावरण ॥२॥

नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥३॥

नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥४॥

नव्हती संत करितां तप तीर्थाटणें । सेविलिया वन नव्हती संत ॥५॥

नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥६॥

तुका म्हणे नाहीं निरसला देहे । तों अवघे हे सांसारिक ॥७॥

२२९६

हें चि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥१॥

गुण गाईंन आवडी । हे चि माझी सर्व जोडी ॥धृ.॥

न लगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥२॥

तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासी ॥३॥

२२९७

भाग्यवंता हे परवडी । करिती जोडी जन्माची ॥१॥

आपुलाल्या लाहो भावें । जें ज्या व्हावें तें आहे ॥ध्रु.॥

इच्छाभोजनाचा दाता । न लगे चिंता करावी ॥२॥

तुका म्हणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ॥३॥

२२९८

वंचुनियां पिंड । भाता दान करी लंड ॥१॥

जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥ध्रु.॥

मेला राखे दिस । ज्यालेपणें जालें वोस ॥२॥

तुका म्हणे देवा । लोभें न पुरे चि सेवा ॥३॥

२२९९

अधीरा माझ्या मना ऐक एकी मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥१॥

हे चि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥ध्रु.॥

पाहा ते चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥२॥

सकळयातींमध्यें ठक हा सोनार । त्याघरीं व्यापार झारियाचा ॥३॥

तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ॥४॥

२३००

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥१॥

बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ध्रु.॥

फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥२॥

तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥३॥

तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥४॥

२३०१

उदारा कृपाळा पतितपावना । ब्रिदें नारायणा साच तुझीं ॥१॥

वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ॥ध्रु.॥

दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ति । चतुर्भुज हातीं शंख चक्र ॥२॥

काम इच्छा तयां तैसा होसी राणीं । यशोदेच्या स्तनीं पान करी ॥३॥

होऊनि सकळ कांहींच न होसी । तुका म्हणे यासी वेद ग्वाही ॥४॥

२३०२

ऐका संतजन उत्तरें माझे बोबडे बोल । करीं लाड तुम्हांपुढें हो कोणी झणी कोपाल ॥१॥

उपाय साधन आइका कोण गति अवगति । दृढ बैसोनि सादर तुम्ही धरावें चित्तीं ॥ध्रु.॥

धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन भाज । कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥२॥

पुण्य तें जाणां रे भाइनो परउपकाराचें । परपीडा परनिंदा रे खरें पाप तयाचें ॥३॥

लाभ तयासी जाला रे मुखीं देव उच्चारी । प्रपंचापाठी गुंतला हाणी तयासी च थोरी ॥४॥

सुख तें जाणा रे भाइनो संतसमागम । दुःख तें जाणारे भाइनो शम तेथे विशम ॥५॥

साधन तयासी साधे रे ज्याची स्वाधीन बुद्धि । पराधीनासी आहे घात रे थोर जाण संबंधी ॥६॥

मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे । अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥७॥

जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान । नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ॥८॥

भला तो चि एक जाणा रे गयावर्जन करी । बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥९॥

आचारी अन्न काढी रे गाईं अतितभाग । अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥१०॥

स्वहित तेणें चि केलें रे भूतीं देखिला देव । अनहित तयाचें जालें रे आणी अहंभाव ॥११॥

धन्य जन्मा ते चि आले रे एक हरिचे दास । धिग ते विषयीं गुंतले केला आयुष्या नास ॥१२॥

जोहोरि तो चि एक जाणा रे जाणे सद्विलक्षणें । वेडसरु तो भुले रे वरदळभूषणें ॥१३॥

बिळयाढा तो चि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं । गांढव्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥१४॥

खोल तो वचन गुरूचें जो गिळूनि बैसे । उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥१५॥

उदार तो जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं । कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिडाई ॥१६॥

चांगलेंपण तें चि रे ज्याचें अंतर शुद्ध । वोंगळ मिळन अंतरीं वाणी वाहे दुगपध ॥१७॥

गोड तें चि एक आहे रे सार विठ्ठलनाम । कडु तो संसार रे लक्षचौऱ्याशी जन्म ॥१८॥

तुका म्हणे मना घरी रे संतसंगतिसोईं । न लगे कांहीं करावें राहें विठ्ठलपायीं ॥१९॥

॥ येकाखडी ॥ १॥

२३०३

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥१॥

स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनिया भाव ॥ध्रु.॥

खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥२॥

गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ॥३॥

घरटी चक्रफेरा । जन्ममृत्याचा भोंवरा ॥४॥

नानाहव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥५॥

चरणीं ठेवा चित्ती । म्हणवा देवाचे अंकित ॥६॥

छंद नानापरी । कळा न पविजे हरी ॥७॥

जगाचा जनिता । भक्तिमुक्तींचा ही दाता ॥८॥

झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥९॥

यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ॥१०॥

टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ॥११॥

ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणि ॥१२॥

डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥१३॥

ढळों नये जरी । लाभ घरिचिया घरीं ॥१४॥

नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ॥१५॥

तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥१६॥

थडी टाकी पैलतीर । बाहे ठोके होय वीर ॥१७॥

दया तिचें नांव । अहंकार जाय जंव ॥१८॥

धनधान्य हेवा । नाडे कुटुंबाची सेवा ॥१९॥

नाम गोविंदाचें । घ्या रे हें चि भाग्य साचें ॥२०॥

परउपकारा । वेचा शक्ति निंदा वारा ॥२१॥

फळ भोग इच्छा । देव आहे जयां तैसा ॥२२॥

बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥२३॥

भविष्याचे माथां । भजन न द्यावें सर्वथा ॥२४॥

माग लागला न संडीं । अळसें माती घालीं तोंडीं ॥२५॥

यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ॥२६॥

रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥२७॥

लकार लाविला । असतां नसतां चि उगला ॥२८॥

वासने चि धाडी । बंद खोड्या नाड्या बेडी ॥२९॥

सरतें न कळे । काय झांकियेले डोळे ॥३०॥

खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ॥३१॥

सायासाच्या जोडी । पिके काढियेल्या पेडी ॥३२॥

हातीं हित आहे । परि न करिसी पाहें ॥३३॥

अळंकार लेणें । ल्या रे तुळसीमुद्राभूषणें ॥३४॥

ख्याति केली विष्णुदासीं । तुका म्हणे पाहा कैसी ॥३५॥

२३०४

देवें देऊळ सेविलें । उदक कोरडें चि ठेविलें ॥१॥

नव्हे मत गूढ उमानें कांहीं । तूं आपणआपणापें पाहीं ॥ध्रु.॥

पाठें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ॥२॥

वांजेघरीं बाळ तान्हा । एक बाळी दों कानां ॥३॥

तुका म्हणे पैस । अनुभविया ठावा गोडीरस ॥४॥

॥ लोहागांवीं कीर्तनांत मेलें मूल जीत झालें ते समयीं स्वामींनीं अभंग केले ते ॥

२३०५

अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥१॥

मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ॥ध्रु.॥

थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे । म्हणवितों दास काय थोडें ॥२॥

तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ॥३॥

२३०६

दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ॥१॥

आणीक नासिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें ॥धृ.॥

यावें तयां काकुलती । जे दाविती सुपंथ ॥२॥

तुका म्हणे उरी नुरे । त्याचे खरे उपकार ॥३॥

अलंकापुरीं ब्राम्हण धरणें बसून बेताळीस दिवस उपवासी होता त्यास द्दष्टांत कीं देहूस तुकोबापाशी जाणें. ब्राम्हण स्वामीपें आला त्याबद्दल अभंग ॥ ३१ ॥

२३०७

श्रीपंढरीशा पतितपावना । एक विज्ञापना पायांपाशीं ॥१॥

अनाथां जीवांचा तूं काजकैवारी । ऐसी चराचरीं ब्रिदावळी ॥धृ.॥

न संगतां कळे अंतरीचें गुज । आतां तुझी लाज तुज देवा ॥२॥

आळिकर ज्याचें करिसी समाधान । अभयाचें दान देऊनियां ॥३॥

तुका म्हणे तूं चि खेळें दोहीं ठायीं । नसेल तो देई धीर मना ॥४॥

२३०८

अगा ये उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईंच्या वरा पांडुरंगा ॥१॥

अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा । अगा मेघश्यामा विश्वजनित्या ॥धृ.॥

अगा कृपावंता जीवन तूं दाता । अगा सर्वसत्ता धरितया ॥२॥

अगा सर्वजाणा अगा नारायणा । करुणवचना चित्ती द्यावें ॥३॥

तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपाशीं केली मागें ॥४॥

२३०९

नव्हें दास खरा । परि जाला हा डांगोरा ॥१॥

यासी काय करूं आतां । तूं हें सकळ जाणता ॥ध्रु.॥

नाहीं पुण्यगाठीं । जे हें वेचूं कोणासाठीं ॥२॥

तुका म्हणे कां उपाधी । वाढविली कृपानिधी ॥३॥

२३१०

तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ॥१॥

ऐसे आम्ही जाणों दास । म्हणोनि जालों उदास ॥ध्रु.॥

तुम्ही दिला धीर। तेणें मन झालें स्थिर ॥२॥

तुका म्हणे आड । केलों मी हें तुझें कोड ॥३॥

२३११

काय मी जाणता । तुम्हांहुनि अनंता ॥१॥

जो हा करूं अतिशय । कां तुम्हां दया नये ॥ध्रु.॥

काय तुज नाहीं कृपा । विश्वाचिया मायबापा ॥२॥

तुका म्हणे वाणी । माझी वदे तुम्हांहुनि ॥३॥

२३१२

काय ज्ञानेश्वरीं उणें । तिंहीं पाठविलें धरणें ॥१॥

ऐकोनियां लिखित । म्हुण जाणवली हे मात ॥ध्रु.॥

तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥२॥

तुका म्हणे ठेवा । होतां सांभाळावें देवा ॥३॥

२३१३

ठेवूनियां डोईं । पायीं जालों उतराईं ॥१॥

कारण तें तुम्हीं जाणां । मी तराळ नारायणा ॥ध्रु.॥

प्रसंगीं वचन । दिलें तें चि खावें अन्न ॥२॥

तुका म्हणे भार । तुम्ही जाणां थोडा फार ॥३॥

उपदेश अभंग ॥ ११ ॥

२३१४

नको कांहीं पडों ग्रंथाचे भरीं । शीघ व्रत करीं हें चि एक ॥१॥

देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां ॥ध्रु.॥

साधनें घालिती काळाचिये मुखी । गर्भवास सेकीं न चुकती ॥२॥

उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥३॥

रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरि ॥४॥

तुका म्हणे घालीं नामासाठी उडी । पांडुरंग थडी पाववील ॥५॥

२३१५

नाहीं देवापाशीं मोक्षाचे गांठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥१॥

इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥ध्रु.॥

उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मां शेवटीं असे फळ ॥२॥

आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ॥३॥

स्वप्नींच्या घायें विळवसी वांयां । रडे रडतियासवें मिथ्या ॥४॥

तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासीं जाय वेगीं ॥५॥

२३१६

तजिलें भेटवी आणूनि वासना । दाविल्याचे जना काय काज ॥१॥

आळवावें देवा भाकूनि करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥ध्रु.॥

नाहीं जावें यावें दुरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥२॥

तुका म्हणे हा आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥३॥

२३१७

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥१॥

मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ध्रु.॥

आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥२॥

तुका म्हणे आळी । जेवी नुरे चि वेगळी॥३॥

२३१८

ज्याचें जया ध्यान । तें चि होय त्याचें मन ॥१॥

म्हणऊनि अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ध्रु.॥

सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥२॥

तुका म्हणे नभा । परता अनूचा ही गाभा ॥३॥

२३१९

पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥१॥

नाहीं तरि वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटी उरलीसे ॥ध्रु.॥

पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां जालें ॥२॥

तप तिर्थाटण तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥३॥

यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥४॥

तुका म्हणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरीं हें चि एक ॥५॥

२३२०

सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥१॥

त्याचें दिलें त्यासी पावे । फळ आपणासी फावे ॥ध्रु.॥

आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥२॥

नाही रिता ठाव । तुका म्हणे पसरीं भाव ॥३॥

२३२१

संकोचोनि काय जालासी लहान । घेई अपोशण ब्रम्हांडाचें ॥१॥

करोनि पारणें आंचवें संसारा । उशीर उशिरा लावूं नको ॥ध्रु.॥

घरकुलानें होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥२॥

झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ॥३॥

२३२२

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनि कवतुकें क्रीडा करीं ॥१॥

केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ॥ध्रु.॥

घेऊनि विभाग जावें लवलाहा । आलेति या ठाया आपुलिया ॥२॥

तुका ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदूं ॥३॥

२३२३

ज्ञानियांचा गुरु राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥१॥

मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ध्रु.॥

ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळगणे । इतर तुळणें काय पुरे ॥२॥

तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोलीं । म्हणोनि ठेविली पायीं डोईं ॥३॥

२३२४

बोलिलीं लेकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥१॥

करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्धी ॥ध्रु.॥

नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥२॥

तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥३॥

२३२५

काय तुम्ही जाणां । करूं अव्हेर नारायणा ॥१॥

तरी या लटिक्याची गोही । निवडली दुसरे ठायीं ॥ध्रु.॥

कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ॥२॥

आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥३॥

आणीक कोणी मिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥४॥

तुका म्हणे बीज पोटीं । फळ तैसें चि सेवटीं ॥५॥

२३२६

अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ॥१॥

काय त्याचे वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥ध्रु.॥

मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळीचें धोंडा उभा ठाके ॥२॥

तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ॥३॥

२३२७

तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ॥१॥

राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनि जाती निरयगांवा ॥ध्रु.॥

इंद्रियें दमिलीं इच्छा जिती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ॥२॥

तुका म्हणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥३॥

२३२८

हरिकथेवांचून इच्छिती स्वहित । हरिजन चित्ती न घला तेथें ॥१॥

जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ॥ध्रु.॥

ज्याचिया बैसावे भोजनपंगती । त्याचिया संगती तैसे खावें ॥२॥

तुका म्हणे काय जालेसि जाणते । देवा ही परते थोर तुम्ही ॥३॥

२३२९

सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ॥१॥

घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्ती सांदी जनां ॥ध्रु.॥

खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें चि नीट उसंतावें ॥२॥

तुका म्हणे तो ज्ञानाचा सागर । परि नेंदी अगर भिजों भेदें ॥३॥

२३३०

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥१॥

करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ध्रु.॥

जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥२॥

तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्तीचिया ॥३॥

२३३१

बहुतां छंदाचें बहु वसे जन । नये वांटूं मन त्यांच्या संगें ॥१॥

करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ॥ध्रु.॥

सुखाची समाधी हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियांची ॥२॥

तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥३॥

२३३२

हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥१॥

त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ॥ध्रु.॥

सांडुनि हा रस । करिती आणीक सायास ॥२॥

तुका म्हणे पिसीं । वांयां गेलीं किती ऐसीं ॥३॥

२३३३

प्रेम अमृताची धार । वाहे देवा ही समोर ॥१॥

उर्ध्ववाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळां तीर्थां ॥ध्रु.॥

शिवाचें जीवन । जाळी महादोष कीर्तन ॥२॥

तुका म्हणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ॥३॥

२३३४

आतां माझ्या मना । इची घडो उपासना ॥१॥

ऐसें करींपांडुरंगा । प्रेमवोसंडेसेंअंगा ॥ध्रु.॥

सर्व काळ नये । वाचेविट आड भये ॥२॥

तुका वैष्णवांसंगती । हें चि भजन पंगती ॥३॥

२३३५

उपास कराडी । तिहीं करावीं बापुडीं ॥१॥

आम्ही विठोबाचे दास । चिंता झुगारावी आस ॥ध्रु.॥

भक्तीच्या उत्कषॅ । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥२॥

तुका म्हणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥३॥

२३३६

करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥१॥

कोणाकारणें हें जालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥२॥

तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा । घालुनि गोपाळा भार असें ॥३॥

२३३७

तुम्ही येथें पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ॥१॥

आतां काय पुढें वाढवुनि विस्तार । जाला समाचार आइका तो ॥ध्रु.॥

देवाचें उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनि गेला ॥२॥

तुका म्हणे सेवा समर्पूनि पायीं । जालों उतराईं ठावें असो ॥३॥

॥३१॥

२३३८

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥१॥

ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा ॥ध्रु.॥

आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ॥२॥

तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥३॥

२३३९

माझे लेखीं देव मेला । असो त्याला असेल ॥१॥

गोष्टी न करी नांव नेघें । गेलों दोघें खंडोनी ॥ध्रु.॥

स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा उदंड ॥२॥

तुका म्हणे निवांत ठेलों । वेचित आलों जीवित्व ॥३॥

२३४०

लवविलें तया सवे लवे जाती । अभिमाना हातीं सांपडेना ॥१॥

भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपती ॥ध्रु.॥

अर्चन वंदन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति ठायीं ॥२॥

तये गांवीं नाहीं दुःखाची वसती । अवघा चि भूतीं नारायण ॥३॥

अवघें चि जालें सोंवळें ब्रम्हांड । विटाळाचें तोंड न देखती ॥४॥

तुका म्हणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही भूमंडळामाजी कीर्ति ॥५॥

२३४१

पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणीक न करीं तीर्थव्रत ॥१॥

व्रत एकादशी करीन उपवासी । गाइन अहर्निशीं मुखीं नाम ॥२॥

नाम विठोबाचें घेईंन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका म्हणे ॥३॥

२३४२

संपदा सोहळा नावडे मनाला । करी तें टकळा पंढरीचा ॥१॥

जावें पंढरिसी आवडी मनासी । कधीं एकादशी आषाढी हे ॥२॥

तुका म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥३॥

२३४३

कथनी पठणी करूनि काय । वांचुनि रहणी वांयां जाय ॥१॥

मुखीं वाणी अमृतगोडी । मिथ्या भुकें चरफडी ॥ध्रु.॥

पिळणी पाक करितां दगडा । काय जडा होय तें ॥२॥

मधु मेळवूनि माशी । आणिका सांसी पारधिया ॥३॥

मेळऊनि धन मेळवी माती । लोभ्या हातीं तें चि मुखीं ॥४॥

आपलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय ॥५॥

२३४४

उमटती वाणी । वाटे नामाचिया ध्वनी ॥१॥

बरें सेवन उपकारा । द्यावें द्यावें या उत्तरा ॥ध्रु.॥

सरळ आणि मृद । कथा पाहावी तें उर्ध ॥२॥

गात जात तुका । हा चि उपदेश आइका ॥३॥

२३४५

कथाकाळींची मर्यादा सांगतों ते भावें वंदा । प्रीतीने गोविंदा हें चि एक आवडे ॥१॥

टाळ वाद्या गीत नृत्य अंतःकरणें प्रेमभरित । वाणिता तो कीर्त तद्भावने लेखावा ॥ध्रु.॥

नये अळसें मोडूं अंग कथे कानवडें हुंग । हेळणेचा रंग दावी तो चांडाळ ॥२॥

तोंडी विडा माने ताठा थोरपणे धाली गेंठा । चित्ती नेदी नामपाठा गोष्टी लावी तो चांडाळ ॥४॥

कथे इच्छी मान दावूनियां थोरपण रजा । संकोच न लुगडी सांवरी तो चांडाळा ॥५॥

आपण बैसे बाजेवरी सामान हरिच्या दासां धरी । तरि तो सुळावरि वाहिजे निश्चयेसीं ॥६॥

येतां नकरी नमस्कार कर जोडोनियां नम्र । न म्हणवितां थोर आणिकां खेटी तो चांडाळ ॥७॥

तुका विनवी जना कथे नाणावें अवगुणा । करा नारायणा ऋणी समर्पक भावें ॥८॥

२३४६

कथा देवाचें ध्यान । कथा साधना मंडण । कथे ऐसें पुण्य आणीक नाहीं सर्वथा ॥१॥

ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव ॥ध्रु.॥

मंत्र स्वल्प जना उच्चारितां वाचे मना । म्हणतां नारायणा क्षणें जळती महा दोष ॥२॥

भावें करितां कीर्तन तरे तारी आणीक जन । भेटे नारायण संदेह नाहीं म्हणे तुका ॥३॥

२३४७

कथा त्रिवेणीसंगम देव भक्त आणि नाम । तेथींचें उत्तम चरणरज वंदितां ॥१॥

जळती दोषांचे डोंगर शुद्ध होती नारी नर । गाती ऐकती सादर जे पवित्र हरिकथा ॥ध्रु.॥

तीर्थी तया ठाया येती पुनीत व्हावया । पर्वकाळ पायां तळीं वसे वैष्णवां॥२॥

अनुपम्य हा महिमा नाहीं द्यावया उपमा । तुका म्हणे ब्रम्हा नेणे वर्णू या सुखा ॥३॥

२३४८

सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज । नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं ॥१॥

आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया । शरण तुझ्या पायां या चि लागीं ॥ध्रु.॥

टाळी वाहूनियां विठ्ठल म्हणेन । तेणें निवारीन भवश्रम ॥२॥

तुका म्हणे देवा नुपेक्षावें आम्हां । न्यावें निजधामा आपुलिया ॥३॥

२३४९

जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ॥१॥

हें चि बिळवंत गाढें । आनंद करूं दिंडीपुढें ॥ध्रु.॥

किळ पापाची हे मूर्ति । नामखड्ग घेऊं हातीं ॥२॥

तुका म्हणे जाऊं । बळें दमामे ही लावूं ॥३॥

२३५०

यम सांगे दूतां तुम्हां नाहीं तेथें सत्ता । जेथें होय कथा सदा घोष नामाचा ॥१॥

नका जाऊं तया गांवां नामधारकाच्या शिवां । सुदर्शन येवा घरटी फिरे भोंवती ॥ध्रु.॥

चक्र गदा घेउनी हरि उभा असे त्यांचे द्वारीं । ला।मी कामारी रिद्धिसिद्धीसहित ॥२॥

ते बिळयाशिरोमणी हरिभक्त ये मेदिनी । तुका म्हणे कानीं यम सांगे दूतांचे ॥३॥

२३५१

कान्हया रे जगजेठी । देई भेटी एकवेळे ॥१॥

काय मोकलिलें वनीं । सावजांनीं वेढिलें ॥ध्रु.॥

येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ॥२॥

तुका म्हणें पाहिलें मागें । एवढ्या वेगें अंतरला ॥३॥

२३५२

आपुल्या आम्ही पुसिलें नाही । तुज कांहीं कारणें ॥१॥

मागें मागें धांवत आलों । कांहीं बोलों यासाटीं ॥ध्रु.॥

बहुत दिस होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ॥२॥

तुका म्हणे उभा राहें । कान्हो पाहें मजकडे ॥३॥

२३५३

धन्य बा ह्या ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥१॥

चोरूनिया तुजपाशीं । येतां त्यांसी न कळतां ॥ध्रु.॥

दोन्हीं ठायीं समाधान । सम कठीण बहुतचि ॥२॥

तुका म्हणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥३॥

२३५४

उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥१॥

वेटाळिला भोंवता हरी । मयोरफेरीं नाचती ॥ध्रु.॥

मना आले करिती चार । त्या फार हा एकला ॥२॥

तुका म्हणे नारायणीं । निराजनी मीनलिया ॥३॥

२३५५

विशमाची शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ॥१॥

म्हणऊनि चोरिलें जना । आल्या राणां एकांतीं ॥ध्रु.॥

दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ॥२॥

तुका म्हणे मोकळें मन । नारायण भोगासी ॥३॥

२३५६

आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥१॥

न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ॥ध्रु.॥

वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥२॥

तुका म्हणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ॥३॥

२३५७

कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतंता ॥१॥

अवघियांची जगनिंद । जाली धिंद सारखी ॥ध्रु.॥

अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ॥२॥

तुका म्हणे करा सेवा । आलें जीवावर तरी ॥३॥

२३५८

येथील जें एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥१॥

ती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥ध्रु.॥

अवघे दिवस गेले कामा । हीं जन्मा खंडण ॥२॥

तुका म्हणे रतल्या जनीं । सोडा झणी कान्होबा ॥३॥

॥८॥

२३५९

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥१॥

नारायण घरीं सांठविलें धन । अवघे चि वाण तया पोटीं ॥ध्रु.॥

सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा ॥२॥

तुका म्हणे येणें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकविला ॥३॥

२३६०

करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एकां एक ॥१॥

गातां आइकतां समान चि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ॥ध्रु.॥

प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शूरत्वेंसी ॥२॥

तुका म्हणे बहुजन्मांचे खंडण । होइल हा सीण निवारोनि ॥३॥

॥२॥

२३६१

नाहीं घाटावें लागत । एका सितें कळें भात ॥१॥

क्षीर निवडितें पाणी । चोंची हंसाचिये आणी ॥ध्रु.॥

आंगडें फाडुनि घोंगडें करी । अवकळा तये परी ॥२॥

तुका म्हणे कण । भुसीं निवडे कैंचा सीण ॥३॥

स्वामीचें अभंगींचें नांव काढून सालोमालो आपलें नांव घालीत त्यावर अभंग ॥ ८ ॥

२३६२

सालोमालो हरिचे दास । म्हणउन केला अवघा नास ॥१॥

अवघें बचमंगळ केलें । म्हणती एकांचें आपुले ॥ध्रु.॥

मोडूनि संतांचीं वचनें । करिती आपणां भूषणें ॥२॥

तुका म्हणे कवी । जगामधीं रूढ दावी ॥३॥

२३६३

जायाचे अळंकार । बुडवूनि होती चोर ॥१॥

त्यांसी ताडणाची पूजा । योग घडे बऱ्या वोजा ॥ध्रु.॥

अभिलाषाच्या सुखें । अंतीं होती काळीं मुखें ॥२॥

तुका म्हणे चोरा । होय भूषण मातेरा ॥३॥

२३६४

कालवूनि विष । केला अमृताचा नास ॥१॥

ऐशा अभाग्याच्या बुद्धि । सत्य लोपी नाहीं शुद्धि ॥ध्रु.॥

नाक कापुनि लावी सोनें । कोण अळंकार तेणें ॥२॥

तुका म्हणे बावी । मोडूनि मदार बांधावी ॥३॥

२३६५

कण भुसाच्या आधारें । परि तें निवडितां बरें ॥

काय घोंगालि पाधाणी । ताकामध्यें घाटी लोणी ॥ध्रु.॥

सुइणीपुढें चेंटा । काय लपविसी चाटा ॥२॥

तुका म्हणे ज्ञान । दिमाकाची भनभन ॥३॥

२३६६

विकल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ॥१॥

हा तो निवाड्याचा ठाव । खऱ्या खोट्या निवडी भाव ॥ध्रु.॥

गऱ्हवारे हा विधि । पोट वाढविलें चिंधीं ॥२॥

लावूं जाणे विल्हे। तुका साच आणिक कल्हे ॥३॥

२३६७

विषयीं अद्वये । त्यासी आम्हां सिवो नये ॥१॥

देव तेथुनि निराळा । असे निष्काम वेगळा ॥ध्रु.॥

वासनेची बुंथी । तेथें कैची ब्रम्हस्थिति ॥२॥

तुका म्हणे असतां देहीं । तेथें नाही जेमेतीं ॥३॥

२३६८

नमितों या देवा । माझी एके ठायीं सेवा ॥१॥

गुणअवगुण निवाडा । म्हैस म्हैस रेडा रेडा ॥ध्रु.॥

जनीं जनार्दन । साक्ष त्यासी लोटांगण ॥२॥

तुका म्हणे खडे । निवडू दळणीं घडघडे ॥३॥

॥८॥

२३६९

जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें ॥१॥

जया चित्तीं जैसा भाव । तयां जविळ तैसा देव ॥ध्रु.॥

सकळां पाडीये भानु । परि त्या कमळाचें जीवनु ॥२॥

तुका म्हणे माता । वाहे तान्हे याची चिंता ॥३॥

२३७०

मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥१॥

याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥ध्रु.॥

उदक अन्न काये म्हणे मज खा ये । भुकेला तो जाये चोजवीत ॥२॥

व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥३॥

तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तो चि प्रीत धरी कथे ॥४॥

२३७१

जन्मांतरिंचा परिट न्हावी । जात ठेवी त्यानें तें ॥१॥

वाखर जैसा चरचरी । तोंड करी संव दणी ॥ध्रु.॥

पूर्व जन्म शिखासूत्र । मळ मूत्र अंतरीं ॥२॥

तुका म्हणे करिती निंदा । धुवटधंदा पुढिलांचा ॥३॥

२३७२

नाम दुसी त्याचें नको दरषण । विष तें वचन वाटे मज ॥१॥

अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहोणी उठे तेथें ॥ध्रु.॥

काय लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही ॥२॥

काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं ॥३॥

तुका म्हणे संत न मनिती त्यांस । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥४॥

२३७३

येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळें चि अंधळे होती लोक ॥१॥

उजडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां ॥ध्रु.॥

बहु फेरे आले सोसोनि वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ॥२॥

तुका म्हणे जाऊं सादावीत वाट । भेटे तरी भेटो कोणी तरी ॥३॥

२३७४

नव्हे जोखाईं जोखाईं । मायराणी मेसाबाईं ॥१॥

बिळया माझा पंढरिराव । जो या देवांचा ही देव ॥ध्रु.॥

रंडी चंडी शक्ति । मद्यमांस भिक्षती ॥२॥

बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाटीं देव ॥३॥

गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥४॥

मुंज्या म्हैसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ॥५॥

वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥६॥

तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईंचा पती ॥७॥

२३७५

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥१॥

मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥ध्रु.॥

नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥२॥

तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥३॥

२३७६

मायें मोकलिलें कोठें जावें बळें । आपुलिया बळें न वंचे तें ॥१॥

रुसोनियां पळे सांडुनियां ताट । मागें पाहे वाट यावें ऐसीं ॥ध्रु.॥

भांडवल आम्हां आळी करावी हे । आपणें माये धांवसील ॥२॥

तुका म्हणे आळी करुनियां निकी । देसील भातुकीं बुझाऊनि ॥३॥

२३७७

नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळीचें ॥१॥

गाईंगोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलीका ॥ध्रु.॥

तें हें ध्यान दिगांबर । कटीं कर मिरवती ॥२॥

नेणपणे उगें चि उभें । भक्तिलोभें राहिलें ॥३॥

नेणे वरदळाचा मान । विटे चरण सम उभें ॥४॥

सहज कटावरी हात । दहींभात शिदोरी ॥५॥

मोहरी पांवा गांजिवा पाठीं । धरिली काठी ज्या काळें ॥६॥

रम्य स्थळ चंद्रभागा । पांडुरंगा क्रीडेसी ॥७॥

भीमा दक्षणमुख वाहे । दृष्टी पाहे समोर ॥८॥

तारावेसे मूढ लोक । दिली भाक पुंडलिका ॥९॥

तुका म्हणे वैकुंठवासी । भक्तांपासीं राहिला ॥१०॥

२३७८

विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ॥१॥

तयासी बोलतां होईल विटाळ । नेव जाये तो जळस्नान करितां ॥ध्रु.॥

विठ्ठलनामाची नाहीं ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ॥२॥

तुका म्हणे मज विठोबाची आण। जरी प्रतिवचन करिन त्यासी ॥३॥

२३७९

तया घडले सकळ नेम । मुखीं विठोबाचें नाम ॥१॥

कांहीं न लगे सिणावें । आणिक वेगळाल्या भावें । वाचे उच्चारावें । रामकृष्णगोविंदा ॥ध्रु.॥

फळ पावाल अवलिळा । भोग वैकुंठ सोहळा ॥२॥

तुका म्हणे त्याच्या नांवें । तो चि होइजेल स्वभावें ॥३॥

२३८०

पुराणप्रसिद्ध सीमा । नामतारकमहिमा ॥१॥

मागें जाळी महा दोष । पुढें नाही गर्भवास ॥ध्रु.॥

जें निंदिलें शास्त्रें । वंद्य जालें नाममात्रें ॥२॥

तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ॥३॥

२३८१

नाम घेतां न लगे मोल । नाममंत्र नाहीं खोल ॥१॥

दों अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ॥ध्रु.॥

नाहीं वर्णाधमयाती । नामीं अवघीं चि सरतीं ॥२॥

तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ॥३॥

२३८२

नाम घेतां वांयां गेलां । ऐसा कोणें आईकिला ॥१॥

सांगा विनवितों तुम्हांसी । संत महंत सद्धि ऋषी ॥ध्रु.॥

नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ॥२॥

सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ॥३॥

२३८३

फुकाचें तें लुटा सार । व्हा रे अमर सदैव ॥१॥

नाहीं गर्भवास पुढती । डोंगर जळती दोषांचे ॥ध्रु.॥

उदंड भावें उदंड घ्यावें । नाम गावें आवडी ॥२॥

तुका म्हणे घरिच्या घरीं । देशा उरीं न सीणीजे ॥३॥

॥१५॥

२३८४

प्रीति नाही राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥१॥

तैसे दंभी जालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ॥ध्रु.॥

राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ॥२॥

बाहातरी खोडी परी देवमण कंठीं । तैसो जगजेठी म्हणे तुका ॥३॥

२३८५

करावा उद्धार किंवा घ्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें देवा ॥१॥

निरसनें माझा होईल संदेह । अवघें चि आहे मूळ पायीं ॥ध्रु.॥

राहिलों चिकटूण कांहीं चि न कळे । कोणा नेणों काळे उदय भाग्य ॥२॥

तुका म्हणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसें कीव देवराया ॥३॥

॥१॥

२३८६

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनियां ॥१॥

मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंके ॥ध्रु.॥

भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भले ॥२॥

तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥३॥

२३८७

भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥१॥

म्हणऊनी मनीं मानूं नये खेदु । म्हणावा गोविंद वेळोवेळां ॥ध्रु.॥

आणिकां रुसावें न लगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ॥२॥

तुका म्हणे भार घातलिया वरी । होईल कैवारी नारायण ॥३॥

२३८८

निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें । साधन बरवें हें चि एक ॥१॥

तरी च अंगीकार करिल नारायण । बडबड तो सीण येणेंविण ॥ध्रु.॥

सोइरें पिशुन समान चि घटे । चित्ती पर ओढे उपकारी ॥२॥

तुका म्हणे चित्ती जालिया निर्मळ । तरि च सकळ केलें होय ॥३॥

२३८९

दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ॥१॥

रिद्धि सिद्धि येती घरा । त्याचा करिती पसारा ॥ध्रु.॥

मानदंभांसाटीं । पडे देवासवें तुटी ॥२॥

तुका म्हणे मेवा । कैचा वेठीच्या नदवां ॥३॥

२३९०

तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनियां सार उरलें तें ॥१॥

मग कदाकाळीं नव्हे शुद्ध जाति । नासें शत्रु होती मित्र ते चि ॥ध्रु.॥

किळवर बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ॥२॥

तुका म्हणे मन करावें पाठेळ । साहावे चि जाळ सिजेवरि ॥३॥

२३९१

पाठेळ करितां न साहावे वारा । साहेलिया ढोरा गोणी चाले ॥१॥

आपणां आपण हे चि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरों द्यावें ॥ध्रु.॥

नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ॥२॥

तुका म्हणे जरी जग टाकी घाया । त्याच्या पडे पायां जन मग ॥३॥

२३९२

काविळयासी नाहीं दया उपकार । काळिमा अंतर विटाळसें ॥१॥

तैसें कुधनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ध्रु.॥

कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥२॥

तुका म्हणे विष सांडूं नेणे साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥३॥

२३९३

लाभ खरा नये तुटी । नाहीं आडखळा भेटी ॥१॥

जाय अवघिया देशा । येथें संचलाची तैसा ॥ध्रु.॥

मग न लगे पारखी । अवघीं सकट सारखीं ॥२॥

तुका म्हणे वोळे । रूपें भुलविले डोळे ॥३॥

२३९४

नको आतां पुसों कांहीं । लवलाहीं उसंती ॥१॥

जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥धृ.॥

वचनाचा न करीं गोवा । रिघें देवासीं शरण ॥२॥

तुका म्हणे कृपावंता । बहु चिंता दीनाची ॥३॥

२३९५

बुद्धिहीनां जडजीवां । नको देवा उपेक्षूं ॥१॥

परिसावी हे विज्ञापना । आम्हां दीनां दासांची ॥धृ.॥

चिंतूनियां आले पाय । त्यांसी काय वंचन ॥२॥

तुका म्हणे पुरुषोत्तमा । करीं क्षमा अपराध॥३॥

२३९६

म्हणऊनि काकुळती । येतों पुढतों पुढती । तुम्हां असे हातीं । कमळापती भांडार ॥१॥

फेडूं आलेती दरद्रि । तरी न लगे उशीर । पुरे अभयंकर । ठाया ठाव रंकाशी ॥धृ.॥

कोठें न घली धांव । याजसाठीं तजिली हांव । घेऊं नेदी वाव । मना केला विरोध ॥२॥

कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें । तुमच्या कीर्तनें । तुका तुम्हां जागवी ॥३॥

२३९७

बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे आवडी । बहुत या गोडी आली रसा ॥१॥

बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु आला दिस गोमट्याचा ॥ध्रु.॥

बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ॥२॥

बहु तुका जाला निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनियां॥३॥

२३९८

येहलोकीं आम्हां वस्तीचें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥१॥

कार्यापुरतें कारण मारगीं । उलंघूनि वेगीं जावें स्थळा ॥ध्रु.॥

सोंगसंपादणी चालवितों वेव्हार । अत्यंतिक आदर नाहीं गोवा ॥२॥

तुका म्हणे वेंच लाविला संचिता । होइल घेतां लोभ कोणां ॥३॥

२३९९

रोजकीर्दी जमा धरुनी सकळ । खताविला काळ वरावरी ॥१॥

नाहीं होत झाड्यापाड्याचें लिगाड । हुजराती ते गोड सेवा रूजू ॥ध्रु.॥

चोरासाटीं रदबदल आटा हाश । जळो जिणे दाश बहुताचें ॥२॥

सावधान तुका निर्भर मानसीं । सालझाड्यापाशी गुंपों नेणे ॥३॥

२४००

त्रिविधकर्माचे वेगळाले भाव । निवडूनि ठाव दाखविला॥१॥

आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख गौरव संतां अंगीं ॥ध्रु.॥

हिशेबें आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाही आन चालों येत ॥२॥

तुका म्हणे नाहीं पापपुण्य खतीं । झाड्याची हुजती हातां आली ॥३॥

२४०१

साकरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आम्हां जोडी वैष्णवांची ॥१॥

मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ॥ध्रु.॥

भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आम्हांसि तरी खेळावरि चित्त ॥२॥

तुका म्हणे आम्ही देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥३॥

२४०२

सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ॥१॥

पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी हे ॥ध्रु.॥

हरिदासांचा समागम । अंगीं प्रेम विसांवे ॥२॥

तुका म्हणे हें चि मन । इच्छादान मागतसे ॥३॥

२४०३

करूं जातां सन्निधान । क्षणि जन पालटे ॥१॥

आतां गोमटे ते पाय । तुझे माय विठ्ठले ॥ध्रु.॥

हें तों आलें अनुभवा । पाहावें जीवावरूनि ॥२॥

तुका म्हणे केला त्याग । सर्वसंग म्हणऊनि ॥३॥

२४०४

क्षीर मागे तया रायतें वाढी । पाधानी गधडी ऐशा नांवें ॥१॥

समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें ॥ध्रु.॥

अमंगळ वाणी वदवी मंगळी । अशुभ वोंगळी शोभन तें ॥२॥

तुका म्हणे नेणें समयो ठाया ठाव । राहाडी ते वाव नरकाडी ॥३॥

२४०५

विंचा पीडी नांगी । ज्याचा दोष त्याचे अंगीं ॥१॥

केला पाहिजे विचार । मन मित्र दावेदार ॥धृ.॥

मधुरा उत्तरीं । रांवा खेळे उरावरी ॥२॥

तुका म्हणे रेडा । सुखें जाती ऐशा पीडा ॥३॥

२४०६

तीथाअची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म । जाणावें तें वर्म बहु पुण्य ॥१॥

बहु बरी ऐसी भाविकांची जोडी । काळ नाहीं घडी जात वांयां ॥धृ.॥

करूनी चिंतन करवावें आणिकां । तो या जाला लोकां नाव जगीं ॥२॥

तुका म्हणे ऐसे परउपकारी । त्यांच्या पायांवरी डोईं माझी ॥३॥

२४०७

भयाची तों आम्हां चिंत्तीं । राहो खंती सकेना ॥१॥

समर्पिलों जीवें भावें । काशा भ्यावें कारणें ॥धृ.॥

करीन तें कवतुकें। अवघें निकें शोभेल ॥२॥

तुका म्हणे माप भरूं । दिस सारूं कवतुकें ॥३॥

२४०८

पाचारितां धावे । ऐसी ठायींची हे सवे ॥१॥

बोले करुणा वचनीं । करी कृपा लावी स्तनीं ॥धृ.॥

जाणे कळवळा । भावसिद्धींचा जिव्हाळा ॥२॥

तुका म्हणे नाम । मागें मागें धांवे प्रेम॥३॥

२४०९

कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावीं ॥१॥

येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ॥ध्रु.॥

देहआत्म वंदी । केला घात कुबुद्धी ॥२॥

तुका म्हणे मन । कळवळी वाटे सीण ॥३॥

२४१०

दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥१॥

आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥ध्रु.॥

येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ॥२॥

तुका म्हणे जाणवलें । आम्हां भलें एवढेंच॥३॥

२४११

बैसों पाठमोरीं । मना वाटे तैसे करीं ॥१॥

परिं तूं जाणसीं आवडीं । बाळा बहुतांचीं परवडी ॥ध्रु.॥

आपुलाल्या इच्छा । मागों जया व्हावें जैशा ॥२॥

तुका म्हणे आईं । नव्हसी उदास विठाईं ॥३॥

२४१२

विश्वंभरा वोळे । बहुत हात कान डोळे ॥१॥

जेथें असे तेथें देखे । मागितलें तें आइके ॥ध्रु.॥

जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो कोड ॥२॥

तुका म्हणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ॥३॥

२४१३

दाटे कंठ लागे डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ॥१॥

तेणें सुखें छंदें घेईंन सोंहळा । होऊनि निराळा पापपुण्यां ॥ध्रु.॥

तुझ्या मोहें पडो मागील विसर । आलापें सुस्वर करिन कंठ ॥२॥

तुका म्हणे येथें पाहिजे सौरस । तुम्हांविण रस गोड नव्हे॥३॥

२४१४

पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचिये ॥१॥

आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ॥ध्रु.॥

बैसायाची इच्छा कडे । चाली खडे रुपताती ॥२॥

तुका म्हणे कृपाळुवा । करीन सेवा लागली ॥३॥

२४१५

आम्ही जालों एकविध । सुद्या सुदें असावें ॥१॥

यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ॥ध्रु.॥

घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें विशेषें ॥२॥

तुका म्हणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ॥३॥

२४१६

आम्ही आर्तभूत जिवीं । तुम्ही गोसावी तों उदास ॥१॥

वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ॥ध्रु.॥

आम्ही मरों वेरझारीं । स्वामी घरीं बैसले ॥२॥

तुका म्हणे करितां वाद । कांहीं भेद कळेना ॥३॥

२४१७

पुसावें तें ठाईं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ॥१॥

येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥ध्रु.॥

फळ तें चि बीज बीज तें ची फळ । उपनांवें मूळ न पालटे ॥२॥

तुका म्हणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अलंकार मिथ्या नांव ॥३॥

२४१८

माझी आतां सत्ता आहे । तुम्हां पायां हे वरती ॥१॥

एकाविण नेणें दुजा । पंढरिराजा सर्वांगें ॥ध्रु.॥

पुरवावी केली आळी । जे जे काळीं मागण तें ॥२॥

तुका म्हणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ॥३॥

२४१९

फावलें तुम्हां मागें । नवतों लागें पावलों ॥१॥

आलों आतां उभा राहें । जवळी पाहें सन्मुख ॥ध्रु.॥

घरीं होती गोवी जाली । कामें बोली न घडे चि ॥२॥

तुका म्हणे धडफुडा । जालों झाडा देई देवा ॥३॥

२४२०

आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरि चित्त असों द्यावें ॥१॥

तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परि हें उत्तर आवडीचें ॥धृ.॥

न वंचीं वो कांहीं एकही प्रकार । आपणां अंतर नका मज ॥२॥

तुका म्हणे मोहो राखावा सतंत । नये पाहों अंत पांडुरंगा ॥३॥

२४२१

करूनि राहों जरी आत्मा चि प्रमाण । नश्चिळ नव्हे मन काय करूं ॥१॥

जेवलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्द चि ते ॥धृ.॥

पुरे पुरे आतां तुमचें ब्रम्हज्ञान । आम्हासी चरण न सोडणें ॥२॥

विरोधें विरोध वाढे पुढतोपुढती । वासनेचे हातीं गर्भवास ॥३॥

सांडीमांडीअंगीं वसे पुण्यपाप । बंधन संकल्प या चि नांवें ॥४॥

तुका म्हणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी देह ॥५॥

२४२२

तुमचे स्तुतियोग्य कोटें माझी वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥

भिक्तभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडूनि अंजुळ उभा असें ॥धृ.॥

कैचें भाग्य ऐसें पाविजे संनिध । नेणें पाळूं विध करुणा भाकीं ॥२॥

संतांचे सेवटीं उच्छिष्टाची आस । करूनियां वास पाहातसें ॥३॥

करीं इच्छा मज म्हणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ॥४॥

तुका म्हणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रदिवस ॥५॥

२४२३

सर्वविशीं आम्हीं हे चि जोडी केली । स्वीमीची साधिली चरणसेवा ॥१॥

पाहिलें चि नाहीं मागें परतोनी । जिंकिला तो क्षणीं क्षण काळ ॥ध्रु.॥

नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पाठी हेवा येऊं दिला ॥२॥

केला लाग वेगीं अवघी चि तांतडी । भावना ते कुडी दुराविली ॥३॥

कोठें मग ऐसें होतें सावकास । जळो तया आस वेव्हाराची ॥४॥

तुका म्हणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवी कशाची ही ॥५॥

२४२४

येणें मुखें तुझे वर्णि गुण नाम । तें चि मज प्रेम देई देवा ॥१॥

डोळे भरूनियां पाहें तुझें मुख । तें चि मज सुख देई देवा ॥ध्रु.॥

कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ती । ते मज विश्रांती देईं देवा ॥२॥

वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देई हातांस पायां बळ ॥३॥

तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥४॥

२४२५

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत । तूं चि माझें हित करिता देवा ॥१॥

तूं चि माझा देव तूं चि माझा जीव । तूं चि माझा भाव पांडुरंगा ॥ध्रु.॥

तूं चि माझा आचार तूंचि माझा विचार । तूं चि सर्व भार चालविसी ॥२॥

सर्व भावें मज तूं होसी प्रमाण । ऐसी तुझी आण वाहातुसें ॥३॥

तुका म्हणे तुज विकला जीवभाव । कळे तो उपाव करीं आतां ॥४॥

२४२६

वारंवार तुज द्यावया आठव । ऐक तो भाव माझा कैसा ॥१॥

गेले मग नये फिरोन दिवस । पुडिलांची आस गणित नाहीं ॥धृ.॥

गुणां अवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासावीस ॥२॥

कांहीं एक तुझा न देखों आधार । म्हणऊनी धीर नाहीं जीवा ॥३॥

तुका म्हणे तूं ब्रम्हांडाचा जीव । तरी कां आम्ही कींव भाकीतसों ॥४॥

२४२७

असोत हे तुझे प्रकार सकळ । काय खळखळ करावी हे ॥१॥

आमुचें स्वहित जाणतसों आम्ही । तुझें वर्म नामीं आहे तुझ्या ॥धृ.॥

विचारितां आयुष्य जातें वांयांविण । रोज जन्मा गोवण पडतसे ॥२॥

राहेन मी तुझे पाय आठवूनी । आणीक तें मनीं येऊं नेदीं ॥३॥

तुका म्हणे येथें येसी अनायासें । थोर तुज पिसें कीर्तनाचें ॥४॥

२४२८

विष्णुदासां भोग । जरी आम्हां पीडी रोग ॥१॥

तरि हें दिसे लाजिरवाणें । काय तुम्हांसी सांगणें ॥धृ.॥

आम्हां काळें खावें । बोलिलें तें वांयां जावें ॥२॥

तुका म्हणे दास । आम्ही भोगूं गर्भवास ॥३॥

२४२९

भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥१॥

तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ॥ध्रु.॥

आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥२॥

मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा ॥३॥

वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥४॥

तुका म्हणे फार । थोडा तरी पर उपकार ॥५॥

२४३०

वचन तें नाहीं तोडीत शरीरा । भेदत अंतरा वज्रा-ऐसें ॥१॥

कांहीं न सहावें काशा करणें । संदेह निधान देह बळी ॥ध्रु.॥

नाहीं शब्द मुखीं लागत तिखट । नाहीं जड होत पोट तेणें ॥२॥

तुका म्हणे जरी गिळेअहंकार । तरी वसे घर नारायण ॥३॥

२४३१

नव्हो आतां जीवीं कपटवसती । मग काकुळती कोणा यावें ॥१॥

सत्याचिये मापें गांठीं नये नाड । आदि अंत गोड नारायण ॥ध्रु.॥

चोखटिया नाहीं विटाळाचा आघात । साच ते साचांत सांचा पडे ॥२॥

विचारिली वाट उसंत सीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ॥३॥

आहाराच्या घासें पचोनियां जिरे । वासना ही उरे उर्वरीत ॥४॥

तुका म्हणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ॥५॥

२४३२

नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें । असे नारायणें उचित केलें ॥१॥

शब्दाच्या वोवोनी रत्नाचिया माळा । मुळींच जिव्हाळा झरवणी ॥ध्रु.॥

अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥२॥

तुका म्हणे मज सरतें परतें । हें नाहीं अनंतें उरों दिलें ॥३॥

२४३३

सहज लीळा मी साक्षी याचा । नये वंचूं वाचा ऐसें जालें ॥१॥

उपक्रमें वदे निशब्दाची वाणी । जे कोठें बंधनीं गुंपों नेणें ॥ध्रु.॥

तम नासी परि वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन ॥२॥

तुका म्हणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हा नये तोंड दावूं ॥३॥

२४३४

बोलाल या आतां आपुल्यापुरतें । मज या अनंतें गोवियेलें ॥१॥

झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥ध्रु.॥

तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सवें मिठी अंगसंगें ॥२॥

तुका म्हणे तुम्हां होईल हे परी । अनुभव वरी येईल मग ॥३॥

२४३५

जैशा तुम्ही दुरी आहां । तैशा राहा अंतरें ॥१॥

नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ जडलासे ॥ध्रु.॥

अवघा हा चि राखा काळ । विक्राळ चि भोंवता ॥२॥

तुका म्हणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ॥३॥

२४३६

सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ॥१॥

जिवासाटीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥ध्रु.॥

जरि होय उघडी दृष्टि । तरि गोष्टी युद्धाच्या ॥२॥

तुका म्हणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ॥३॥

२४३७

आडवा तो उभा । असे दाटोनियां प्रभा ॥१॥

देव नाहीं एकविध । एक भाव असे शुद्ध ॥ध्रु.॥

भेदाभेद आटी । नाहीं फार कोठें तुटी ॥२॥

तुका म्हणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा ॥३॥

२४३८

एका बोटाची निशाणी । परीपाख नाहीं मनीं ॥१॥

तरिं तें संपादिलें सोंग । कारणावांचूनियां वेंग ॥ध्रु.॥

वैष्णवांचा धर्म । जग विष्णु नेणे वर्म ॥२॥

अतिशयें पाप । तुका सत्य करी माप ॥३॥

२४३९

सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव । स्वामीचा गौरव इच्छीतसें ॥१॥

मग तें अवीट न भंगे साचारें । पावलें विस्तारें फिरों नेणे ॥ध्रु.॥

वाणी वदे त्याचा कोणांसी विश्वास । अभयें करें दास सत्य तई ॥२॥

तुका म्हणे आधीं न करीं तांतडी । पायीं जाली जोडी तेणें शुद्ध ॥३॥

२४४०

सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण ॥१॥

मनीं भक्तीची आवडी । हेवा व्हावी ऐशी जोडी ॥ध्रु.॥

घेईंन जन्मांतरें । हें चि करावया खरें ॥२॥

तुका म्हणे देवा । ॠणी करूनि ठेवूं सेवा॥३॥

२४४१

आणितां त्या गती । हंस काउळे न होती ॥१॥

सांडा सांडा रे मठारे । येथें गांठीसवें धुरें ॥ध्रु.॥

नाकेंविण मोती । उभ्या बाजारें फजिती ॥२॥

हुकुमदाज तुका । येथें कोणी फुंदो नका ॥३॥

२४४२

ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥१॥

होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥ध्रु.॥

बोरामध्यें वसे अळी । अठोळीच भोंवती ॥२॥

पोटासाटीं वेंची चणे । राजा म्हणे तोंडें मी ॥३॥

बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ॥४॥

तुका म्हणे ऐसें आहे । काय पाहे त्यांत तें ॥५॥

२४४३

धांव धांव गरुडध्वजा । आम्हां अनाथांच्या काजा ॥१॥

बहु जालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ॥ध्रु.॥

पाहें पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥२॥

असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥३॥

न लवावा उशीर । नेणों कां हा केला धीर ॥४॥

तुका म्हणे चाली । नको चालूं धांव घालीं ॥५॥

२४४४

पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे माउलिये ॥१॥

पान्हां घाली प्रेमधारा । पूर क्षीरा लोटों दे ॥ध्रु.॥

अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडाया ॥२॥

तुका म्हणे घेइन उड्या । सांडिन कुड्या भावना ॥३॥

२४४५

गजइंद्र पशु आप्तें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥१॥

त्यासाठीं गरुड सांडुनि धांवसी । माया झळंबेसी दिनानाथा ॥ध्रु.॥

धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ॥२॥

तुका म्हणे ब्रीद बांधलें यासाठीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ॥३॥

२४४६

चारी वेद जयासाटीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥१॥

न करीं आणीक साधनें । कष्टसी कां वांयांविण ॥ध्रु.॥

अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी ॥२॥

गीता जेणें उपदेशिली । ते ही विटेवरी माउली ॥३॥

तुका म्हणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारीं ॥४॥

२४४७

पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥१॥

नये वाटों गुणदोषीं । मना जतन येविशीं ॥ध्रु.॥

त्रिविधदेह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥२॥

तुका म्हणे धीरें । विण कैसें होतें बरें ॥३॥

२४४८

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥१॥

न लगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ध्रु.॥

ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥२॥

रामकृष्णहरिविठ्ठलकेशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥३॥

याहूनि आणीक नाहीं पैं साधन । वाहातसें आण विठोबाची ॥४॥

तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो येथें ॥५॥

२४४९

भाविकांचें काज अंगें देव करी । काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ॥१॥

उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं । आवडी तयांची मोठी देवा ॥ध्रु.॥

काय देवा घरीं न मिळेची अन्न । मागे भाजीपान द्रौपदीसी ॥२॥

अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें । संकटें बहुतें निवारिलीं ॥३॥

तुका म्हणे ऐसीं आवडती लडिवाळें । जाणीवेचें काळें तोंड देवा ॥४॥

२४५०

सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचे विटेवरी ॥१॥

डोळियांची धणी पाहातां न पुरे । तया लागीं झुरे मन माझें ॥ध्रु.॥

आन गोड कांहीं न लगे संसारीं । राहिले अंतरीं पाय तुझे ॥२॥

प्राण रिघों पाहे कुडी हे सांडुनी । श्रीमुख नयनीं न देखतां ॥३॥

चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ॥४॥

२४५१

ऐका ऐका भाविकजन । कोण कोण व्हाल ते ॥१॥

ताकिकांर्चा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥ध्रु.॥

नका शोधूं मतांतरें । नुमगे खरें बुडाल ॥२॥

कलिमध्यें दास तुका । जातो लोकां सांगत ॥३॥

२४५२

आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥१॥

रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥ध्रु.॥

हर्षामर्ष जों हे नाहीं जों जिराले । तोंवरि हे केले चार त्यांनीं ॥२॥

मुक्त जालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका म्हणे दुःखें बांधला तो ॥३॥

२४५३

आलिया अतीता म्हणतसां पुढारें । आपुलें रोकडें सत्व जाय ॥१॥

काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं । हीनकर्मी लोकीं म्हणावया ॥ध्रु.॥

दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुची तरि अन्न कैसें देतें ॥२॥

तुका म्हणे ध्वज उभारिला कर । ते शिक्त उदार काय जाली ॥३॥

२४५४

जेथें लामीचा वास । गंगा आली पापा नास ॥१॥

तें म्यां हृदयीं धरिलें । तापें हरण पाउलें ॥ध्रु.॥

सेवा केली संतजनीं । सुखें राहिले लपोनि ॥२॥

तुका म्हणे वांकी । भाट जाली तिहीं लोकीं ॥३॥

२४५५

रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥१॥

देहभाव हरपला । तुज पाहातां विठ्ठला ॥ध्रु.॥

कळों नये सुखदुःख । तान हरपली भूक ॥२॥

तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥३॥

२४५६

जाणतें लेकरूं । माता लागे दूर धरूं ॥१॥

तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥ध्रु.॥

नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ॥२॥

तुका म्हणे लोणी । ताक सांडी निवडूनि ॥३॥

२४५७

तुजविण कोणां । शरण जाऊं नारायणा ॥१॥

ऐसा न देखें मी कोणी । तुजा तिहीं त्रिभुवनीं ॥ध्रु.॥

पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥२॥

तुका म्हणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ॥३॥

२४५८

ऐसें भाग्य कई लाहाता होईंन । अवघें देखें जन ब्रम्हरूप ॥१॥

मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ध्रु.॥

शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥२॥

विवेकासहित वैराग्याचें बळ । धग्धगितोज्ज्वाळ अग्नि जैसा ॥३॥

भक्ती नवविधा भावशुद्ध बरी । अळंकारावरी मुगुटमणि ॥४॥

तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥५॥

२४५९

कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी॥१॥

कासया फिरावे अनेक ते देश । दावितील आस पुढें लाभ ॥ध्रु.॥

कासया पुजावीं अनेक दैवतें । पोटभरे तेथें लाभ नाहीं ॥२॥

कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुका साटीं ॥३॥

तुका म्हणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईंल घरा पाहिजे तो ॥४॥

२४६०

वैष्णवमुनिविप्रांचा सन्मान । करावा आपण घेऊं नये ॥१॥

प्रभु जाला तरी संसाराचा दास । विहित तयासी यांची सेवा ॥२॥

तुका म्हणे हे आशीर्वादें बळी । जाईंल तो छळी नरकायासीं ॥३॥

२४६१

देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥

ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥धृ.॥

हरिजनासी भेटी । नहो अंगसंगें तुटी ॥२॥

तुका म्हणे जिणें । भलें संतसंघष्टणें ॥३॥

२४६२

भाग सीण गेला । माझा सकळ विठ्ठला ॥१॥

तुझा म्हणवितों दास । केली उच्छिष्टाची आस ॥धृ.॥

राहिली तळमळ । तई पासोनी सकळ ॥२॥

तुका म्हणे धालें । पोट ऐसें कळों आलें ॥३॥

२४६३

रायाचें सेवक । सेवटीचें पीडी रंक ॥१॥

हा तों हिणाव कवणा । कां हो नेणां नारायणा ॥धृ.॥

परिसेंसी भेटी । नव्हे लोहोपणा तुटी ॥२॥

तुझें नाम कंठीं । तुक्या काळासवें भेटी ॥३॥

२४६४

सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा । माझ्या पांडुरंगा सारिकें तें ॥१॥

न लगे हिंडणें मुंडणें ते कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ॥ध्रु.॥

चंद्रभागे स्नान विध तो हरिकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ॥२॥

तुका म्हणे काला वैकुंठीं दुर्लभ । विशेष तो लाभ संतसंग ॥३॥

२४६५

नसतां अधिकार उपदेशासी बळत्कार । तरि ते केले हो चार माकडा आणि गारूडी ॥१॥

धन धान्य राज्य बोल वृथा रंजवणें फोल । नाहीं तेथें ओल बीज वेची मूर्ख तो ॥ध्रु.॥

नये बांधों गांठी पदरा आण ऐसी तुटी । असोन कसोटी शिष्टाचार अनुभव ॥२॥

उपदेसी तुका मेघ वृष्टीनें आइका । संकल्पासी धोका सहज तें उत्तम ॥३॥

२४६६

घालुनियां मापीं । देवभक्त बैसले जपीं ॥१॥

तैसी होते सांडउलंडी । निजनिजांची मुडी ॥ध्रु.॥

अमुपीं उखतें । आपण वोस आपण यातें ॥२॥

देव आतां जाला । उगवे संकोच वहिला ॥३॥

अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी ॥४॥

आडकिला झोंपा । रिता कळिवरचा खोंपा ॥५॥

गोदातीरीं आड । करिते करविते द्वाड ॥६॥

तुका म्हणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ॥७॥

२४६७

उंबरांतील कीटका । हें चि ब्रम्हांड ऐसें लेखा ॥१॥

ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐशीं झाडें किती नवखडीं ॥ध्रु.॥

हें चि ब्रम्हांड आम्हांसी । ऐसीं अगणित अंडें कैसीं ॥२॥

विराटाचे अंगी तैसे । मोजूं जातां अगणित केंश ॥३॥

ऐशा विराटाच्या कोटी । सांटवल्या ज्याच्या पोटीं ॥४॥

तो हा नंदाचा बाळमुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥५॥

ऐशी अगम्य ईंश्वरी लीळा । ब्रम्हानंदीं गम्य तुक्याला ॥६॥

२४६८

ब्रम्हज्ञान तरी एके दिवसीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥१॥

अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उपराटी दृष्टी केली ॥ध्रु.॥

जनकभेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥२॥

खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ॥३॥

जाऊनियां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ॥४॥

२४६९

सहज पावतां भगवंतीं परि हीं विकल्पें परतीं । फुकाची हे चित्तीं वाठवण कां न धरिती ॥१॥

हरि व्यापक सर्वगत हें तंव मुख्यत्वें वेदांत । चिंतनासी चित्त असों द्यावें सावध ॥ध्रु.॥

विरजाहोम या चि नांवें देह नव्हे मी जाणावें । मग कां जी यावें वरी लागे संकल्पा ॥२॥

कामक्रोधे देह मळिण स्वाहाकारीं कैंचें पुण्य । मंत्रीं पूजियेला यज्ञ मनमुंडण नव्हे चि ॥३॥

अनन्यभक्तीचे उपाय ते या विठोबाचे पाय । ध्याइल तो काय जाणे चुकों मारग ॥४॥

आतां सांगे तुका एक तुम्ही चुकों नका । सांडीमांडी धोका शरण रिघतां गोमटें ॥५॥

२४७०

आम्हीं जाणावें तें काईं तुझें वर्म कोणे ठायीं । अंतपार नाहीं ऐसें श्रुति बोलती ॥१॥

होई मज तैसा मज तैसा साना सकुमार रुषीकेशा । पुरवीं माझी आशा भुजा चारी दाखवीं ॥ध्रु.॥

खालता सप्त ही पाताळा वरता स्वर्गाहूनि ढिसाळा । तो मी मस्यक डोळां कैसा पाहों आपला ॥२॥

मज असे हा भरवसा पढीयें वोसी तयां तैसा । पंढरीनिवासा तुका म्हणे गा विठोबा ॥३॥

२४७१

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ॥१॥

येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥ध्रु.॥

आकाश मंडप पृथुवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥२॥

कंथाकुमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवश्वरु ॥३॥

हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥४॥

तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी ॥५॥

२४७२

अनंत ब्रम्हांडें । एके रोमीं ऐसें धेंडें ॥१॥

तो या गौळियांचे घरीं । उंबरा चढतां टेंका धरी ॥धृ.॥

मारी दैत्य गाडे । ज्यांचे पुराणीं पवाडे ॥२॥

तुका म्हणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥३॥

२४७३

सावधान ऐसें काय तें विचारा । आले हो संसारा सकळ ही ॥१॥

अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ॥धृ.॥

मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट ॥२॥

तुका म्हणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ॥३॥

२४७४

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥१॥

तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ॥धृ.॥

अग्निकर्पुराच्या मेळीं । काय उरली काजळी ॥२॥

तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥३॥

२४७५

सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वांया हांवभरी होऊं नका ॥१॥

दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥ध्रु.॥

चवदा कल्पेंवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीखालीं ॥२॥

तुका म्हणे वेगीं जाय सुटोनियां । धरूनि हृदयामाजी हरि ॥३॥

२४७६

तुज करितां होय ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राईं रंक राणा ॥१॥

अशुभाचें शुभ करितां तुज कांही । अवघड नाहीं पांडुरंगा ॥ध्रु.॥

सोळा सहजर नारी ब्रम्हचारी कैसा । निराहारी दुर्वासा नवल नव्हे ॥२॥

पंचभ्रतार द्रौपदी सती । करितां पितृशांती पुण्य धर्मा ॥३॥

दशरथा पातकें ब्रम्हहत्ये ऐसीं । नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ॥४॥

मुनेश्वरा नाहीं दोष अनुमात्र । भांडवितां सुत्र वध होती ॥५॥

तुका म्हणे माझे दोष ते कायी । सरता तुझा पायीं जालों देवा ॥६॥

पाळणा

२४७७

जननिया बाळका रे घातलें पाळणा । पंचतत्वी जडियेल्या वारतिया चहू कोणा ।

अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा । वैखरी धरूनि हातीं भाव दावी खेळणा ॥१॥

निजीं रे निजीं आतां । म्हणोनि परिये दे माता । खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां । निजीं रे निजीं आतां ॥ध्रु.॥

खेळतां बाहेरि रे मुला लोकांच्या सवें । बागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें ।

खेळतां दुश्चित्ता रे देखोनि तें न्यावें । म्हणोनि सांगें तुज शीघ्र वचन पाळावें॥२॥

संचित मागें तुज शुद्ध होतें सांगाती । तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं ।

आणीक नेली मागें काय जाणों तीं किती । आलासि येथवरि थोरपुण्यें बहुतीं ॥३॥

खेळतां शुक देवा तो रे लागला पाठीं । लपाला वरुषें बारा तिये मातेचे पोटीं ।

रिघतां बाहेरि रे पळे घेऊनि कासोटी । ते चि परी जाली स्वामी भेणें रिघें कपाटीं ॥४॥

खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक । पडिला अग्नीमाजी पाव जळत एक ।

भरलासे कांप अंगीं सुख नाठवें दुःख । आप पर तें ही नाहीं देहभाव सकळिक ॥५॥

सिभ्रीया चक्रवर्ती कव पडिली अवचिती । धीट तो न भे तया मास कापिलें हातीं ।

टाकिलें तयावरी खुणें गोविला अंतीं । पावला मायबाप हिरोन घेतला हातीं ॥६॥

बांधलें अजामेळा वेश्यागणीका कैसी । मारिली हाक धाकें कळलें मायबापासी ।

घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी । हिरोनि नेलीं दोघें आपणयां तीं पासी ॥७॥

धरूनी आठवू रे बाळा राहें निश्चळ । खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ।

टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ । मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ॥८॥

ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त । सुस्वरें कंठ गाय मधुर आणि संगीत ।

तेणें तें चि चित्त राहे होऊनियां निवांत । पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ॥९॥

॥१॥

२४७८

उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरिनाथा ॥१॥

अवघें पोटासाटीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ध्रु.॥

लावी अनुसंधान । कांहीं देईल म्हणऊन ॥२॥

काय केलें रांडलेंका । तुला राजी नाहीं तुका ॥३॥

२४७९

असोत लोकांचे बोल शिरावरी । माझी मज बरी विठाबाई ॥१॥

आपंगिलें मज आहे ते कृपाळु । बहुत कनवाळु अंतरींची ॥ध्रु.॥

वेदशास्त्रें जिसी वर्णिती पुराणें । तिचें मी पोसणें लडिवाळ ॥२॥

जिचें नाम कामधेनु कल्पतरू । तिचें मी लेंकरूं तुका म्हणे ॥३॥

२४८०

वाराणसी गया पाहिली द्वारका । परी नये तुका पंढरीच्या ॥१॥

पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पायां पडे जन एकमेका ॥२॥

तुका म्हणे जाय एकवेळ पंढरी । तयाचिये घरीं यम न ये ॥३॥

२४८१

सांडुनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥१॥

पाहूनियां झाडें वरबडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥ध्रु.॥

वेंचूनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ॥२॥

तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥३॥

२४८२

दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥१॥

आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहींशी समान पाहों नये ॥ध्रु.॥

पृथ्वीचा पोटीं हिरा गारगोटी । दोहोंसी समसाटी करूं नये ॥२॥

तुका म्हणे तैसे संत आणि जन । दोहींसी समान भजूं नये ॥३॥

२४८३

तेरा दिवस जाले नश्चिक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥१॥

पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी जालें तुज ॥ध्रु.॥

तुजवरी आतां प्राण मी तजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥२॥

फार विठाबाईं धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ॥३॥

तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन तुजवरी ॥४॥

२४८४

लोक फार वाखा अमंगळ जाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥१॥

विषयां वंचलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ॥ध्रु.॥

घर दार अवघीं तजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥२॥

तुका म्हणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आळिंगीं मज ॥३॥

२४८५

इंद्रियांचीं दिनें । आम्ही केलों नारायणें ॥१॥

म्हणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों कोणांपाशी ॥ध्रु.॥

नाहीं अंगीं बळ । त्याग करींसा सकळ ॥२॥

तुका म्हणे मोटें । प्रारब्ध होतें खोटें ॥३॥

२४८६

हातीं धरूं जावें । तेणें परतें चि व्हावें ॥१॥

ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ध्रु.॥

देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥२॥

तुका म्हणे पीक । भूमि न दे न मिळे भीक ॥३॥

२४८७

मोलें घातलें रडाया । नाहीं असुं आणि माया ॥१॥

तैसा भिक्तवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ध्रु.॥

वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥२॥

काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ॥३॥

२४८८

तरि च जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥१॥

नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें बापुडीं ॥ध्रु.॥

ज्याल्याचें तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥२॥

तुका म्हणे भले । ज्याच्या नावें मानवलें ॥३॥

॥ लळतें ९ ॥

२४८९

देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा ॥१॥

मी तों सांगतसें भावें । असो ठावें सकळां ॥ध्रु.॥

निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ॥२॥

तुका म्हणे रोकडें केणें । सेवितां येणें पोट धाय ॥३॥

२४९०

न कळे माव मुनि मागे एकी अंतुरी । साठी संवत्सरां जन्म तया उदरीं ॥१॥

कैसा आकळे गे माये चपळ वो । त्रिभुवनव्यापक सकळ वो ॥ध्रु.॥

हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा । गरुडा विटंबना रूपा सत्यभामेच्या ॥२॥

द्रौपदीचा भेद पुरविला समयीं । ॠषि फळवनीं देंठीं लावितां ठायीं ॥३॥

अर्जुनाच्या रथीं कपि स्तंभीं ठेविला । दोहीं पैज तेथें गर्व हरी दादुला ॥४॥

भावभक्ती सत्वगुण जाला दुर्जना । तुका म्हणे सकळां छंदें खेळे आपण ॥५॥

२४९१

उदारा कृपाळा अंगा देवांच्या देवा । तुजसवें पण आतां आमुचा दावा ॥१॥

कैसा जासी सांग आतां मजपासुनी । केलें वाताहात दिले संसारा पाणी ॥ध्रु.॥

अवघीं आवरूनि तुझे लाविलीं पाठीं । आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ॥२॥

तुका म्हणे आतां चरणीं घातली मिठी । पडिली ते पडो तुम्हा आम्हांसी तुटी ॥३॥

२४९२

जाली होती काया । बहु मळीन देवराया ॥१॥

तुमच्या उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ध्रु.॥

अनुतापें झाला झाडा । प्रारब्धाचा केला तोडा ॥२॥

तुका म्हणे देह पायीं । ठेवूनि झालों उतराईं ॥३॥

२४९३

आजि आनंदु रे एकी परमानंदु रे । जया श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ॥१॥

विठोबाचीं वेडीं आम्हां आनंदु सदा । गाऊं नाचों वाऊं टाळी रंजवूं गोविंदा ॥ध्रु.॥

सदा सन सांत आम्हां नित्य दिवाळी । आनंदें निर्भर आमचा कैवारी बळी ॥२॥

तुका म्हणे नाहीं जन्ममरणांचा धाक । संत सनकादिक तें आमचें कवतुक ॥३॥

२४९४

प्राणियां एक बीजमंत्र उच्चारीं । प्रतिदिनीं रामकृष्ण म्हण कां मुरारि ॥१॥

हें चि साधन रे तुज सर्व सिद्धीचे । नाम उच्चारीं पां गोपाळाचें वाचे ॥ध्रु.॥

उपास पारणें न लगे वनसेवन । न लगे धूम्रपान पंचाअग्नतापन ॥२॥

फुकाचें सुखाचें कांहीं न वेचें भांडार । कोटी यज्ञां परिस तुका म्हणे हें सार ॥३॥

२४९५

विठ्ठल कीर्तनाचे अंतीं । जय जय हरी जे म्हणती ॥१॥

तें चि सुकृताचें फळ । वाचा रामनामें निखळ ॥धृ.॥

बैसोनि हरिकथेसी । होय सावध चित्तासी ॥२॥

तुका म्हणे त्याचा जन्म । सुफळ जाला भवक्रम ॥३॥

२४९६

न चलवे पंथ वेच नसतां पालवीं । शरीर विटंबिलें वाटे भीक मागावी ॥१॥

न करीं रे तैसें आपआपणां । नित्य राम राम तुम्ही सकळ म्हणा ॥धृ.॥

राम म्हणवितां रांडा पोरें निरविशी । पडसी यमा हांतीं जाचविती चौऱ्याशी ॥२॥

मुखीं नाहीं राम तो ही आत्महत्यारा । तुका म्हणे लाज नाहीं तया गंव्हारा ॥३॥

२४९७

थडियेसी निघतां पाषाणांच्या सांगडी । बुडतां मध्यभागीं तेथें कोण घाली उडी ॥१॥

न करी रे तैसें आपआपणा । पतंग जाय वांयां जीवें ज्योती घालूनियां ॥धृ.॥

सावधपणें सोमवल वाटी भरोनियां प्याला । मरणा अंतीं वैद्य बोलावितो गहिला ॥२॥

तुकाम्हणे करीं ठायींचा चि विचार । जंवें नाहीं पातला यमाचा किंकर ॥३॥

॥९॥

२४९८

द्या जी माझा विचारोनियां विभाग । न खंडे हा लाग आहाचपणें ॥१॥

किती नेणों तुम्हां साहाते कटकट । आम्ही च वाईट निवडलों ते ॥धृ.॥

करवितां कल्हें जिवाचियेसाटीं । हे तुम्हां वोखटीं ढाळ देवा ॥२॥

तुका म्हणे धीर कारण आपुला । तुम्हीं तों विठ्ठला मायातीत ॥३॥

२४९९

आमुचे ठाउके तुम्हां गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ॥१॥

काय हा सांगावा नसतां नवलावो । मैंदपणें भाव भुलवणेचा ॥धृ.॥

एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पाहावया ॥२॥

तुका म्हणे ज्याणें असें चेतविलें । त्याच्यानें उगळें कैसें नव्हे ॥३॥

२५००

निदऩयासी तुम्ही करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें द्यावें ॥१॥

भाकितों करुणा ऐकती कान । उगलें चि मौन्य धरिलें ऐसें ॥धृ.॥

दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवीतसें ॥२॥

तुका म्हणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसां ॥३॥

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी. २३०० वर्षं ज्या भाषेत जनव्यवहार आणि ज्ञानव्यवहार चालू आहेत अशी भाषा. गाथा सप्तशती पासून ते ज्ञानोबा तुकोबा आणि आताच्या तरूण लेखकांच्या प्रतिभेचा अखंड झरा ज्या भाषेतून वाहतो आहे. अशा भाषेला इंटरनेटच्या काळात झुळझुळते ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक व्यक्ती व संस्था करीत आहेत. त्यातली एक ई साहित्य प्रतिष्ठान. करोडो पुस्तकांसह इंटरनेट व्यापलेल्या इंग्रजी भाषेसमोर या सर्व संस्थांचे एकत्रित कार्यही खुपच लहान आहे. पण आम्ही निराश नाही. मराठी भाषेतील आत्मगत शक्तीचा पाठिंबा आणि बारा कोटी मराठी लोकांचे पाठबळ या प्रयत्नांच्या पाठीशी आहे. फ़ार पुर्वी लढाया दगड धोंड्यांनी होत. नंतर बाण तलवारींनी होत. नंतर बंदुका रणगाडे आणि विमानांच्या लढाया झाल्या. पण या पुढच्या लढाया बटनांच्या लढाया असणार आहेत. इंटरनेट आणि एकूणच मिडियावर ज्यांची सत्ता ते जेते. अशा काळात इंटरनेटवर मराठी भाषेचे वर्चस्व दिसायला हवे.

आपणा सर्वांचे सहकार्य असेल तर हे अजिबात अशक्य नाही. आपण निदान ज्ञानोबा तुकोबांना तरी प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोचवू या. महाराष्ट्राच्या गांवोगावी, आणि जगभरातल्या देशोदेशी. ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके मोबाईलवर वाचता येतात. अनेक आघाडीच्या ऍंड्रॉईड ऍप वर ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके उपलब्ध आहेत. एका बटनाच्या अंतरावर. हे वादळ आता घरोघरी जाऊ द्या. आपल्या ओळखीच्या प्रत्येक व्यक्तीला ही गाथा फ़ॉरवर्ड करा. व त्यांचे ई मेल पत्ते esahity@gmail.com वर कळवा. दहाहून जास्त लोकांना पुस्तके पाठवणाऱ्यांना किंवा त्यांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवणाऱ्यांना आम्ही ई साहित्यचे VIP सभासद करून घेतो. विनामूल्य.

जय हिंद

जय महाराष्ट्र

टीम ई साहित्य